रायाच्या हुकुमा अणुनि सुकुमार ती अरे ती कशी?
हे त्याच्या शकटीं शवाच निकटीं राती अरे ती कशी. ॥ २२६
तेव्हां फार अकांत कांतवति तें मानूनियां आठवी
चित्तीं सुंदर सांवळी दशवळी मूर्तीत ते आठवी; ।
जीचा भेद न वेद जाणत खरा नानायशा शेखरा;-
ठावा तीस म्हणे च, 'रक्ष मज या भंगोनि साशे खरा.' ॥ २२७
गजा तारी वारी भवभय सख्याचें झडकरी;
धरी तो जो पांवा व्रजजननिधी देवनिकरीं; ।
करी सृष्टी ऐशा गणित गणना ज्यां न करवे;
रजें ज्याच्या चाले जड अजड लक्षीं न धरवे. ॥ २२८
'अहो! भक्तांसाठीं जळचरतनू घे हरि कसा?
कसा रे! ही हिंडे परि मनिं बहू तो हरिकसा; ।
कसा बातें मारी, शरण अलियाचा नरहरी;
हरी त्याच्या दुःखा करि निज सुखानंदलहरी. ॥ २२९
अहा रे! अदृष्टा! कवणगति झाली मजवरी;
वरीती तें कैसें त्यजित मज या दुःखविवरीं? ।
करूं धांवा कोणा तुजविण उमावल्लभपती!
पती त्रैलोक्याचा सुर असुर ज्यालागिं जपती. ॥ २३०
कसें नाना ठायीं मम वसन लज्जाजतन रे!
नरेंद्राच्या इंद्रा! करिसि तुज त्या राजतन रे! ।
उपेक्षा हे ऐशी वरिसि कशि या संकट घडीं?
घडी मोडी तैशी पुनरपि न ये यत्न विघडी. ॥ २३१
न ऐशा पाप्याची मजवरि पडे दृष्टिलहरी;
हरीतो तें आजी मम जिवन कीं सत्य कहरी; ।
हरीच्या पुत्राची प्रथम वधु मी केवळ सखी
सुभद्रेच्या ऐशी तुज बहिण कीं नीवळ सखी. ॥ २३२
अरे कृष्णा! गोवर्धनधर! मुरारी! जगपती!
'पती माझे सारे त्यजुनि मजला सत्य लपती; ।

१. नशीबा. २. एथें वस्तुतः 'उमापतिवल्लभ' ह० 'शिवाला आहे प्रिय तो' असें पाहिजे होतें.
३. सिंहाच्या.

पतीतांनीं केलें मज शव सर्व दीनजनका!
न काळीं या रक्षी तुर्जीण असा दीन जन कां? ॥ २३३

दिनानाथा! नामा विसर पडला काय तुजला?
जळायाचे वेळे उचग कइसा रे! समजला? ।
परीक्षा पाहाचा समय तुज कीं हाच गमला;
मला वाटे कांतालयिंच हरि सेजेंत रमला. ॥ २३४

सांडिशील मजला जगदीशा! हांसती तरि तुला जग दीशा; ।
धांव धांव यदुवंशकुमारा! राख स्वप्रियसखी सकुमारा.' ॥ २३५

राया! फार विलाप बापजननी तूझी करी राजसा;
तेव्हां भीमहि पाहुनी तिस उभा दूरी करीराजसा. ।
संज्ञेनें वदला भला गलबला लोकें भिवूं लागती.
'नाभी नाभि रवा' म्हणूनि बरवा गेला पित्याचे गती. ॥ २३६

उतरुनि शव भूमी त्या खळा ओंगळाला
निरविति जंव बंधू पेटल्या विंगळाला; ।
धरुनि कर सतीचे अर्पिती तीस तीच्या
जनकमुखिं पती तो धांवण्या ये सतीच्या. ॥ २३७

कोपें भीम विशाळ शैल धरुनी हातीं बरा नीटसा;
आला धांवुनि सासऱ्याजवळि तो काळाहुनी धीटसा; ।
आधीं ताडुनि कामिनीजनक तो विच्छिन्न केला करें;
कीं 'कन्येप्रति दाह देउनि पुन्हा घेसी कसी भीक रे!' २३८

उठावले वीर महारवाचे; जे बंधु साचेच तया शवाचे; ।
मारी कुरू ते तरुनेंच सारे; बाळा म्हणे, 'जा तरुणेच सारे.' ॥ २३९

राया! भीम खसाखसां वधि कसाबाचा कनिष्ठाकसा;
नाशाया रिपुसावना निजपिसा तैसाच निःशंकसा; ।
तेव्हां फार पळोनि नष्ट जिवले नाहीं तरी मारिता
साऱ्या प्रेतसहोदरांस बळि तो एकया करें भारता! ॥ २४०

---

१. हस्तिश्रेष्ठासारखा. २. बापाचे गतीनें म्ह० वायुवेगानें. ३. अग्नीला. ४. तीच्या जनकमुखीं म्ह० अग्नींत. द्रौपदी अग्निकुंडांतून उत्पन्न झाली होती म्हणून तो तिचा जनक. ५. वृक्ष. ६. भीमाचा सासरा अग्नि. ७. स्त्री द्रौपदी इचा बाप अग्नि.

पांचागळे शंभर त्या खळाचे बंधू [illegible]धी भीम असंगळाचे; ।
ते द्रौपदी शांतवुनी विशाळा; आ[illegible] पुन्हा तो निज पाकशाळा. ॥ २४१
येरीकडे नृपसभेंत तटस्थ झाला; पाहूनि सर्प जइशी गति त्या अजाला; ।
'या कीचकाविण विलंब न राज्यजाया, आली कशी विवशि किंनरराजजाया?' ॥

सबळ बळनिधी ते कीचकानूज सारे
हुतभुजमुखिं देतां तो गिरीराजसा रे! ।
सघनतनु मशीचा वर्ण ज्या लाभला हो!
तरु करिं करिचाली पातला क्षोभला हो! ॥ २४३

आले तों बहु दूत सूततनयापासोनि रायाकडे;
झाला जो कथला समग्र कथिला सारांश कीं वांकडें. ।
झालें दैव म्हणूनि किंनरकरें मेले बळें व्यर्थ जी!
गेला कीचकसंगतीस अवघा टाकोनियां अर्थ जी! ॥ २४४

राया दीप हिलाल लाहन करी स्वासें हरी कां बळी;
तेव्हां हे क्षिति कीं धरी निजशिरीं अंध क्षपा कांबळी; ।
केला फार अकांत, कांतरहिता झाल्या बहू बायका;
ऐसें कौतुक देखिलें महितळीं नाहीं महीनायका! ॥ २४५

आधीं कीचकबंधु इंदुवदनीपाशीं त्ते संहरी;
आश्वासोनि परी विशाळकबरी गेला प्रतापी हरी; ।
बंधूचें शव फार टाकुनि घरा गेले रणा कांपती;
सैरंध्री कचमुक्त रक्तनयनी जाते गृहा भूपती! ॥ २४६

लोकीं जरी या महिला वसीजे; वाटे तरी या क्षणिं लावसी जे; ।
काढोनि देतो तरी लोक राहे मी साच राया! वदलों करा हें.' ॥ २४७

ऐशी मात जमात दूत वदतां तों भूपती शाहणी
दासी पाठवि अंगनेजवळि हे सांगोनियां काहणी; ।
कीं, 'ते किंनरयोषितेस सहसा ठेवूं नको आश्रमीं;
बोला सुंदर नम्र वाक्य तिज कीं जातां न होय श्रमी.' ॥ २४८

सांगे जों नृपयोषितेस कथला ते शाहणी दासिका,
तों ये पांडववल्लभा मिहिरभा आली प्रभातेसि कां? ।

१. कीचकाकडून. २. श्री सुदेष्णा इचेकडे. ३. सूर्यकांति.

येतां अर्जुन भेटला प्रगटला तो कीं दिनाचा पती,
जाला व्यक्त म्हणे अरक्तनयना ज्या नर्तनाचा पती. ॥ २४९

'बृहन्नळे! लोभ तुला कसा गे! झाले उणा क्षुल्लक लोक सांगे; ।
माझी अवस्था वदतां नये गे! सांगों तरी मत्पति तात ये गे!' ॥ २५०

राया! असें बोलुनि ती सतीनें गंतव्य केलें सुनितीस तीनें, ।
रक्षी हरी एकचि उत्तरासी; बोले जिची शिष्यिण उत्तरासी; ॥ २५१

आली चांदमुखी सुखी शतमखीजाया भजायास ती
रायाची वधु सुंदरा प्रियकरा शब्दें च जाया सती; ।
सांगे कीं, 'मनमोहने! स्तनघने! शब्दास दे मान गे!
आतां ये स्थळिं राहणें बहु उणें तें सत्यसें मान गे! ॥ २५२

कोपिष्ठ वल्लभ तुझे तुज रक्षणासी आहेत कीं परम सुंदर लक्षणेसी; ।
पाहोनियां नर तुला भ्रमती मतीचे; तेव्हांच मृत्युसदनीं वसती नितीचे. ॥ २५३

ऐकोनि त्वत्पतिपराक्रम भी महा गे! राजा प्रजा सकळही तुज भीम हागे; ।
एथोनि जाय जिकडे निज हीत माने; आज्ञापिलें तुज असें नृपउत्तमानें'. ॥ २५४

पारीक्षिता! मग सती वदली कशी रे! जेणें नृपेंद्रवधुमानस वीकशी रे! ।
'माझे पती गुणवती न भल्या जनाला, देती उपद्रव खळाधम दुर्जनाला. ॥ २५५

न मा तेरा तेरा दिवस करिं माझा द्रुपनदी!
नदींद्राचें ऐसें करिं हृदय सा चारि तिन दी; ।
न दीना सोडाया उचित तुजला राजवनिते!
नितें वर्ते त्या मत्पतिभय नसे सौख्यजनिते! ॥ २५६

नृपाचा पांचाळी स्नेह परम जो चित्त विमळे;
मळेना तो केव्हां सरसचि सदां सत्य विमळे! ।
मळे ऐश्वर्याचे नरपति भले दीनशरणा;
रणा नोपेक्षीती दिनमणि जसा तीव्र किरणा. ॥ २५७

नृपा भेटती स्नेह साचा रितीनें। पती लोटल्या दीन सा चारि तीनें; ।
पुढें पाहसी मत्पती विक्रमा हो! जयांची कळा तुच्छ ती शक्र मा हो.' ॥ २५८

सुदेष्णेस ही मानला भाव तीचा; पती सांगुनी मान्य केला सतीचा; ।
भला शब्द जो बोलिला साच वाणी; नृपाच्या वधूलांगिं कौतूकवाणी. ॥ २५९

१. इंद्राचा पुत्र अर्जुन याची स्त्री द्रौपदी. २. समुद्रासारखें. ३. सा, चार, तिन म्ह० ६+४+३=१३ दिवस. ४. पराक्रमाला.

तयावरी कीचक दाहवाया आज्ञा करी भूपति वाहवाया. ।
बंधूशवाचे उरले जिवें जे, गंधर्वघातें बहु निर्जिवे जे. ॥ २६०

झाली कथा सकळ कीचकमारण्याची; आतां हरीसुत हरी गरिमा रणाची; ।
ते ऐक सद्गुणनिधी कुरुनंदना! रे! जे वज्र होय भवदुर्जनकंदना रे! ॥२६१

श्रीहरी वदवि साच मला हो! सत्कथा परम उत्तम लाहो! ।
देतसे सकळ भक्तकदंबा; चूकवी विकळलौकिक दंभा. ॥ २६२

केला प्रसंग तिसरा हरिवामनानें संपूर्ण हा मज गमे अथवा मनानें. ।
ज्यां पूजिलें चरणपंकज जन्मवृंदीं; याकारणें वदवि मद्वदनारविंदीं. ॥ २६३

अध्याय चवथा.

जो कां हरी सकळव्यापक एकला रे! नांदे जगांत जगजीवन चित्कळा रे! ।
तो भारती वदवि सच्चरितामृतातें; जे जीववी भवमदांधपरा मृतातें; ॥ १

'नृपा! जन्म साफल्य सारा कराया, कथा आइकें भारती लोकराया! ।
बरी राहटी पूर्वजांची मनासी निवेदूनियां पूरवीं कामनेसी. ॥ २

जरी वाटे वाटे सुरमति धराचा मनस रे!
सरोजाक्षी रामानुजहृदयकंजांत पसरे; ।
तरी गा सत्कीर्ती हरिप्रियचि सारे प्रहर रे!
हरे कृष्णानामें सतत भव हा क्षिप्र हर रे. ॥ ३

पापी कीचक मारला अवरला अज्ञातही वास रे!
तेव्हां पांडव भूपती रणपती ते बाणईष्वास रे! ।
घेवोनी निजहस्तविस्तृतकंजीं दायादचक्रास रे!
भंगोनी जगतीतळीं प्रगटले जे मान्य शक्रास रे!' ॥ ४

जन्मेजयें मग बहू विमळा मतीनें आरंभिला विशद प्रश्न महामतीनें; ।
जोडोनि हस्तकमळें प्रणिपात केला. विप्रेश्वराचरणिं भाव असे भुकेला. ॥ ५

म्हणे राव त्या विप्रवर्यास भावें, 'कथा ऐकतां गोड माझ्या स्वभावें, ।
मनीं बाधली स्वल्प संदेहजाळी; न तोडा तरी वासना देह जाळी. ॥ ६

---

१. इंद्रपुत्र अर्जुन. २. युद्धाविषयीचा गर्व. ३. समूहाला. ४. धनुष्य. ५. कमळांत. ६. समूहाला. ७. स्पष्ट.

पतिव्रता पांडवयोषिता रे! जे १र्वमान्या गुणभूषिता रे! ।
नृपापुढें कैंवि खळाधमानें ते गां जेतां ही पति स्तब्धमाने. ॥ ७
पतिव्रते काय उणे तपासी? जे क्षोभल्या दाहिल आतपासी; ।
करी खळा शापुनि कां न दाहा? न तोषवी ते पति कां न दाहा? ॥ ८
सुरांचे थवे कांपती ज्यांस सारे, असे पांचही विक्रमी, तो कसा रे! ।
महासंकटीं काळ पाहोनि तीचा, उगे राहिले गांजितां दुर्नितीचा? ॥ ९
जरी सोंगें ही घेतलीं वेगळालीं, तरी काय त्यांचीं स्वशौर्यें गळालीं? ।
उगे दाविते तीव्रता ईक्षणानें, बळीही खळीं जीव देती क्षणानें. ॥ १०
मला थोर आश्चर्य चित्तांत माते खळें गांजितां माझिया तातमाते. ।
अहो! सोसला काळ त्याला कसा हो!? धरोनी क्षमा उत्तमश्लोकें साहो.॥ ११
झाले कसे प्रगट दाउनि विक्रमासी? वैरीजनीं सकळ सांग अनुक्रमासी; ।
तूं सूर्य मत्सकलसंशयरात लीला कीं शासिता मम मती भेंवरातलीला.' ॥ १२
ऐकोनियां रेंव बरा महीधैत्राचा, वाचांचा पैति तइसा ऋषी सुवाचा ।
वाचाळ कुरु विमळा म्हणे, 'भला हो! लाहो या तुज श्रवणांत लाभला हो!॥ १३
जन्मेजया पुससि गोड बहू रवा रे! नारेशशीकर तयापरि आरवा रे! ।
वा रे! तुझे गुण बहू मज मोहवीती; वीती मनांत सुखदुःख दशा हवीती. ॥ १४
बरा प्रश्न केला, तरी ऐक राया! कथा भारतीं जीवन्मुक्ती कराया; ।
सती द्रौपदी गांजितां, आगळाला मुखीं घालुनी, राखिलें ओंगळाला.'॥ १५
तरी ऐक साचार प्रश्नोत्तरा या; भवाब्धीस पायीं सुखें ऊतराया; ।
अहो भारताची कथा सार सारी; मनें ऐकतां क्षिप्र संसार सारी. ॥ १६
कृष्णा सती जरि निती त्यजुनी खळाला शापोनि भस्म करिती खरनिःखळाला, ।
कांहीं विलंब पडता नृपती! न तीला; नायोग्य कीं परि पतिव्रतमान तीला.॥ १७
पतिव्रता पतिमनोगत जाणणारी; नारी न शब्द अपणावरि आणणारी; ।
ना रीझतें पतिस तें न करी कदा ही; दाही न यास्तव खळाधम जो सदा ही.॥ १८
पतिव्रता निर्मळ मानसाची पावे जरी ते अवमान साची, ।
तथापि आज्ञा पतिचीच पाहे; या कारणें शाप न दे नृपा! हे. ॥ १९
दुरात्मा संळी द्रौपदी जेधवां रे! नृपा! भीमही धांवला तेधवां रे! ।
बरा अग्रजा नेत्रसंकेत दावी; सभूपा खळध्वंस आज्ञा वदावी. ॥ २०

१. उन्हाला. २. कीर्ति. ३. संसारीं आसक्त. ४. शब्द. ५. पति. ६. वाचेचा पति म्ह० ब्रह्मदेव. ७. बोट. ८. आवडतें. ९. छळी.

निवारी बहू धर्मराजा तयाला; 'न। योग्य कीं या अशा दातयाला ।
वधावें खळाकारणें भीमसेना! कशी काळवेळा तुला रे! दिसेना?' ॥ २१
असा भाव संकेतशब्दीं वदोनी, निवारी तयालागुनी दीस दोन्ही; ।
जरी धर्म आज्ञापिता भीम राया! तरी काळ तोची खळाला मराया. ॥ २२
सारांश मानुनि भिमें निज अग्रजाला, केली क्षमा. नृपति प्रश्न समग्र झाला; ।
आला पुढें परम सावध ऐक राया! सत्कीर्तिनें निज कृतार्थ कुळा कराया. ॥ २३
येरीकडे नरपती गजसाव्हयग्रामीं तो धार्तराष्ट्र हिनधी रणमंदगामी; ।
धाडोनि दूत बहुसे जगतीतळा हो! शोधार्थ पांडव दुरत्यय मातला हो! ॥ २४

आले वार्तिक सांगती, 'नरपती! चारी दिशा शोधितां,
नाहीं थाक यथार्थ लागत उपायासी बहू साधितां; ।
कांहीं एक विचित्र नेत्रयुगळीं राया विराटाचिया
ग्रामीं व्यक्तचि देखिलें, अइकिलें कर्णी कपाटाचिया. ॥ २५

धर्माचेपरि अमृतोपम रवा बोलोनि निःशंक रे!
आहे सर्वगुणी विराटसदनीं नामें भला कंक रे! ।
रायाची बहु प्रीति नीति जन तो संपादुनी राहिला;
ऐसा पांडव लक्षणी नरपती रूपें दुजा पाहिला. ॥ २६

भीमापरी बल्लव फुल्लसा रे! जो कौतुकें लोळवि मल्ल सारे; ।
पाकक्रिया मत्स्यघरीं करीतो; रूपेंविना भीम गती करी तो. ॥ २७
बृहन्नळा म्हणुनि नाचवि लेंकरासी मत्स्याचिया निशिदिनीं सगुणैकराशी; ।
अश्वांग वावरि करीपति तें करीसे, ते भंगणार बळि भासति भा करीसे. ॥ २८
सैरंध्री ही एक नारी विशाळा सेवी ते ही मत्स्यजाया कशाला? ।
नेणो साचा भाव साचा तयांचा; जाणें राया! श्रेष्ठ तूं दातयांचा.' ॥ २९
दुजा दूत बोले, 'महाराज राया! नसे मांग त्यांचाच कोठें जरा या; ।
महीमंडळी ते निमाले भले हो! स्वयें जीवदानास जे लाभले हो!' ॥ ३०
दुर्योधनें रव असा परिसोनि कानीं, कानीनआदि निजसंनिद्ध बैसकांनीं, ।
'कां नीत शब्द न वदा?' वदला तयासी या शीघ्र पांडुकुमरा कळल्या जयासी. ॥ ३१

तों ये चार विचारशीळ बरवा मत्स्येशदेशांतुनी;
सांगे कीचकवृत्त कीं, 'नरपती! मेला मर्दे मातुनी; ।

---

१. हस्तिनापुरीं. २. थांग, पत्ता. ३. हत्ती. ४. पत्ता. ५. अविवाहित स्त्रीचा पुत्र कर्ण.

सैरंध्रीमुख चंद्रचातक महागंधर्व कोपिष्ठ जी!
तेणें गुप्तचि मारिला निशिं ¹मला तो मत्त गर्विष्ठ जी!' ॥ ३२
ऐकोनी नृप काय वाक्य वदला भीष्मादिकर्णादिकां;
'होता कीचक शूर जो रणभुमी मोठा अमर्याद कां; ।
गंधर्वीं वधिला भला न मजला वाटे मनीं साच कीं;
केला भासत पांडवींच अइसा मोठा तमासाच कीं. ॥ ३३
कसा थल पांडुसुतां उमगाया करावा? उपायास नेणें तगाया; ।
अहो राज्य सारेंचि राहो मला हो! पुन्हा काननींची दशा त्यांस लाहो.॥ ३४
उपाय सांगा कइसा करावा? म्यां जागल्या पांडव साकरा वा ।
वांटीन वित्ता मनमानलें हो! तेव्हां दशा मन्महिमान लेहो.' ॥ ३५
बोले कर्ण सुवर्णवर्ण तनुचा आकर्णुनी बोल ते;
रायाचे मुखचे खचे परि नृपा ज्याचे मती तोल ते; ।
'कीं आतां अविलंब मत्स्यसदनीं धाडा जिमूतीस जी!
सारें स्पष्ट कळेल बल्लवबळें दावील वृत्तीस जी! ॥ ३६
करुनि पांडवपंचकपूतळे, जिमुतिपाउलिं बांध रिपू तळे; ।
रगडितां परि मत्स्यपुरास ने म्हणुनि सांगुनि पूरवि वासने.' ॥ ३७
भला मानला शब्द हा राजयाला; अहो आजपासूनि हा राजि याला; ।
त्वरें धाडिला मल्ल कर्णानितीनें विराटालया दुर्मती भूपतीनें. ॥ ३८
बहू सांगती जीमुतीलागिं कानीं; 'तुवां बल्लवा मारितां आणिकांनीं ।
जरीं साह्य केलें, तरी जाण साचे, खरे हंस ते द्रौपदीमानसाचे. ॥ ३९
जरी फावलें, मार निःशंक सांचे; बळी तूं तुला कांपती लोक सांचे; ।
नव्हे सर्वथा काम भारी तुला रे! तुझ्या पांडवें काय येती तुला रे!' ॥ ४०
गेला तो जिमुती कैरीकुळगती मत्स्यालया भूपती;
ज्याला पाहुनि कांपती जन, भिती कंकादिही भूपती! ।
लक्षीनी पुतळे तळे रगडितां तो दुष्ट पापिष्ठ रे!
संकेतें अनुजास धर्म वदतां मर्दी जसें पिष्ट रे! ॥ ४१
नृपा! ऐक ²लाथांच विस्तार साचा; बहू गोड जो भीम मत्ता रसाचा; ।
नृपाच्या सभे पातला मल्ल तो रे! बरें दावुनी जो मर्दे डुल्लतो रे! ॥ ४२

---

१. 'सारें' असाही पाठ आहे. २. गजगती.

नमी तर्जनीनें धरावल्लभाला; वदे पांडवा नीचसा मल्ल भाला ।
नृपा तोच कीं पांडवा लागला रे! मनीं वाढला क्षोभ तो चांगला रे! ॥ ४३
विराटालयीं मल्ल जे थोरसाने, जिमुतीभया मानुनी मानसानें, ।
पळाले असें भूप जाणोनि जाया करी खिन्न होऊनि गेहा निजाया. ॥ ४४
वदे कंक तेव्हां नृपा निर्मळाला, 'धरा खिन्नता कां मना कोमळाला? ।
अहे काळ हा बल्लवा बाहवा या तया विक्रमाग्नीमधें दाहवा या.' ॥ ४५
म्हणे भूप, 'हे मानली मात मातें;' त्वरें आणवी बल्लवा उत्तमातें; ।
जवें दूत जातांचि ये भीमही तो; पदें चालतां कांपवी जो मही तो. ॥ ४६

मुसळ करिं करींद्रासारिखा मत्त मानें;
नरपति महिनाथें देखिला उत्तमानें; ।
सकळबळनिधीची दृष्टि भावाकडे कीं;
जिमुति वध करीतां, मानिना वांकडें कीं. ॥ ४७

वदे धर्म बंधूस तेव्हां कसा रे! बरा भाव दावूनियां लोक सारे; ।
'बळी कोण या ब्रह्मअंडीं तुकाला तुझ्या तूं कसा पाहसी कौतुकाला? ॥ ४८
सदा पांडवीं तूजला पाळलें रे! बरे पूर्वीले मनाचे लळे रे! ।
तयांचे कसे देखसी पूतळे रे! पदीं जीमुतीचे गुणीं गुंतले रे! ॥ ४९
दाऊनियां विक्रम आज गा! या, ना योग्य कीं दुर्मद हा जगाया; ।
महीवरी मारुनि टाक हा रे! तूं बल्लवा! मान असा खरा रे!' ॥ ५०
म्हणे जीमुती, 'कंकभट्टा! खटा! रे! कसा बोलसी बोल तूं ओखटा रे!।
पदीं बांधितां पूतळे पांडवांचे, तुझें काय वेंचे वदें सत्य वाचे? ॥ ५१
जरी पांडवांचा मनीं स्नेह नांदे; तरीं मल्लयुद्धीं बरी कामना दे; ।
बळें सोडवीसी तरी लेश वाचे वदेना तरी बैस न्यायें शवाचे. ॥ ५२
बहू मानुनी बल्लवाच्या बळा रे! नभासी न भी जेंवि शूरा बळा रे! ।
पतीच्या बळें ठेंगणें नाक मानी; तसा तूं हि याचा बळें साभिमानी.' ॥ ५३

ऐकोनी रव क्रुद्ध मल्लमुखिचा त्या बल्लवें कोप रे!
सांचोनी मनिं मल्ल ओढुनि बळें हाणीतला कोंपरें; ।
हाताहात भिडोनि बद्धकवरी दोघे बळी सारखे
केली मल्ल कळा न व्यक्त चपळा लोकां न कां पारखे. ॥ ५४

१. वाईट. २. स्वर्ग.

झाला भीम खरा जरा नृपवरा तो घाबरा मानसीं;
मूर्च्छा स्वल्पचि दाटली दडपली संधीमधें मानसी. ।
तेव्हां फार [1]अशुद्ध शुद्ध वमला, [2]नावेक विश्रामला;
तें पाहूनि विराटआदि जन तो चित्तामधें वामला. ॥ ५५
प्रकाशें करी दीप तो [3]अंतराया; प्रकाशे करी तेंवि तो मत्त राया! ।
बहू गर्जनी घेत आनंदलाहो; घडी देखुनी भीम तो मंदलाहो! ॥ ५६
असा पाहुनी मल्ल तो कोपला हो! महीचा पती अंतरीं कांपला हो. ।
म्हणे, 'पाकशाळापती आज गा ! या न दीसे मला मल्लहस्तें जगाया.' ॥ ५७
तों भीम सावध नृपा! मग तेच काळीं झाला, जशी असुर मर्दुनि भीम काळी;।
गर्जे भयंकर तसा वदला भला रे! मारोनि मल्ल जगतीं यश लाभला रे!॥ ५८
जिमूतीमंदातें पवनसुत भंगी गजगती;
कराग्रानें त्याचें शिरकमळ तोडोनि जगती ।
पुजी कीं वैन्याचें बळ बळि वधाया दिन बरा;
मुहूर्तेंची केला वधुनि अशिया मल्लनिर्बरा. ॥ ५९
तेव्हां भूप अमूप तोषुनि मनीं त्या बल्लवाला भला
बोले कीं, 'बळियाशिरोमणि ! तुला जयूलाभ हा लाभला. ।
वाटे कीचक मेलिया हिनबळी हें मद्रराराज्य गा !
तें त्वद्विक्रम पाहतां मज गमे पूर्वापरी आज गा!' ॥ ६०
जेव्हां [5]प्रभंजनसुतें वधिला बळी रे ! तेव्हां च जाण नृपती कळला बळी रे! ।
येतील कौरव पुढें जिमुतीवधाचा ऐकोनि सर्व कथला रण सावधाचा. ॥ ६१
ते ऐक सुंदर कथा पुढिल्या प्रसंगीं; बैसोनि स्वस्थ मन या बहु विप्रसंगीं; ।
हा गोड ग्रंथ अवघा बरवा मनाचा, छेदोनि काम करवी प्रिय वामनाचा. ॥ ६२

अध्याय पांचवा.

नमाया माया जो करि हत ज्याचा पद कजा;
[6]कंजा शंभू ब्रह्मा करिति हृदयाब्जीं पदक ज्या; ।
कज्या स्पर्शें ज्याच्या जड अजड झाली परम तो
रतो बुद्धीं जैसा मधुप मधुपद्मांत रमतो. ॥ १

---

१. रक्त. २. थोडा वेळ. ३. विघ्न. ४. जून, कोवळा नव्हे असा. ५. भीमें. ६. लक्ष्मी.

न संसारीं आहे हरिविण सुखाचा रस रती;
रती निःसारा ते भुलुन जन सारा विसरती. ।
रतीशाताता जो सकळ प्रभु या देव न करी;
करीनक्रोद्धारी हरि भवहि तोही झडकरी. ॥ २
कसा ऐसा नाशे भवभ्रम मनाचा सकळ पां?
लवोनी मद्बुद्धी गहन विवरी जो विकल्पा; ।
करी सत्सौख्यासी पळ लव असा नाश करितां;
रिता ठावो विश्वीं नर गुरुविना ज्ञान धरिता. ॥ ३
सङ्गीत पूर्वज नृपेंद्रनरा बरा जी! राजीवनेत्रसखया कुळअंबरा जी! ।
राजीव ऐक निगमागमसारसा रे! सारें करी श्रवण मानस सारसा रे! ॥४
मारुनि मल्ल नृप बल्लव आपणासी नादावितां प्रगट त्याच निरूपणासी, ।
सांगीतलें तुज समग्रहि लोकराया! ऐकें पुढें पुनित वंश भला कराया. ॥ ५
मेला मल्ल प्रबल्ल ऐकुनि नृपा दुर्योधनाच्या मना
वाटे खेद विशेष कीं, 'न पुरली ते आपुली कामना; ।
गेला व्यर्थ बळी न पांडव खळी ठायीं कसे पाडिले?
आतां यत्न नसे' म्हणोनि असुखें श्वासास त्या सोडिलें. ॥ ६
कर्णादि आप्त असतां अणखी नृपाळा! पाळा सभेंत बसला वदला कृपाळा; ।
पाळावया वचन अंधकुमार जी जी जे जिंतणार रणशत्रु तुला रजी जी. ॥ ७
बोले त्यावरि दुष्ट नष्ट कपटी मामा तयाचाच रे!
मोठी बुद्ध सखोल जंबुकपरीं अत्यंत तो चांचरे; ।
'आतां जाउनियां बळें निज दळें राया! विराटास रे!
देतां त्रास, समस्त पांडव तुझ्या येतील स्पष्टास रे! ॥ ८
जरी विक्रमी त्या स्थळीं राहती रे! तरी मत्स्यदुःखास ते पाहती रे! ।
न दृष्टीस, कीं सत्यवादी भले ते; विशेषें अम्हां कारणें क्षोभले ते. ॥ ९
त्वरा फार दुर्योधना आज गा! या जगाया महीं आणि साऱ्या जगा या; ।
सुभद्रा करी सिद्ध आतां दळा या दळाया रिपू कीं मही आदळाया.' ॥१०
देवव्रतादिकहि त्या समयीं भुपाळा! पाळा धरूनि म्हणती नरलोकपाळा; ।
'पाळाणिजे त्वरित चक्र' अशा रवा हो! वाहोनि कर्णि म्हणती 'रथ आणवा हो! ११

१. रतीपती मदन याचा बाप विष्णु. २. पवित्र. ३. ठायीं पाडणें म्ह० उमगणें, पत्ता लावणें.
४. समुदाय. ५. भीष्मादि. ६. 'बसले' असाही पाठ आहे.

जो हा वृद्ध कुरूमणी न रमणीसंसर्ग ज्याच्या मना;
　सर्वस्वें त्यजिली स्पृहा पुरविली बापाची भली कामना; ।
ज्याच्या विक्रमतुल्यतेस सहसा शक्रास ना मोजवे;
　कीं तो सूर्य प्रतापवंत नृपती त्याच्या पुढें काजवे. ॥　१२
ऐसा तो कुरुवृद्ध भीष्म जगतीनाथा! सभारंगणीं
　होता; द्रोण कृपाख्य युक्त सह तो ऐणांक तारांगणीं; ।
क्षत्ता ही बसला, विचार रुचला बुद्धी अमोघा तया;
　नाहीं कीं हरिभक्त पांडव छळें ये निश्चयीं घात या. ॥　१३
मारातुल्य शरीरभा रणसभा पंडीत रे मानसा!
　ज्याची धीर उदार हंससरसी केला बहू मानसा; ।
ऐसा कर्ण सुवर्णवर्ण रथ जो अत्यंत मोलागळा
　त्यामाजी बइसूनि शूर मग तो बोलों नृपा लागला. ॥　१४
'शत्रूचार गणीं रणीं विखरणी उद्वेग कां राजया!
　नाहीं योग्य विलंब लंबनयना! आतां सुवीरा! जया ।
साधीं; चाल विचार फार करुनी घोळूं नको कामनी;
　झाल्या शत्रुनिपात होसिल सुखी राया! स्वयें कां मनीं.' ॥　१५
झाले सज्ज समस्त त्यावरि नृपा भीष्मादि कां वीनवी
　राजा दुष्टमती विवेक न रती, जो कां प्रतीमा नवी ।
मूर्खाची, सगळी अशेष उगळी सद्वासनेची सुधा;
　गांईचा पति कीं विकल्प उदधी प्रत्यक्ष हेला सुधा. ॥　१६
　विकल्पाची राशी धरि मनमिराशी सतत रे!
　　तरेना सत्संगीं बहुवय सगवें उतत रे! ।
　हरीभक्तद्वेषी विकल अविनाशी जन न ते;
　　न तेजस्वी वंशीं धरिति नरवर्या जनन ते; ॥　१७
ऐसे त्रिगर्त बहु दुष्ट नराधिपा पां पापात्म बुद्धि धरुनी मरती अपापा! ।
तेही समस्त चमू घेउनि कौरवाचे वाचे वरूनि निघती धणि रौरवाचे. ॥　१८
　एवं तो धृतराष्ट्रपुत्र अवधी घेवोनि सेना सका
　　आला मत्स्यपुरा करीत बहुसा शेता मळ्या नास कां; ।

१. भीष्म. २. स्त्रीस्पर्श. ३. इच्छा. ४. बापाची. ५. चंद्र. ६. विदुर. ७. मदनासारखें. ८. अमृत. ९. बैल. १०. सैन्य.

केले दोन विभाग भागवत जे भीष्मादि रायाकडे
सेना सर्व त्रिगर्त धूर्त अपुली सज्जून एकीकडे. ॥ १९
विराटदेशांत उठे धुराळा; राळापरी फार चमू कराळा; ।
अश्वांगजांची गति दाखवीती; वीतीमधें धांवुनि रोखवीती. ॥ २०
त्रिगर्ताच्या फौजा नरपति विजातुल्य सकळा
कळावंती दंतीसम करुनि गोवृंद विकळा, ।
कळाया मत्स्यातें हरति गइवत्सां नरपती!
पती गाईचे ते अतिशयित दुःखें विलपती. ॥ २१
गोपाळ राया अवघी गती रे! तीरे नृपा जाउनि सांगती रे! ।
'तीरे तुफंगा करवाळ हस्तीं हस्तीपरी ज्या रणरंग मस्ती. ॥ २२
ऐशी चमू जींत ध्वजा फरारे; येऊनि नेला तंव गोफरा रे! ।
राया! करीं जाळूनि राख त्यांची हे कामना गोकुळराखत्यांची. ॥ २३
सेवीत होत्या नृप गोवनीं रे! नीरें तृणें तों नवयौवनी रे. ।
आली चमूचंडमहातमानें; माने तसा गोधन उत्तमा ने.' ॥ २४
ऐकोनी वचना नृपेंद्र सुचना मंत्रीजनांला करी;
'कोणाचें परचक्र शक्रसरिचा येऊनियां किंकरीं, ।
गाईचें कुळ हारिलें विखरिलें मत्सर्वदेशास गा!
आतां जाऊनि सोडवीं निज गुरें जाणूनि त्या शास गा.' ॥ २५
तों दूत येउनि नृपा वदती गुमानें, 'मानें त्रिगर्त तव गोधन उत्तमा ने; ।
माने न शब्द जरि हा तरि लाग कीजे; कीं जेर होय तइसा रिपुला ठवीजे.' २६
त्रिगर्तांची सेना श्रवण करितां मत्स्यवर ती
रती मानीना कीं मज परम हे ना अवरती. ।
कसें झालें माझ्या प्रियेयुवतिबंधूनिधन रे!
नरेंद्रांचीं भाग्यें हरुनि बहु जो आणि धन रे! ॥ २७
राया! धीर विराट टाकित असा जाणोनियां कंक रे!
पाहोनी मुखपद्म मत्स्यपतिचें बोलेचि निःशंक रे! ।
'कीं हे वेळ नृपेंद्र धीर त्यजती ना हे मला दीसतें;
येती भार हरीवरी दिधलिया इच्छे असें दीसतें. ॥ २८

---

१. गाईचा समुदाय. २. प्रियतीच्या बंधूचें म्ह० कीचकाचें मरण.

पाहे पां द्रुपदीस्तनी गुणवती दुर्योधनें गांजिली;
 कीं जे नग्न म्हणोनि भग्नमतिनें बुद्धी कुडी योजिली; ।
तेंव्हां चित्रविचित्र देऊनि चिरा केली कशी मात्र रे!
 इच्छामात्र धरी हरी तरि करी रंकास कीं राव रे! ॥ २९
झाला राजसुयज्ञ धर्मसदनीं, तेंव्हां कशी आवडी
 उच्छिष्टें चतुरां करीं चतुर तो दीनापरी सावडी; ।
ऐसे पांडव यादवी निज दये पाहूनि सद्भाव रे!
 इच्छामात्र धरी हरी तरि करी रंकास कीं राव रे! ॥ ३०
जो योगी हृदयारविंदतरणी, जो कारणीभूत या
 विश्वाला, रमला मनांतुनि जपे चिन्मूर्ति शंभू तया; ।
तो कइसा गवळ्यावरीं हरि भला दावी शिशूभाव रे!
 इच्छामात्र धरी हरी तरि करी रंकास कीं राव रे! ॥ ३१
ऐश्वर्यें जगतींत जे सुखरणी क्षीराब्धिची कन्यका
 नाहीं योग्य हरीपदाब्जभरण्या जे चिद्रुपा धन्यका; ।
तो गोपीहुगर्डी घडी करुनि घे मानोनि उत्साव रे!
 इच्छामात्र धरी हरी तरि करी रंकास कीं राव रे! ॥ ३२
लंकेचा अघडा प्रताप निघडा होता देहातुड रे!
 केला खस्त पौलस्ति त्या कपिरिसें गांजोनियां लंड रे! ।
पाषाणा तरवी नद्य उतरवी दे दुंदुभी घाव रे!
 इच्छामात्र धरी हरी तरि करी रंकास कीं राव रे! ॥ ३३
कुब्जा अब्जमुखी सखी करुनियां उद्धारिली साच कीं;
 सांगों काय किती असा यदुपति दावी तसासाच कीं; ।
हस्ती नक्र पशू तया शिशुभुवा दीधा कसा ठाव रे!
 इच्छामात्र धरी हरी तरि करी रंकास कीं राव रे! ॥ ३४
ऐसा विश्वसणी धणी जगतिचा नांदे अखंडीत ही;
 कोणा देइल तो! जया जय असा इत्यर्थ पंडीतही ।
जाणेनात; मनांत निश्चळ पदीं ठेवोनि विश्वास जी!
 जावें युद्ध कराावया, नरपती! घे बाण ईष्वास जी! ॥ ३५

१. बत्ताला. २. सूर्ये. ३. लक्ष्मी. ४. रावण. ५. रावण. ६. कमलवदना. ७. सुंदर. ८. मनुष्य.

मेला कीचक या निमित्त गणसी कां बा! उणें आपणा?
नाहीं ते बळि काय रे! तव दळीं जे जिंकणारे पणा; ।
बाहें वल्लव मल्ल मारुनि तुझे दृष्टीपुढें टाकिला
जेणें त्या सह जाउनी रिपुसमूहो पाहिजे ठोकिला.' ॥ ३६
ऐसें कंक सुटंक वाक्य तइं तो राया! सरायास कीं,
बोले कीं, 'अपली अमंगळ दशा आली सरायास कीं;' ।
राहूमुक्त विभावरीपति जसा शोभे दयामंदिरा;
तैशी धर्ममुखारविंदसरसी शोभावली इंदिरा. ॥ ३७
ज्याचे भूप अभूप विक्रमि सदा वंदोनि पादास रे!
होते लक्षित लोचनीं निशिदिनीं त्याचे रुपा दास रे! ।
तैसे तिष्ठति कष्टती अनुजही त्याच्या सवें चार हो!
राणी सुंदर द्रौपदी अनुपदीं रक्षी कुळाचार हो! ॥ ३८
साक्षी सार असार सारस करी ज्याचा सखा साच रे!
जेव्हां पाहुनि दान दानवरिपू तेव्हां तया आंच रे! ।
दुःखाची नलगे अखंड सलगे देऊनि सांभाळिले;
तेही निर्मळ मानसें हरिपदा सर्वस्वही भाळले. ॥ ३९
जन्मेजया! परिस सावध कान दे गा! जें ऐकल्या विमळ वैभव कां न दे गा! ।
ऐशी अपूर्व करणी तव पूर्वजांची; जे प्रीय होय जगजीवनश्रीअजाची. ॥ ४०
'हा तंतिपाळ नृप विक्रमआगळा जी! त्या पांडुनंदनसमागमिं वागला जी! ।
तैसाच पाहुनि रणांगण हर्षला हो! हा दामग्रंथि रिपुविक्रमकर्षिता हो!' ॥४१
मानोनि कंकवचना मग मत्स्य त्याला पूसे मुहूर्त यतिसंनिधआसत्याला. ।
'नाजाय काय रिपु दुष्कर वा मला रे? कीं सर्व लाभ जय ये बरवा मला रे'॥
'राया! वल्लव घे दळीं मग दळी शत्रूचमू कां कणें;
लक्षालक्ष समर्थ शत्रुवक्षांचीं फोडी खरीं कांकणें; ।
मी ही राहिन आजि संनिद्ध तुझ्या संग्रामदेशांत गा!
आणूनी निज गोप गोकुळरिपूवृंदास दे शांत गा.' ॥ ४३
पालाणी मग चक्र चक्रधर तो ध्याऊनि हंसासरसीं;
कंकाची त्रिविधा सुधारसगिरा मानोनियां सारशी; ।

१. चंद्र. २. हृदयकमळीं. ३. सार असार=उत्तम अधम.

हस्ती वाजि पैदाति भाति रथिही तो पुत्र बंधू दहा
घेऊनी नृप जाय अग्निवत रे! शत्रू कराया दहा. ॥ ४४
बंधूआदि समस्त सज्जित रथी त्यांला बलावि क्रमें;
गेला शत्रु वधावया नरपती राया! भला विक्रमें; ।
होता अर्ध मुहूर्त वासरमणी तेव्हां दळा दोंस रे!
झाला मेळ युगांतकाळ सकळां युद्धांगणीं होत रे! ॥ ४५
दोघेही दळनाथ सज्ज समरीं बाणास इष्वास रे!
घेऊनी रथ पेलिती परदळीं टाकोनि दुश्वास रे! ।
होतां युद्ध प्रचंड चंडकिरणी तो अस्तमानास रे.
गेला ते समयीं महींद्ररथिनी दोहीं बहू नास रे! ॥ ४६
राया! पां तम दाटलें दिशि निशी चौदा घडी ओसरे;
तों हो! ते मग नीवतां शशि दिशा केल्या तमें ओस रे! ।
चंद्राचे किरणीं रणीं झगडती दोघे महीचे पती;
बाणें बाण परस्परें निज कळा दावूनियां चेपती. ॥ ४७
दोघे किंशुकपुष्पतुल्य दिसती झाले रथावेगळे;
केलें मल्ल प्रबल्ल युद्ध तइं त्या मत्स्याकडे आगळें; ।
कांहीं एक दिसोनि ये जय घडी, त्यानंतरें शत्रुनें
त्याच्या सर्वदळा बळा उबगिलें जेंवी हुताशें तृणें. ॥ ४८
सुशर्मा रथारूढ हाही तसा रे! पुन्हा झुंजतां मत्स्य विश्रांतसा रे! ।
रथाहूनि तो आपटे कीं धराया; तशा संकटीं शत्रु आला धराया. ॥ ४९
मत्स्येशांग शतांग अंगनिकटीं बांधोनि नेतां तया
झाले सर्व तटस्थ बंधु सुतही म्याले कृतांता तया; ।
कोणी ही रणमत्त वारण हरी ना पाठिसी लागला;
मौनें सर्व सचीवआदि समूहो होता उभा राहिला. ॥ ५०
मत्स्याकडे खळबळी चमुसिंधु भी रे! तों वाजवी विजय गर्जत दुंदुभी रे! ।
हें पाहुनी नृप युधिष्ठिर बोलिला रे! 'वातात्मजा तव रिपू करिं चालिला रे! ५१
बा रे! हा धजमान मान अथवा जातो रिपूहस्तकीं;
तो आणोनि समस्त मस्तकरिपू दे क्षिप्र सिंहस्तकीं; ।

१. घोडे. २. पायदळ. ३. मुहूर्त म्ह० दोन घटका. ४. दिवस, सूर्य. ५. धनुष्य. ६. सेना. ७. पळसाचें झाड. ८. यमाला.

जेथें तूं असती शशीकुळनिधी तेथें जया वास कीं;
यासाठीं मज आज सत्य सुचलें, तूं संगि यावास कीं.' ॥ ५२

वंदोनि पाय मग अग्रज भीम साला पाहे रिपूजनवधार्थ भला मसाला, ।
जाणोनि धर्म करणी धरणीपती रे! वारी प्रभंजनसुता गुणसंपती रे!॥ ५३

'बा! मानुषी कर्म करोनि दावीं; हे सर्वदा गोष्ट किती वदावी? ।
जा सोडवीं सत्वर राजयातें; दे शत्रुला क्षिप्र पराजयातें.' ॥ ५४

केलें रक्षक भीम भीमरथिचें माद्रेय दोघांस रे!
गेला भीम करावया परदळा सान्यांस कीं घास रे! ।
राया! धर्म अधर्मवातहि कदा ज्याच्या मना लागला
नाहीं, तोहि रथस्थ कार्मुकशरा घे हस्तकीं चांगला. ॥ ५५

नमस्कारुनी धर्मबंधूस भावें, रणा चालिला पिंगदृष्टी स्वभावें, ।
बहू लागवेगीं रिपू जाय त्यातें म्हणेना रणीं शब्द लागे पित्यातें[2]. ॥ ५६

'देतां पाठिस लाज राजतनया वाटे कशी ना मता?
राहे काय विचार मंद अबुधा वंशीं तुझी नामता[3]?' ।
ऐसा शब्द कठोर ऐकुनी फिरे तेव्हा चमूभार तो
मारी भीम प्रचंड बाण, उतरी साराच भूभार तो ॥ ५७

ऐसे पांडव चारही नरपती तों पांचवा शंख रे!
वैराटीं परसैन्यनाश करती ते सर्व निःशंक रे! ।
तोही मस्त त्रिगर्त नाशित चमू यार्चीनि घाता करी;
ये युद्धा नृप कंक त्या रथ हया सूतासि घाती करी. ॥ ५८

तो भीम केवळ कृतांतचि साच बाणे; विंधी त्रिगर्तपति निष्ठुरसा च बाणें; ।
नेले कृतांतसदनीं हयसारथी रे! तेणें दशा रिपुचमूंत असार थीरे. ॥ ५९

सुशर्मा पळे टाकुनीयां रथाला; धरी भीम कां जेंवि त्या वारणाला; ।
अहो! सिंह तैशापरी केश सारे शिरींचे कुरुवर्यलोकेश[6] सारे. ॥ ६०

मही घोळुनी भीम पाऊल टेंकी; तयाचे शिरीं त्यावरी ऊलटें कीं; ।
रथीं बांधुनी आणिलें ओंगळाला, नृपा गर्व त्याचा स्वभावें गळाला. ॥ ६१

न आला त्रिगर्तेश जों बंधनेसी, नृपा! तोंच कीं मत्स्यनिर्बंध नाशी; ।
अशाच्या पुढें तो रिपू मंदला हो! जिता आणितां थोर आनंद लाहो.॥ ६२

---

१. मनुष्य. २. भीमाचा पिता वायु त्याला. ३. कीर्ति. ४. यम. ५. इच्छीला. ६. कुरुश्रेष्ठ भीम.

नृपा ! तेव्हां झाला जयजयरवाचा गलबला;
बळा या रायाच्या जन सकळ घेताति सबळा; ।
बळात्कारें शत्रूचमु निबिड भंगोनि परमा,
रमावंता राया ! तव करिं वसे शत्रु परमा. ॥ ६३

नृपा वाहिनी[1] सर्व आनंदली रे! तुरें वाजती तेन भी मंदली रे! ।
वदे भूपती धर्मजीला भला हो! 'तुम्हा विक्रमानें जयो लाभला हो! ॥ ६४

गेले जें यश शत्रुहस्तकमळीं भंगोनि सन्मान रे!
तेंही सोडुनि आणिलें रिपुयशा हा भार जन्मा न रे! ।
माझ्यानें उतरे, अरे गुणनिधी ! तूं सोयरा साच कीं;
केला धन्य रणांगणांत चतुरीं ऐसा तमासाच कीं. ॥ ६५

चौघे विक्रमसिंधु[2] बिंदुवत कीं हे वाहिनीनाथ[3] रे!
यांचे दृष्टिसमोर थोर सजली ते वाहिनी ना थरे; ।
कीं हे चारहि वेदरूप मजला तारावया श्रीहरी
एथें सत्यचि पाठवी म्हणउनी केली रिपूत्रोहेरी[4]. ॥ ६६

यतीवेषें साचा हरि हर विधी कीं सुरपती
पतीतां शत्रूंचे गण तव शराग्रें करपती; ।
पतीशापाची ते जड अजड रामें पदरजीं
अजी केली तैशी तुम्हि मम धरूनी पदर जी! ॥ ६७

या बलवास समरीं समता कराया, नाहीं पराक्रमि विराजित लोक राया! ।
केला रिपूनग सरी घटिकेंत राई; या होइजे वद कसें यति ऊतराई? ॥ ६८

जें वर्तमान तव मानससैारसीं रे! इच्छा असे नवसुधारससारसी रे! ।
तें सांग सर्व मदगर्व रिपूजनाचा तूं नासणार हरि अंतरिं पूजनाचा. ॥ ६९

न दें मी जरी मागणें मानसाचें, तरी या जगीं जीवणें मान साचें; ।
पशूच्यापरी कीं मला वांचवीलें; रिपूच्या यशा मत्करीं सांचवीलें. ॥ ७०

जैसा भक्तनिदान दानवरिपू पाहूनियां तो करी
घेऊनी निज चक्र जें प्रथित रे! ये धांवुनी लौकरी; ।
वारी सर्वहि संकटा कटकटा तैशा परीचा रजी,
येऊनी तुम्हि आणिला हरविला मद्विक्रमाचा रजी.' ॥ ७१

---

१. सेना. २. पराक्रमाचे समुद्र. ३. सेनापति. ४. पराभव. ५. कमलांत.

संतोषला नृपति गौरवितां तयांतें; दे केंवि उत्तर नृपोत्तम तो तयातें; ।
तो धर्मराज तव पूर्वज ऐक सारे जो वेष घेउनि असे द्विजलोकसा रे ! ॥ ७२

'त्वां पाळिलें दुर्घट वत्सरा या चौघांजणालागुनि मत्स्यराया ! ।
तें अन्न तूझें यश देववी रे !' बोले असें ज्या यमदेव वी रे ! ॥ ७३

'आम्ही पात्र दयेस सर्व हि तुझ्या झालों नृपाळा ! खरे;
तेणें सर्व विराजलों मनभरें तेंची कृपा लाख रे ! ।
राया ! जाण अपारखे न अमुतें आहे धनी आस रे !
राहावें तव संनिधीं गुणनिधी हेची मनीं आस रे !' ॥ ७४

देखे धर्म अधर्मवंत रिपु जो मत्स्येशगाई बळी,
त्यातें भीम करूनि मुक्तकेंबरी सारे रथीं आंवळी; ।
तेणें फार कनिष्ठ कष्टति रिपू देखे दयासिंधु जी !
पाहोनी नृप सोड सोड म्हणुनी त्या बोलिला बंधु जी ! ॥ ७५

त्रिगर्ता म्हणे भीम, 'तूतें जगावा जरी जीव वाटे, तरी आज गावा ।
नृपाच्या पुढें शब्द कीं 'दास मी रे ! असे जन्मपर्यंत पायां नमीं रे !' ॥ ७६
दयाळू वदे धर्म भावास राया ! 'अगा शीळवंता ! प्रिया वासरा या ।
उगें सोडुनी देइं या कुश्चिताला; जसें प्रेत ओपोनि देती चितेला.' ॥ ७७

एवं असा तो खळ मुक्त केला; जो लागला दैवगती भिकेला; ।
गोपाळ गाईगण सांवरूनी, नेती घरा शत्रुयशा वरूनी. ॥ ७८
मत्स्येशही फार आनंदला रे ! तये दिनीं त्या स्थिरवी दळा रे ! ।
वार्ता जयाची नगरास धाडी; तों उत्तरे ये कुरुसैन्यधाडी. ॥ ७९

'तिथी सप्तमी अंधकारी तमिस्रा; वळाव्या त्रिगर्ताधिपें मत्स्यउस्रा; ।
दुजे दीन मानी कुरुविक्रमानें गुरें उत्तरेचीं हरावीं क्रमानें.' ॥ ८०
असा नेम नेमस्त होतांचि आधीं, जया पांडवांची मनीं फार आधी, ।
त्रिगर्तें दिलें मत्स्यराया तयाला नसे ठावुकें हें कुरुराज याला. ॥ ८१

नेमानुरूप कुरुवंशकुमार सारे, सज्जोनि चक्र धरि हेत असारसा रे ! ।
कीं पांडुनंदन भले वळखोनि राना ते पाठवूं नर प्रियंकर जे पुराणा. ॥ ८२
शंभूशिरींहुनि गळे जगतींत राया ! जे जन्मवी हरिपदीं जगती तराया; ।
तीचा सुपुत्र कुरुवृद्ध महामती घे द्रोणादि ही द्विजसमागम विप्र तीथें. ॥ ८३

---

१. केश. २. रात्र. ३. गाई. ४. दुःख. ५. पुराणपुरुष कृष्ण याला.

कर्णादि आप्तजन बंधु समग्रही रे! घेऊनि मत्स्यमहि येत दुराग्रही रे! ।
झाले जरी निरस मार्ग शकून त्यांतें, लंघोनि येत अत्रेच दया न त्यांते. ॥ ८४

वेतंड[1] ऐसे चरती रसाळा वनांत गो सुंदर गोरसाळा; ।
देणार जाल्या धनमोहरीती, सैनीक दुर्योधन मोहरी ती. ॥ ८५
सारों शता गोकुळ पाखडाना, न एक धेनू चरतां खडाना; ।
तैशा वनीं ते धनमोहरीती, सैनीक दुर्योधन मोहरी ती. ॥ ८६
'गोपाळ जो चक्रसमूह रावा आकर्णुनी गोगण मोह रावा, ।
पुरास तो गो पैरराउतांनीं नेल्या गुराखे करुनी उतानी. ॥ ८७
भूमी जया येउनि गोप राया! निवेदिती कीं तव गोपराया; ।
...करी कौरवराउतांनीं नेल्या गुराखे करुनी उतानी. ॥ ८८
...स्यदेशांत साऱ्या जमाती रिपूच्या विजेतुल्य ज्या तेज माती; ।
...वड शब्दा महा हो करीती; गुरें वासुरें गोपही होकरीती. ॥ ८९
तूं राजपुत्र असतां नगरी पैरांनीं नेले तुझें सकळ गोकुळ गोप रानीं; ।
होते तया रिपु विलंब न लाव राया! शत्रूयशास समयो बनला वराया.' ॥ ९०
हें वृत्त ऐकुनि नृपात्मजबापराणी गेहासि जाउनि वदे बहु गोपराणी; ।
'गोयुक्त सर्व हरिलें कुरुदुर्मदांनीं; या कारणें मन अपेक्षित युद्ध दानीं. ॥ ९१
कुरुसैन्यउत्पात ऐकोनि कानीं, बहू घाबरोनी जनीं वर्तकानीं; ।
दिला धीर सोडोनि कीं ग्रामनोहो, नसे शत्रु ये त्यास कर्ता मना हो.' ॥९२
'माझे बाण प्रचंड चंडकिरणी तेजाळसे वागती;
जेव्हां घोर रणांगणीं रिपुगणीं तेव्हांच सेवा गती; ।
अर्जावी मम किंकरा ... खरी किं टाकिजे हे महा;
सोडीना सहसा दिलें जरि गुरू त्यानें बहू हेम ही. ।। ९३
पळे रिपू मत्कारिं कंडना दे जो त्या जगा या विधिअंड आदें, ।
ठावो घडी कीं मम बाणजाळीं शत्रू कुळा दिग्दशही उजाळी. ॥ ९४
ईशाम्मनाचे ...रणार तीवे दिग्मंडळी त्या चरणा रती घे; ।
त्यासी रणा एकहि विक्रमी हो विनामहा दुर्धर शक्र भी हो. ॥ ९५
ज्या लुटिला कौरवि गोपवाडा, नेणोनि मच्छौर्य धडा पवाडे; ।
भंगीन त्या दुर्मद मानवासी; देवेंद्र जैसा वधि दानवासी. ॥ ९६

१. हत्ती. २. शत्रूचे स्वारांनीं. ३. शत्रूंनीं. ४. नाथ, पति. ५. सूर्य. ६. सेवक. ७. ब्रह्मांड. ८. मनुष्य.

जरी असे मद्राथि सारथी हो! तरी कुरूसैन्यमहारथी हो! ।
मिळे धुळी मच्छरतीक्षणानें हे दावितों हस्तगती क्षणानें. ॥ ९७
मी पार्थ दोघे जगतीतळा ही बाणें करू विक्रम तींत लाही; ।
दोघांसरी हे सकळां कळाया, येते मिळाल्या रथ आकळाया. ॥ ९८
झांकीन बाणीं जगती नभा जी! कीं एकपत्रें जग तीन भाजी; ।
ऐशी रणीं दाविन कूसरी कीं जगांत मी पार्थच दूसरा कीं. ॥ ९९
कुंती जगीं कीं मम मावली हो! सत्पुत्रकीर्तीत न मावली हो! ।
ऐसें समस्तांस वदावयाचा प्रसंग ही विक्रम दावयाचा. ॥ १००
परी नाहीं कोणी हयगुण धराया चतुरसा;
रसाळा बुद्धीचा रणकरशशी ही अतुरसा. ।
जसा श्रीकृष्णाचा प्रियकर तसा जाण मज गे!
जगें तीन्हीं बाणीं बुजविन खरें तूं समज गे! ॥ १
पाहोनि माझ्या शरलाघवा रे! तटस्थ शत्रूजन आघवा रे! ।
होता महाविक्रम लागवाया, गेला नसे कीं रथ वागवाया. ॥ १०२
माझे दृष्टिसमोर थोर रिपुचा हा चक्रसिंधूर जीं
कीं मी शुक्रप्रदीप्त शत्रुसमुहो हा सर्वही धूर जी! ।
पार्थातुल्य करूनि विक्रम जगीं मी दावितों राजया;
भीष्मादीक प्रतापवंत समरीं निर्भंग तोरा जयां. ॥ १०३
मी पार्थ एकासरिलक्षितीसी कळा भली दाखवितों क्षितीसी; ।
जे नाय त्यांचा नृप नास कीं रे! ते बेसना अस्तलि नासकी रे! ॥ १०४
मैदकळकळपातें एक जेवीं हरी तो निज खरनखशस्त्रें त्याजला संहरीतो; ।
रिपुचमु सगळी मी त्यारिती एकला ही करिन शरहुताशें सर्वही एक लाही.'॥१०५
असा अंगनांचे समूहीं वदे हो! नृपा तोच कीं बोल निर्जीव देहो. ।
सुदेष्णा बहु मानुनीयां सुतासी, म्हणे, 'जन्मला धन्य माझे कुशीसी.' ॥१०६
मी पार्थतुल्य वदला अपणा जसा हो! हें ऐकणें विषम भावुनि राजसा हो, ।
ते द्रौपदी करि विचार मनीं भलासा; जेणें फळेल नृपनंदन नीभलासा. ॥१०७
जोडोनि हे तळमळा कमळासरीची, ते द्रौपदी परम सुंदर कूसरीची, ।
बाणी करूनि वदली नृपतीसुतासी, ते ऐक सादर नृपोत्तम! या सुतासी. ॥१०८

---

१. कौशल्य. २. घोड्यांचे पारखे. ३. हत्तींच्या कळपाला. ४. सिंह. ५. शत्रुसेना. ६. अग्नीनें. ७. स्त्रियांचे.

'बृहन्नळा अर्जुनसंगतीसी जाणे रथा, वागवि त्या गतीसी; ।
सारथ्यकर्मा करुनि भली ते महारणीं दुर्धर नीभली ते. ॥ १०९
सारथ्या जरि करि ते धरि कामनासी राया समग्र पुरवीं मनकामनेसी; ।
राजात्मजेवरि तिचा बहु हेत आहे, सांगीतल्या करिल निश्चयरूप साहे.'॥ ११०

कुरुमणिरमणीच्या ऐकुनी उत्तरातें
परम नवल वाटे भाव हा उत्तरेतें. ।
हरिसुत रथदोरे वागवी हे कशी हो?
अबळतनु धरि ती बोल हे काकसी ही. ॥ १११

भूमिंजयें निरखुनी भगिनी रसाळा वाणी म्हणे, 'जरि असे जननी रसाला, ।
बोलावणें तुज अयोग्य; तथापि तीला जाऊनि आणि गुणवंत कलावतीला.॥ ११२
जरी आज सारथ्य माझें करी ती, तरी फारसे बोल लौकीक रीती.' ।
असा ऐकतां शब्द बंधूवराचा, उठे जाय आणावया बी वराचा. ॥ ११३

चाले हंसगती न शुद्ध तगती लक्ष्मीच साचार ती;
पावेना स्वरुपा तपा करुनि ही तीच्या रती कीं रेती. ।
ऐशी ते विधुआननी सुनयनी आली स्वनृत्यालया;
वंदोनी गुरुतें म्हणे, 'मम मनोचिंतेस ने त्या लया.' ॥ ११४

बृहन्नळेलागुनि ते नवीना, बोले सुधातुल्य अमानवी ना; ।
'कीं कौरवीं गोससुदाव नेला; सगोपही बांधुनी दौंवणेला. ॥ ११५
भूमिंजयो उदित त्या सह कीं रणाला, झांकीन बाण सरळी रविकीरणांला; ।
ना सारथी म्हणुनि फारचि बोम लागे; बोलावण्यास तुज पाठविलें मला गे!॥ ११६
विज्ञापना निकट माडुनि आजि योजीं हे हस्त स्यंदनगुणीं उभयो जयो जी! ।
घेऊनियां अखिल तोष जना कराया, तूं सूत श्रेष्ठ जंव मातलि नाकराया.'॥ ११७
हांसोनि नाटकि वदे 'सगुणे नवोढे! मी सूत्रधार रथ सज्ज गुणीं न बोढे. ।
माझ्या करें परि सुधारसतुल्य माते मानीन हो तव अखंडित हेत माते.'॥ ११८
बृहन्नळा घेउनि राजकन्या आली स्वबंधूसदनांत धन्या. ।
विचारिलें तीस विराटबाळें कीं, 'जाणसी सूतरितीस बाळे! ॥ ११९

---

१. नवऱ्याचा बाप म्ह० अर्जुन. २. अल्प. ३. चंद्रमुखी. ४. दावें, गुरें बांधण्याची दोरी. ५. वाईट वाटे. ६. रथाच्या दोन्या धरण्यांत. ७. सारथी. ८. इंद्रसारथीचें नांव. ९. इंद्र. १०. हे मुली. (नतन यथाज्ञान अविवाहित मराठी हा मराठ्यार्थ.)

सैंरंध्री तंव सांगतां गुणकथा आनंद झाला मना,
'पार्थाचें रथिं सूतकर्म करुनी होते सुनि:कामना;' ।
हें ऐकोनि मनांत हेत जडला कीं पार्थ ऐसा जनीं,
'मानोनी मम स्यंदना निज करें त्वां सज्जिजे साजणी'!॥ १२०
'पाहें विक्रम आज हो! रणमहीमध्यें भला दावितों,
चापाचे रेंव चंड गर्जुनि धरा आकाश नादावितों. ।
भीष्मादीक रणीं प्रतापतरणी युद्धास येतील ही;
बाणीं जर्जर त्यां करीन सहसा मानीन मी तीळ ही. ॥ १२१
माझें कार्मुक गांडिवासम रणीं बाणा विजे तेधवां,
ते तूं पाहुन भाविसी मज दुजा जो हृत्सखा माधवा. ।
आहेत जरि कौरवी दळपती विख्यात, तें मी न गे!
लक्षा आणित, सर्व बाण अॅनळीं भाजूं जसे मीन गे!'॥१२२
बृहन्नळा त्यावरि उत्तरासी जें देत या मूवर उत्तरासी; ।
तें ऐक बा! तूं मतिवैभवाचा, मी सांगतां ही हरि लोभ वाचा. ॥ १२३
'रथा कैसें सज्जूं धरुनि हयरज्जू नख मळा
कळेना हें सांगूं तरि तव तुम्हां तो न खमला; ।
मनीं जातों ऐसें कठिणतर चित्तीं निवडिलें;
म्हणोनि निर्व्याजें करण रथसारथ्य पडलें. ॥ १२४
जो गाइला निज पराक्रम कर्णरंध्रीं, तो आयकोनि मज भाव गमे पुंरध्री; ।
बाळासमान तव विक्रम लेखिला जी! तो पाहिजे विशद अंबकिं देखिला जी. ॥
म्यां सत्य पार्थहयरज्जुस वागवालें या हस्तकें, परि बहू दिन त्यागवीलें; ।
आतां करीन रथ सज्ज विधी नवा जी! वेगें सशस्त्र रथ सुंदर आणवा जी!' ॥१२६
तिचा शब्द ऐकोन गाबाळसा रे! बहू हर्षला जो रणीं बाळसा रे! ।
त्वरें आणवी ज्या रथीं साज वाजी, न जीता म्हणे तो रथा साजवा जी!॥१२७
बृहन्नळा त्व सकारण भाव दावी, ते काय बा नरपती! तुज म्यां वदावी? ।
योजी रथीं हय अईसेज उफराटे डेंक्षापरी तुरगकंठ कशी चेंराटें. ॥ १२८
घेऊनि टोप कवचा करि भाव नाना; 'हा देह कीं मम असे नर अंगना ना, ।
या केंवि भूषण करूं सज हें कळेना; हा भार ही मज तनूवर आकळेना.' ॥ १२९

---

१. पराक्रम. २. ध्वनि. ३. सूर्य. ४. धनुष्य. ५. अप्रीत. ६. निष्कपटानें. ७. स्त्री. ८. डोळ्यांनीं. ९. बैलांसारखे. १०. दोरीनें. ११. स्त्री.

त्या अंगना सकळ पाहुनि हांसतीशा जाणोनि पार्थ मग सिंधुसुतासतीशां ।
ध्यावोनियां रथ यथामति साजवीला; लेवूनि टोप कवचा गुण वाजवीला. ॥ १३०

'चालावें यजमान मानवपतीपुत्रा कुरुवाहिनी
भंगाया सकळा कळा कुरुकुळा जे कां द्विषन्मोहिनी; ।
आतां शक्तिमतिप्रमाण करितें सारथ्य मी ही तसें
कीं जाणें तव शत्रु कंदनविशीं होऊनि ये ही तसें.' ॥ १३१

बृहन्नळाचरित पाहुनि राजभाजा संतोषयुक्त वदली सुतबाळभाजा; ।
'वा! युद्ध देउनि रिपू निज गोधनासी जोडोनि आण कुरुचक्रयशोधनासी.' ॥ १३२

जातां वदे नृपसुता गुणउत्तमा जी त्या बंधुवर्यगुरुतें मृगराज माजी, ।
'भंगोनि कौरवदळांतिल क्षात्रिकांशीं, आणा चिरें सरस कृत्रिमपुत्रिकांशीं.' ॥ १३३

म्हणे पार्थ, 'तूझा जरी बंधु रागें वधी कौरवांच्या दळींच्या धुरा गे! ।
तरी वस्त्रभारा विचित्रा रथीं मी वरी घालुनी आणितों सारथी मी.' ॥ १३४

सुदेष्णेच्या पायां नमन करितां राजतनयें,
'नये सौभाग्यात्री' वदत 'गुणसारा नतन ये; ।
न ये द्वंदी हाता सबळ जरि झाला परम ही,
महींद्राचा पुत्र तरि वचक मानी परम ही. ॥ १३५

अगा माझ्या बाळा! कर शरउत्राळा रिपुस रे!
सरे नाशा बाणी सकळ अरिठाबास पुस रे! ।
सरे पार्थाचे तूं तव सुतपणें मी गजगती,
गतीचा मानीतें निरस तर या सर्व जगती.' ॥ १३६

मनीं जाणुनीयां रिपुत्रास तीनें रणा बोळवीलें सपुत्रा सतीनें; ।
पुढें ऐक युद्धप्रसंगास मानें; तुझें बैसणें विप्रसंगासमानें. ॥ १३७

अध्याय पंचम जगद्रुप यादवानें केला समग्र जगजीवन माधवानें; ।
जो ऐकतां त्रिविधें ताप हरी मनाचा; गर्जे गिरा रव असा हरि वामनाचा. ॥ १३८

अध्याय सहावा.

मनोभृंगा शृंगारित पदक जाते परम हो!
महोत्साहें ज्यातें स्तवुनि भवसंकल्प रम हो! ।

---

१. समुद्रकन्या लक्ष्मी व दक्षकन्या सती यांच्या भर्त्यांना म्ह० विष्णु व शिव यांना.
२. भावल्यांकरितां. ३. आधिभौतिक, आध्यात्मिक आणि आधिदैविक असा तीन प्रकारचा ताप.

अहोरात्री गावा हरि भव उगावा करिल गा !
    लगामी तूं राहें मग चिदचि हो गा जिवलगा ! ॥ १
मना नामें होसी विणघणि जना हो अमर जी !
    रजीं ज्या पायींच्या धरिति गुण सारा भ्रमर जी ! ।
अजी ताता व्हावें त्यजुनि भवतृष्णा सकळ गा !
    अगा मित्रा ! साचा जड अजड कृष्णा सकळ गा. ॥ २
मना ! कां बा ! मिथ्या धरुनि भवसंकल्प रमसी ?
    असीपत्रीं कांपे नभ तरि वडे हें परम सी; ।
अशी इच्छा साची यशकर नसे जे गुणवरा,
    धराया संकल्पीं मन धरुनि ठायीं गिरिधरा. ॥ ३

जन्मेजया ! परिस सादर अग्रभागा; जो सूर्यतुल्य करि अंतरिं चित्प्रभा गा ! ।
भूमिजयोरथ धनंजय चालवी रे ! तें ऐकुनी कथन दुर्भव मालवीं रे ! ॥ ४
रवीचंद्र एके स्थळीं जेविं भाती, तशी तेधवां दों जनांची प्रभा ती ।
उजाळी विधीअंड[2] आकाशमूर्ते असे चालिले या जगाचे प्रभू ते. ॥ ५
जयाचे रवें कोंदले कान साचे, रिपूचे असे वाजले जी न साचे, ।
नगारे विराटालयीं राजसा रे ! पुरस्थांस तेणें गमे धीरसा रे ! ॥ ६
बृहन्नळा सत्वर यानवोढा, दावा पथीं अल्पवया नवोढा[3]. ।
तों भेटल्या सन्मुख साजिल्या त्या, पार्थें शिवाशा[4] मनिं पूजिल्या त्या. ॥ ७
जगामाजि जो एक होऊन माया करी तोच कीं हृत्सरोजीं[5] नमावा; ।
मना आठवीं तो सखा सोयरा हा; तयासी सदा तूजला सोय राहा ! ॥ ८
मुखीं वेद नांदे, करीं पुष्पजाती, असे भेटले श्रेष्ठ दोघे द्विजाती; ।
हरीरूप मानूनि वंदी कपाळीं, जयानें रणीं तोषवीला कपाळी[6]. ॥ ९
झाले तया शकुन युद्धपथीं भले गा ! या कारणें नरपती यश लाभलें गा ! ।
आले समीप कुरुचक्र निरीक्षिती ते तों मत्स्यदेशसरसी न रिती क्षिती ते. ॥ १०
कुरूंच्या दळीं दुंदुभी नाद वी गा ! रवें त्याचिया भू नभा नादवी गा ! ।
ध्वजाचे फरे देखतां रंगरंगी, बहू खोंचला मत्स्य तो अंतरंगीं. ॥ ११
येरीकडे कुरुपती जनसेवकांनीं गाई वळूनि बहु पांडव शोधकांनीं, ।
येईल मत्स्यनिजगोधनवृंदें[7] न्याया, ते पाहती पुरपथीं करुनी अन्याया. ॥ १२

---

१. 'विषमतर कीं हे वसुधरा' असाही पाठ आहे. २. ब्रह्मांड. ३. स्त्री. ४. भवानीसारख्या. ५. हृदयकमळांत. ६. सदाशिव. ७. समूह.

अकस्मात तों देखिलें ज्या रथासी असे सूत नारी पुरीच्या पथासी; ।
असा येतसे बाळही एक ज्यांत; विराजे जसा षट्पदी पंकजांत. ॥ १३

झाले तटस्थ कुरुचे दळिं चित्रमानें, ते पाहतां सकळ अंतरि [illegible] मानें; ।
कीं सर्प देखुनि अजा जशि स्तब्ध राहे झाली कुरूंस गति उत्तम [illegible]! हे.॥१४

ज्याचे कृपानेत्रकटाक्षपातें नाशे भव भ्रांततम क्षेपा ते,
जो चिद्रवी केवळ शासिता गा! वर्णत्रयांब्जास विकासिता [illegible] १५

मुखाब्जीं धरे वेदभृंगा रितीनीं; शरें शत्रु मंगोनि शृंगारि, तीनी ।
जगें विक्रमानें मला देव मानी जया शिष्यवर्या रणीं शीव मानी. ॥ १६

कुरुपतिगजछावे ज्या करें साजलेरे
सकळ हि धनुविद्या साधुनीं साजले रे! ।
जैळद शर क्रमीतो ते कुरू बिंदु सारे
हरिसुत करि माये एकला सिंधुसा रे! ॥ १७

सदयतर खरा कीं माय दीना जनांचा,
अभयवरद सान्वा द्रौपदीरंजनाचा; ।
अदय तरि कृतांतासारिखा युद्धदेशीं;
चतुर सुरगुरूसा मान्य जो शारदेसी. ॥ १८

तसा द्रोण दुर्योधना भाव दावी; कथा लागली तेच आतां वदावी; ।
तरी ऐक त्या सर्व ही विस्तरासी करी तुच्छ मिथ्या भवा दुस्तरासी. ॥ १९

कुरूंचा गुरू पाहुनी चक्रसा रे! म्हणे, 'आज निभ्रांत हा चक्र सारे ।
दिसे काळ संधान दुर्योधना रे! त्वरें लांबवीजे तुम्ही गोधना रे! ॥ २०

नभीं मेघ रक्तास ते थुंकिती रे! अभद्राकरा भालुका भुंकती रे! ।
पशू अंबकीं गाळती नीर सारे; स्वचक्रीं दशा वाणली नीरसा रे! ॥ २१

समस्त ही सैनिक चित्त पाही अतोष धूम्रावरणांत पाही; ।
वाटे यशोदान रिपू कराया दाता खरा होसिल लोकराया!' ॥ २२

तों ईकडे उत्तर भीटकेळा म्हणे, 'वृथा कीं रणआट केला; ।
हे पाहतां कौरवसिंधुवेळा, मूर्छा मला भेटत वेळवेळां. ॥ २३

---

१. भ्रमर. २. कमळांत. ३. शेळी. ४. काळोखरहित. ५. रात्र. ६. कमळास. ७. मेघ. ८. सरस्वतीला. ९. अशुभकारका. १०. कोल्हा. ११. डोळ्यांनीं. १२. यूहलडेला. १३. कौरवरूपी सागराचा लाट.

जे शब्द कानास कवीं न ठावे, घेती तसे द्वेषिदळीं उठावे; ।
ते ऐकतांची ध्वनि वेगळाले, ईष्वास हस्ताहुनि मद्वळाले. ॥ २४
बृहन्न... सत्वर टाकि गे! हा विचार युद्धापर टाक गेहा; ।
न ... मी कौरवसागरासी तरावया विक्रम आगराशी. ॥ २५
मी ...ा नृपमत्स्यदिग्गजवराचा कीं खरा मान गे!
...आतां पावन कायसा करि हरी त्या आखरा मान गे! ।
आतां स्यंदन चालवीं पळवि तूं गुंतूं नको ये मही;
शत्रू दुर्धर कौरवी दळपती कांपेल या येम ही.' ॥ २६
अशी ऐकतां उत्तराची गिरा जी! वदे सोयरा सेव्य जो योगिराजीं; ।
तयाला बहू हांसुनी, 'कीं भला गा! तुझा बोल युद्धांगणीं नीभला गा! ॥ २७
'मी विक्रमें केवळ सव्यसाची' ते गोष्ट दावीं उभवोनि साची; ।
न योग्य तूझ्या विमळाकुळासी कीं बुद्धि कीजे रणव्याकुळाशी. ॥ २८
तूं मत्स्यवंशीं कुळदीप कीं रे! न हें तुला देइल बोपकी रे! ।
जातां घरा टाकुनि गोवळाला, द्विषज्जनीं जो गण गोंवळाला. ॥ २९
रणांत ज्या धैर्य अगाध राया! तो धन्य कीं क्षात्रकुळीं धरा या; ।
टाकोनि ऐसा कुळधर्म हा रे! जातां वधू हांसति कीं महा रे! ॥ ३०
सुरादि किंनर महारथी रे! न ज्या रणीं त्या नरसारथी रे! ।
होतें न अद्यापि मला जयाची वाणी रिपू क्षिप्र पराजयाची. ॥ ३१
शशीच्या परी शौर्यता मित्रें दावी; तर्थी वैनतेयास गोष्टी वदावी. ।
असें हें घडे उत्तरा! एकदां रे! जयावीण जाणें परी ना कदा रे! ॥ ३२
'हरीच्या सुतातुल्य मी एक बाणें वधीं शत्रुवृंदांस निःशंक बाणें;' ।
असें बोलिलासी वधूंच्या समाजीं; करूनी तयां दाखवीं विक्रमा जी! ॥ ३३
फिरेना जयावीण मी सर्वथा गा! उगा बोलुनी शीणशी कां? वृथा गा! ।
स्वभावो तुला विक्रमाचा न ठावा; तरीं घेतला एवढा कां उठावा?' ॥ ३४
रथाखालती टाकुनी पावलाला, पळाला अशा भूपतीच्या मुलाला ।
नृपा! पाहुनी पार्थ धांवे गतीनें; करीचा भला जो हरी संग तीनें. ॥ ३५

---

१. शत्रूच्या सैन्यांत. २. धनुष्य. ३. रथ. ४. भाषण. ५. अर्जुन. ६. बायका. ७. सत्वर. ८. शरण्या. ९. शौर्य. १०. गरुडाला. ११. इंद्राच्या. १२. समुदायाला. १३. बायकांच्या. १४. पराक्रमाला. १५. उथळ.

कंच धरुनि मुलाचे ते रथीं तीनदा रे ! ।
बसवि करसरोजीं तेधवां तीनदा रे ! ।
'रिपुशरहुतवाहीं जाळ मजीवना हो !'
नृपसुत वदला त्या द्रौपदीजीवना हो ! ॥ ३६

'देईन कुंजर क्रमेलक वाजि वा रे ! ग्रामें धनें सकळही विभवा जिवा रे ! ।
या वांचवीं त्वरित नेउनि मत्पुरासी, अर्पीन साच तुज कंकणनूपुरासी.' ॥ ३७

'न उत्तरा ! मी धनलालची रे ! रणीं रिपूशोणिंतलालची रे ! ।
पाहावया वीण सुखप्रदा या भवप्रियाचाक्षर संप्रदाया.' ॥ ३८

येरीकडे कौरव गोहरोनी तटस्थ सारे रथ ओं हरोनी ।
तों देखिला सिंधुजबीजसा रे ! येतां जयाचे तुम्हि बीज़ सारे. ॥ ३९

भीष्म द्रोण चिरंजिवी कृप तथा कानीन आदीकसे
पाहोनी रथ एक थकित मनीं विस्मीत आदीकसे; ।
कीं ये मूल रथांत एकट बघू अश्वागुणा वागवी;
वाटे विक्रमवंत शत्रुसमरीं निःशंक हा वागवी. ॥ ४०

कुरूदळीं कौतुक भाविती रे ! कीं सारथी दिव्य प्रभावती रे ! ।
ये सुंदरी घेउनि बाळसें रे ! न ज्यावरी यौवन बाळसें रे ! ॥ ४१

कोणी तर्क कुतर्क सज्जुनि मनीं संतोषवीती तसे
राजा मंदगिरा सुरेंद्रनगरा मानी च वीती तसे; ।
आश्चर्या करिती विचार सुमती कीं दुर्मना मावशी;
जेणें शोधुनि मारिली हरिच तो दावी खरी मावशी. ॥ ४२

अगस्ती कुरूचक्रसिंधूस हा रे ! असें ही विती कल्पिती तो महा रे ! ।
तपाचा निधी द्रोण संकेत मातें वदे शांतनूविष्णुभक्तोत्तमातें. ॥ ४३

'लंकापतीवनविदारण लोकमानी ज्या नाम रे ! नगनगांतकपुत्र मानी, ।
हा अंगना धरित वेष खरा किरीटी जिंकोन नेइल अम्हास गुरें किरीटी. ॥ ४४

म्यां ओळखीला बरवा मनाचा जो सोयरा चिद्घनवामनाचा; ।
हा क्षोभल्या नेइल कीं लयाला त्या धार्तराष्ट्रा अंगुणालयाला.' ॥ ४५

१. केंस. २. कमलानें. ३. शत्रुरूपी अग्नि. ४. हत्ती. ५. उंट. ६. घोडे. ७. रक्त. ८. मुलें, बंशज. ९. कुमारीदशेंत कुंतीला झालेला पुत्र कर्ण. १०. सुंदर स्त्री. ११. तारुण्य. १२. पुतना. (आईची बहीण). १३. मागेस, कपटास. १४. भीष्मास. १५. रावणाचें वन मोडणारा. (मारुती.) १६. पर्वतभेत्ता इंद्र याचा पुत्र. (अर्जुन.) १७. बायको. १८. कृष्णाचा. १९. दुर्योधनाला. २०. दोषांचें घर.

तों ईकडे उत्तर स्यंदनाला टाकोनि जातां कुरुनंदनाला ।
ये राग कीं क्षुल्लक फार साची नेणे चवी युद्धमहारसाची. ॥ ४६
नृपा! जंभभेदीसुतें उत्तरा हो! धरूनी कचीं आणिलें उत्तरा हो! ।
म्हणे, 'राजपुत्रा! अहाहा कसा रे! भिती हांसती कीं रिपूलोक सारे. ॥ ४७
हा उत्तरा! क्षत्रियमार्ग ना रे! घे हस्तकीं कार्मुकमार्गणा रे! ।
वधीं कुरूचक्रमहारथी रे! नाहीं तरी, हो मम सारथी रे! ॥ ४८
जिंकीन मी कौरव आज सारे; त्या कौतुका पाहुनि राजसा रे! ।
सारथ्यकर्मा अवलंब बा! हो! हो धीट चित्तांतुनि लंबबाहो!' ॥ ४९
कांहीं धीर विराटरांटतनया चित्तांत विस्तारला;
तेणें पार्थमनोगतप्रसरणीं अभ्रांतसा थारला. ।
झाला तो परिपूर्त सूत रथ ही केला पुढारां भला;
तेव्हां अर्जुन पाकशासनसरी त्या स्यंदनीं शोभला. ॥ ५०
त्वरित रथ वडघडां भूपतीर्लेकरानें
कुरुदळजनपंथीं आणिला तो करानें; ।
हरिसुत खुण दावी कीं शमीभूरुहासी;
बहुत मज गुणज्ञा काम आहे महासी. ॥ ५१
भूमिजयें नृपतिअश्वगुणा वरोनी नेलें रथा शमिमहाविटपा वरोनी; ।
हा पाहतां निवडिलें मनिं त्यापरी रे! कीं साच होय हरिपुत्र पित्यापरी रे! ॥ ५२
जो गुरू कुरुकुळा सकळा या, तो वदे नृप सुतास कळाया; ।
'पार्थ हा रिपुगणांतक राया! येत या घडि रणांत कराया. ॥ ५३
उडुस्तोम अर्कोदयीं मान राया! न पावे तसा सौख्यधामा नरा या. ।
उगें पाहतां स्तब्ध दैवांहिनी रे! तुझी दीसते सर्वही वाहिनी रे! ॥ ५४
अभद्रप्रदा सूचना पाखुरांनीं बहु मांडली अश्व ही पां खुरांनीं ।
मही खाणुनी धूळवीती जगा या; न हे भावना दाखवी ती जगाया. ॥ ५५
न हा पार्थ सामान्य कीं लोकराया! गणावा रणाब्धींत नौका तराया. ।
सुरेंद्रादिकां जाहला जो खरा हो! सखा ज्यास त्रैलोकिचा मुखरा हो! ॥ ५६

१. रथाला. २. अर्जुनाला. ३. इंद्रपुत्र अर्जुन यानें. ४. धनुष्यबाणाला. ५. योद्धे. ६. हे आजानुबाहो. ७. राज. ८. इंद्राप्रमाणें. ९. इंद्रपुत्र. (अर्जुन.) १०. शमीवृक्षाला. ११. उत्तरानें १२. इंद्र. १३. नक्षत्रसमूह. १४. सूर्य. १५. दैवहीन. १६. सैन्य. १७. त्रैलोक्याचा मुख्य १०. कृष्ण.

दिशानाथ ज्याच्या गुणाला स्तवीती; महीभार ज्याचा करें अस्तवीती; ।
सदाशीव ही फार मानी जयाला; खरा सोयरा हाकिमा नीज याला. ॥५७
असे कोण ऐसा बळीवान काया रणीं धीट ओपील निर्वाण काया, ।
फणीतुल्य ज्याच्या गती सायकाची, न जाणे कळा नांदते अंतकाची.'॥५८
आज्ञापी तंव ईकडे नरपती वृष्णीसखा साच गा!
रायाच्या कुमरास कीं, 'तरुवरीं संभार खासा च गा! ।
शस्त्रांचा बहु चर्मबद्ध कसुनी ठेवोनि गेले खरे
पांडूचे सुत विक्रमीं महिक्रमीं ज्यां शक्रसे लेख रे! ॥ ५९
भुजंगाफणीतुल्य ते ऊर्ध्व ज्याचे शंरस्तोम भाते कपींद्रध्वजाचे; ।
महा चाप उद्दाम गांडीव दे रे! रिपुत्रासशब्दाब्जअंडीं वदे रे! ॥ ६०
सुभद्रापतीच्या पदें ते मला हो.' असें ऐकतां मत्स्य तो बामला हो; ।
म्हणे, 'बांधिलें वृक्षअग्रीं शवा या; कसा योग्य मी त्याजलागीं शिवाया?'॥६१
पुन्हा पार्थ सिंहध्वजाला वदे हो! 'नसे बांधिला सत्य निर्जीव देहो; ।
तुला योग्य पाहोनियां काम दे मी, न अन्नास भक्षूनि मातें मर्दे मी.' ॥ ६२
मृगेंद्रकेतू शमिच्या पैलासा वेंघोनि पाहे तंव कोपलासा; ।
विषव्रजा तेविं शरासनाचे भाते रिपूच्या कुळनाशनाचे. ॥ ६३
बृहन्नळे! लाभ भला भला गे! केला मला मृत्युच लाभला गे! ।
होता सुखीं केविं भुजंगमाचा त्वां धाडिलें त्या विषसंगमाचा.' ॥ ६४
हांसोनि पार्थ वदला नृप उत्तरा जी झाली मला चुक खरी तरि उत्तरा जी; ।
वृक्षाहुनी त्वरित या तुम्हि भूतळा जी! प्रक्षाळुनी चरणहस्तक औतळा जी.६५
जयाचे प्रसादें उभे शीव देवो शिवेचा पती जो सदाशीव देवो, ।
नमोनी तशा भूतनाथा मनानें, भली आपुली सिद्धिसी कामना ने.' ॥६६
नृपा ज्या रिती बोलिलें वीर्जयानें, तसें सर्व साधूनि भूमिंजयानें ।
पुन्हां वेंघला वृक्षखांदीवरी रे! हळूची तसा भृंग इंदीवरीं रे! ॥ ६७
नृपा! त्याची जेव्हां मन भयपताकाच कळली;
तयीं शस्त्रांची ते समुळ मुळ ग्रंथी उकळली. ।

१. इंद्र यम, वरुण इत्यादि दिक्पाळ. २. नष्ट होतात. ३. सर्पासारखी. ४. यमाची. ५. दारुकमित्र. (अर्जुन.) ६. शस्त्रादिसाहित. ७. बाणसमूह. ८. अर्जुनाचे. ९. ब्रह्मांडी. १०. कपिध्वज. (अर्जुन.) ११. वृक्षावर. १२. मनुष्याचे. १३. स्पर्श करा. १४. अर्जुनानें. १५. उत्तरानें. १६. भुंगा. १७. कमळावर.

रवीतेजा ऐशीं प्रथित शरचापें सकळ कीं;
निरीक्षोनी बोले, 'मज धनुलता या अकळ कीं. ॥ ६८
हे पांच ही कार्मुकवेल भा यां हेलीपरी कोण करील भा या ? ।
तें सांग सारें निवाडोनि मातें.' त्या पूशिलें भारतसत्तमातें. ॥ ६९
'जें श्रेष्ठा करपंकजीं मिरवलें तेथोनि चौघां करीं
होतें त्यावरी अग्निनें हरिसुता जें ओपिलें लौकरी, ।
हें ची विश्वजयीं अखंड विजयी ज्या ब्रह्मअंडीं वदे,
सारा लोक विलोकतां च नयनीं तें श्रेष्ठ गांडीव दे. ॥ ७०
मेरूअसे तरु धरी करि चीमण्याशा; काठ्या च कीं चिर बहू करिची मण्याशा।
पे हस्तकीं धनु रणांत अवंचनाचें; तो भीम ज्यावरि सुवारण कांचनाचें. ॥७१
विश्वीं एक हरी चिदात्मलहरी नांदे सदा साच रे!
कार्याकार्यविचारसंकटिं हरी पापें स्वदासांच रे! ।
ऐसा मानसमंदिरीं धरि तया धर्मांकिरींचें खरें,
रेखा रेखित इंद्रगोपकनकें कीं तीसरें देख रे. ॥ ७२
सोन्याचे रवि आणि शार्दुल जया पृष्ठीस गा रेखिले,
ज्याचें दर्शन वज्रतुल्यसमरीं शत्रूगणीं लेखिलें, ।
त्या दोन्हीं धनुषां स्वहस्तकमळीं माद्रेय गा! ठेविती;
केली म्यां तुज स्पष्ट मत्स्यकुमरा! जे कार्मुकीं ठेवि[10] ती. ॥७३
सरेना असा बाण भाता जयाचा, असे चांगला त्या कुरूराजयाचा; ।
जयामाजि रे! बाण नानापरीचे, सुरंगीतही भिन्नभिन्ना परीचे. ॥ ७४
अगा शस्त्रयुक्ता अशा भारतातें भले ऐकिले शस्त्रसंभारतातें; ।
त्वरें घेउनी भूतळा ये सुजाती! रिपू गोधनें घेउनी दूर जाती.' ॥ ७५
पुन्हा प्रश्न भूमिंजयो मानवेशा करी, टाकुनी जो बहू मान, वेशा ।
धरी अंगनेचा, तयाला तसा रे भला शाहणा मत्स्यबाळांत सारे. ॥ ७६
'ते पांच मार्तंड तुके शरीचे जे बाळ पांडूनृपकेसरीचे,[12] ।
टाकोनियां शस्त्रनिधानकोठे गेले सदा शस्त्रनिधान कोठें ? ॥ ७७

---

१. धनुष्यलता. २. सूर्यापरी. ३. हस्तकमळीं. ४. अर्जुनाला. ५. उत्तम हत्तीचें चित्र. ६. 'विश्वाला सकळां विशेष अवळां दासानुदासांच रे' असाही पाठ आहे. ७. कीटकविशेष. (काजवा ?) ८. वाघ. ९. नकुलसहदेव. १०. ठेव. ११. सूर्य. १२. सिंहाचे.

हें सांग' ऐसें वदला तया रे! त्या कुंतिपुत्रा रणदातया रे! ।
तेव्हां वदे स्पष्टचि त्यास राया! कीं 'दुर्दशा प्राप्तलि ओसराया.' ॥७८
ऐकोनी रव अमृतोपम बरा मुक्ताभ्रसा मित्र रे!
तैसा अर्जुन उत्तरा प्रियकरा पाहोनि सन्मित्र रे! ।
सांगे कीं, 'हरिपुत्र पांडव तिजा तो मीं, नृपासंनिधी
आहे कंक म्हणोनि धर्मतनयो तो जाण राजा निधी. ॥ ७९
शतकशत करींची शक्ति ज्याचे करीं रे!
करित तव गृहीं तो भूपती भाकरी रे! ।
परम बळि जिमूती ज्याकरें वारला रे!
वळख वडिलबंधू भीमजी तो भला रे! ॥ ८०
नाचवी तुरग वातगती रे! ज्यापुढें महिधवांत गती रे! ।
ना तशा शतसहस्र कळाला जाण त्या गुणनिधी नकुळाला. ॥ ८१
गोधनास तव मत्स्यकुमारा! राखिता चतुर जो सकुमारा! ।
तो च पांडव कनिष्ट भला गा! लाडका परि बहू निभला गा! ॥८२
जिला पाहतां पापदृष्टीस मामा तुझा पावला मृत्यु सौजन्यधामा! ।
न सोडी तुझी माय जी ते क्षणीं रे! सती द्रौपदी ते च दिव्येक्षणी रे!'॥८३
असा ऐकतां शब्द सारंगपाणी सखा ज्यास त्या मत्स्य वाचे उपाणी; ।
नृपा! ऐक तो गोड संवादसारा; भला पूर्वजांचा कथानंद सारा. ॥ ८४
हे कथा उपणितां तुज नारे जाण कीं अखम सेतु जना रे! ।
हा भवाब्धि बहु लक्ष तराया, योग्य तूं सुत परीक्षितराया! ॥ ८५
नृपा! मत्स्यपुत्रास वाचा फुटेना, असा दाटला संशयोही तुटेना; ।
बहू नम्र बोले गिरा सांवरोनी; उभा राहुनी नीट वृक्षावरोनी. ॥ ८६
'जो पूसिता ठाव रिपूशकाचा तो वेष वे केंवि नपुंसकाचा ? ।
आश्चर्य हें फार गमे मनासी सांगोनियां संशय काम नासीं.' ॥ ८७
विजय बहु मनानें हर्षुनी बोलिला जे,
'अइक तर व सर्वीं भूपती भूलिला जे; ।
सुरपतिरिपु माझ्या फार मेले करानें,
म्हणत परम केलें कृत्य या लेंकरानें. ॥ ८८

---

१. सूर्य. २. इंद्रपुत्र. (अर्जुन.) ३. कीचक.

रमाया हरी पाठवी नाकदारे, 'मला भावना तेंवि नाना कदा रे ! ।
तुजा चित्तसंभ्रांत जाणे महा रे ! दिला शाप तोची असे वेष हा रे !'॥ ८९
पुन्हा वदे उत्तर, 'सव्यसाची तूं सत्य होसी तरि सांग साचीं ।
नामें दहा त्या सगुणा कराचीं, रिपूतमध्वंसि विभाकराचीं.' ॥ ९०
म्हणे पार्थ तेव्हां, 'मला पूससी बा ! वयें धाकुटा चित्त खोली शशी बा ! ।
असे दीसतें धन्य वंशोत्तमा रे ! तुला ऐकवीतों स्वनामक्रमा रे ! ॥ ९१
यशस्तोम दाही दिशीं ना छना रे ! म्हणोनी मला बाहती अर्जुना रे ! ।
असे जन्म तें स्थान फाल्गून साचें, तयाकारणें नाम त्या जीनसाचें. ॥ ९२
हरी दे वरा कीं रिपूनाश व्हातें, दिले जिष्णुनामास देवीं तेव्हां तें ।
किरीटी सुरांचा पती दे मला हो ! तयापासुनी ते घडी नाम लाहो. ॥ ९३
पांढरे हय रथास सदा या श्वेतवाहन निमित्त वदाया; ।
दाखवीं रणभयंकर ठेवी, हा बिभत्सु जन नाम च ठेवी. ॥ ९४
अजय मरुत मातें स्पर्शला ना कसा हा ?
विजय मज म्हणाया ठाव निःशंकसा हा; ।
घडिघडि मन भोंवे कृष्णपायींच मातें
म्हणउनि सहजेंची नाम ये कृष्ण मातें. ॥ ९५
सर्वही हरी एकला खरा यदुकुळीं कुळोद्धार मूखरा; ।
तो सखा सदा पूर्णकाम रे ! म्हणुनि ये मला कृष्णनाम रे ! ॥ ९६
जाणें कळा च कर दक्षण सव्य साची युद्धांत गांडिव कशी जन सव्यसाची, ।
या कारणें च मज उत्तम बोलताती, आनंद मानुनि मनीं बहु डोलताती. ॥ ९७
जीतुनी जनपदा कमठानें, घातलें घन महीवर ठाणें; ।
तेधवां मज धनंजय नामा ठाव कीं सुरनरां गुणधामा ! ॥ ९८
एवं असा तो दशनामझाडा सांगीतला म्यां तुज सौख्यझाडा.' ।
हें ऐकुनी उत्तर तो शमी रे ! वृक्षावरोनी नर तो नमी रे ! ॥ ९९
नृपा ! तेधवां बाळ पृथ्वीधवाचा मला बोलला स्नेहसंबंध वाचा; ।
तया श्रीहरीसोयऱ्याला जसा रे ! बहू मानुनी अंतरीं लाज सारे. ॥ १००
म्हणे शोधिल्या कीर्तनीं त्या नव्या ही सखा सोयरा विश्वकल्याण व्याही; ।
असे तूजसी त्या उणी मात सीधे घडोनी अली तेच चित्ता तसी घे. ॥ १०१

१. अप्सरेला. २. घरांत. ३. शत्रुरूपी अंधकाराचा नाश करणारा सूर्य. ४. 'म्हणोनी कथीतों' असाही पाठ आहे. ५. कीर्तिसमूह. ६. धनुष्यानें. ७. पति.

अहो दोषवृंद क्षमा तूं कराया, दयाळू मला योग्य तूं लोकराया! ।
अगा धीरसिंधू सदाशीवसैद्या! नमस्कार पावो तुझ्या पादपद्मा. ॥ १०२

नाकेश वा केशवसोयरा ज्या दे उत्तरा उत्तर भोय राज्या; ।
तें ऐक कीं चिद्गुणवैभवा रे! सत्कीर्तिनें संसृतिलोभ वारे. ॥ १०३

'न तूं राजपुत्रा! उदासीनसा हो; उणा शब्द महास दासी न साहो; ।
मला पाहतां जीत शत्रू शवाचे परी होत, त्या तूं कसा दोष वाचे.॥ १०४
उगा बोलसी हें घडेना कदापी; तुझ्या शत्रुचें आज मी नाक दापीं; ।
रणीं मुख्य धूरेंत दुर्योधनाचे वरें ऊसणें दावितों गो वनाचें. ॥ १०५
शरस्तोम माझ्या करीं दग्ध हारे; द्विषद्भार कीं सर्व ही दिग्दहा रे! ।
भल्या पाहसी आज तूं कौतुकाला रिपू कोण येईल तो मेत्तुकाला.॥ १०६
नसे बाण मद्धस्तिचा वावगा रे! न घेतां रिपूचेच कीं जीव गारे; ।
बहू बोलणें व्यर्थ आतां न मानें; क्षणें सर्व येईल कीं आनमानें. ॥ १०७
करीं आज सारथ्य, मत्स्यंदना ने; भले नेत्रपद्मीं द्विषत्कंदना ने; ।
महाघोर आश्चर्य पाहें समुद्रा! गुणाच्या, तुला लावितों स्तब्धमुद्रा.॥ १०८
रिपूमार ये त्यास भी भार देवा फिरे भीडनी हेंचि मित्रा! सदेवा; ।
निरीक्षीं भलें अंबकीं आज गा रे! पुरे एकला मीच दोंतीं जगां रे!'॥ १०९
म्हणे, 'मत्स्य तूं इंद्रपुत्रा सवीता; अशा अंगकांती रिपु त्रासवीता; ।
तुझ्या विक्रमें विघ्न नाकेश वारे; सदा आवडी तूंजसी केशवा रे!॥ ११०

करिसि सर्व जसें वदसी तसें; तुज निरीक्षित ये रिपुसी तसे; ।
निजकरें तव स्यंदनघोटकां धरिन मी करिं शत्रु सघोट का.' ॥ १११

एवं असें बोलुनि चापभाते घेऊनि ये त्या अतुळप्रभातें; ।
संतोषुनी पार्थ नमी शमी हो! ध्यावोनि साक्षी विषमी शमी हो! ॥ ११२
शमीच्या मुळा पार्थ जो वंदनाला करी तों उभें देखिलें स्यंदनाला; ।
दिला खांडवीं जो त्रिपादें हरी ती जयाचे [12]हरी वात संदेहरीती. ॥ ११३
[13]कपींद्र ध्वजीं आठवीतां उभा हो! बुभुःकारुनी बूजवीलें नभा हो! ।
शिरीं टोपले अंगडी मान तीसी रणा दे म्हणोनी बहू मान तीसी.॥ ११४
जयाचे दिठीं तुच्छ कीं मत्तरासी रिपू तो करी सारथी उत्तरासी; ।
रथासी [14]हरीपुत्र तो राजया रे! पित्या तुल्य कीं सत्य तोरा जया रे!॥ ११५

१. समूह. २. धैर्यसमुद्रा. ३. पर. ४. कमळ. ५. माझ्या साम्यतेला. ६. रथ. ७. कमर. ८. नाश. ९. डोळ्यांनीं. १०. घोड्यांना. ११. अग्नि. १२. घोडे. १३. मारुती. १४. अर्जुन.

वरे स्यंदनीं आठवी तेधवां रे! सख्या सोयऱ्या श्रीहरी माधवा रे! ।
म्हणे, 'लोटला काळ निःसारसा हा कृपेनें तुझ्या आजि संसार साहा.'॥ ११६
रणीं मानिलें ज्यास विश्वंभरानें नृपा तो मुखीं शंख मोठ्या भरानें ।
भला वाजवी रे! बळाच्या दमानें मनापासुनी थोर आल्हाद मानें.॥ ११७
देवदत्तरव घोर निघाला; तोच कीं रिपुधृतीवर घाला; ।
मत्स्य ही रथधुरेवर निद्रा तेधवां करि गुणैकसमुद्रा! ॥ ११८
अहो शंखनादें धराकाश वाजे; रिपूंवाहिनी दुर्धरा काशवा जे; ।
रितीनें बरी दुष्कळा या परी रे! धरीत्ते वदे द्रोण राया परी रे!॥ ११९
'दुर्योधना! प्रळय अंतकमेघसा रे! हा शंखनाद हरिपुत्र करी घसा रे! ।
त्यावेगळा इतर कोण अशा रवासी, भुःकारिता नर महीतळसारवासी?॥ १२०
नृपा अर्जुनासी धुरा बाण कीं रे! असायासि लोकत्रयीं वाण कीं रे! ।
सखा त्यास तो कीं जगत्पाळणी रे! सदा रक्षिता स्वकृपापाळणी रे! ॥ १२१
रवीतुल्य जे पंचपुत्रास वी ती अशी द्रौपदीची वपु त्रासवीती; ।
मतीं योजिलें जें तुझी त्या स्मराया, असे काळ जेणें चमू भस्म राया!' ॥ १२२
राजा द्रोणमुखारविंदरव तो ऐकोनि शब्दग्रही,
बोले भीष्म मुखेंदु पाहुनि कसा तो दुष्ट दुर्विग्रही; ।
'तेरा वर्ष यथार्थ पूर्ण नसतां कोणी तरी आनना
दावी पांडव तेधवां पुनरपी धाडीन त्यां कानना. ॥ १२३
अहे काय याचाचि हृद्विंदु घाल्या; सुधातुल्य सेवोनि कुंतीदुधाला? ।
अम्हीं काय प्यालों स्तनीं नीर सारे? गुरू वर्णितो फार त्या नीरसा रे! ॥ १२४
अजा भीष्म हा हो तुम्ही विप्र तीघे, जयाचे सरी शक्रही अप्रती घे, ।
दळाचे पती कर्ण दुःशासनासे न हे शत्रु ये त्यास कीं नासिनासे. ॥ १२५
खरें जाण गा सद्गुरू आज याला बळें विक्रमें मीच नांदे जयाला, ।
तिन्हीं लोक तूं एकला जिंकिसी गा! कसा अर्जुनाच्या भया भाकिसी गा!'॥ १२६
गर्विष्ठ कर्ण वदला, 'नृपनंदना जी! नाजी द्विजेंद्र रणकर्कशकंदना जी! ।
ना जीतकीं चतुर विप्र बळी तगाया गाया सुवेद परि हा रणिं ना तगाया. ॥
दुर्योधना धन हरी तुजला खरा जी! राजीवनेत्र सखया वरिला खरा जी! ।
राजीत भाग्य तव मोहुनि जीव दे त्या, दे त्याहुनी तुज मनांहुनि जीव देत्या.॥

१. अर्जुनाच्या शंखाचें नांव. २. नाद. ३. धैर्यावर. ४. शत्रूची सेना. ५. वदनकमल. ६. नाद, ध्वनि. ७. 'शनितो' असाही पाठ आहे. ८. कमल.

सर्वस्व वाणीं गुण पांडवांचे, वाचे करूनी रण तांडवाचें; ।
वा[1]चस्पतीसे गुण दाखवाया, वायां वदे कीं तुजला खवाया. ॥ १२९
प्रतिज्ञा अशा विप्रवर्यास लेखी; महीच्याच कीं क्षात्रधर्मा न लेखी; ।
तरी ठेविजे सत्य मार्गा दळा या, पुढें मीच होतों रिपूला दळाया. ॥ १३०
कु[2]रुवृद्ध राया महाराज यानें, सदा जिंकिला शत्रु हा राजयानें, ।
कसा धीर सिंधू उदारा मनाचा, न लेखी सना सोयरा वा[3]मनाचा. ॥ १३१
द[4]र्वीकरातुल्य चि रोपे[5]रासी सोडीन कीं मृत्युच रोप रासी; ।
हो राजया हर्षित मानसातें, शत्रूगणीं क्षुल्लक मान सातें. ॥ १३२
गौ[6]तमीतनय मूर्खता बा! ज्यास तो वचन त्यावर तावा; ।
बोलला परम अमृतसीरे! देखुनी गुरुगिरामृतशी रे! ॥ १३३
न का[7]नीना! मानी नर क[8]रकमानीशर मला
न मारी मा[9]रारी सु[10]रवर सुरी ज्यास भ्रमला; ।
यदूवंशीं राणा मुनिजन पुराणा वदत ज्या
सखा त्याचा साचा प्रियसुत मनाचा अदिति ज्या. ॥ १३४
कौ[11]ळखंज बळ देवगणा या नाकळे म्हणुनि देव गणाया ।
तोषवी नर समर्थ कसा रे! मारुनी द[12]नुज निंदक सारे. ॥ १३५
कवण सांग ह[13]रीसुत जोडका निजकरें च हरी सुत जो डका ।
सतत जाणुनि विक्रम फाल्गुना करिसि व्यर्थ अनर्थक व[14]ल्गना.' ॥ १३६
तरुण वय तपाचा सिंधु कीं विक्रमांनीं,
भरवि जन न[15]गारीपुत्रसा वक्र मानी. ।
गु[16]रुसुत अइसा तो तेधवां क्रोध दावी;
नरपति रिति त्याची लागली बा! वदावी. ॥ १३७
'वर्णत्रयासी गुरु जो द्विजाती जाती उणे ज्या वर दे सुजाती; ।
जाती महा पाप बळी शयानें या नेमितां स्पर्श चिदाशयानें. ॥ १३८
असा द्रोण तो सद्गुरू राजयाचा मतीमंद दुष्टा कुरूराज याचा, ।
कसा निंदिसी तूं खरा रासभा गा! महापातक्याच्या पुतरास भागा. ॥ १३९

---

१. बृहस्पति. २. भीष्म. ३. कृष्णाचा. ४. सर्प. ५. बाणसमूह. ६. कृपाचार्य. ७. कर्णास्त्र. ८. हातीं आहे धनुष्यबाण ज्याच्या. ९. मदनशत्रु. (शिव.) १०. देवश्रेष्ठ. ११. राक्षसविशेष. १२. दनूचे पुत्र दानव. १३. इंद्रपुत्र अर्जुन. १४. बडबड. १५. पर्वतशत्रु. (इंद्र). १६. द्रोणगुरुचा पुत्र अश्वत्थामा.

तरी आज तूं दाव गा! विक्रमासी, अम्ही विप्र वाचोनि वेद क्रमासी; ।
निराळे उगे पाहतों अंबकांनीं कसा विंधिसी पार्थ तो सायकांनीं. ॥१४०
अहो! धन्य जो तो गुरुपाय पाणी धरोनी करी दुःखआपाय पाणी; ।
भजे सद्गुरूसी यशें केशवाचीं सदा अंतरीं तो गुडाकेश वाची. ॥ १४१
असा सद्गुरू कीं शिष्य दुर्लभा या जनामाजि सर्वां जनांला लभाया, ।
कळा जाणिजे हें गुरुवर्म कांहीं नृपा बोधिजे तों कुडें कर्म कांहीं. ॥ १४२
दिलें पांडवां थोर दुःखा सदारां वना धाडिलें त्वां च कीं खासदारा, ।
अशी बुद्धि तूझी कुलीना नरा जे उगा वल्गसी मारितों मी नरा जे. १४३
कुजाती गुणें बोलसी गावढाळा! तुला आणि जिष्णूजिणें गा वढाळा! ।
अनर्थास तूं मूळ दुर्योधनाला सदा सोडसी शब्द दुर्गंधि नाला. ॥ १४४
जयाचा नृपा शब्द विश्वास माने, तयानें भला शब्द विश्वा समानें;' ।
असें बोलिला गा मतीमंद नीचा! नव्हेसी रणीं तूं रिपूकंदनींचा. ॥ १४५
न शिष्या सुता भेद हें वेद नारे नसे बोलिला काय ते वेदना रे! ।
खळा ठावका तूं गुरू वंचकी रे! सदा वर्तसी कर्म प्रापंचकी रे! ॥ १४६
गुरूची दया फार तोही तसाची सदा आवडी तत्पदीं हीत साची; ।
असे वत्स तो कीं गुरुमावलीला, कळेना तयाची तुला भाव लीला. ॥ १४७
वानी गुरु शिष्य जरी असा हा कां ऐकतां शब्दचि हा न साहा? ।
ज्या अर्जुनाचे गुण देव गाते, तूं मानसी तुच्छ कसे अगा ते? ॥ १४८
असच्छिष्य कानीं गुरुनिंद घे रे! महापातकी तो च दुर्मंद घेरे; ।
गुरुभक्त तो पार्थ साचा मनाचा, म्हणोनी कृपापात्र कीं वामनाचा. १४९
कुळाची जशी खप्रिया वीनटाया न ज्यारीपरी भाव दावी नटाया; ।
तसा सद्गुरुपादसद्वंदनासी करी तो च कीं दुर्भवें द्वंद्व नासी. ॥ १५०
अहो शोकसंताप सारा हवीला सखा सद्गुरु दीपसा राहवीला; ।
मनोमंदिरीं ऐशिया त्या तुला गा! महादुर्मदा कैंवि कीजे तुला गा!' १५१
पारिक्षिता द्विज गुरुसुत तापलासा आरक्तवर्ण जइसा फुलता पैलासा, ।
तैसेच नेत्र करुनी वदला नदीज, 'युद्धांत चित्त अइसें कळतां न दीज.' ॥ १५२

---

१. डोळ्यांनीं. २. बाणांनीं. ३. हात. ४. गुडाका म्ह० निद्रा इचा जिंकणारा. (अर्जुन.) ५. जो. ६. ओढा, लहान नदी. ७. नाश. ८. वाईट शिष्य. ९. कृष्णाचा. १०. संसार. ११. द्रोणगुरुपुत्र अश्वत्थामा. १२. पळसाचा वृक्ष. १३. गंगापुत्र भीष्म.

जाणुनी समय संकट सारे, देखतां द्विज वरी कट सारें; ।
तेधवां कुरुपितामह राया ! बोलला वचन भेद हराया. ॥ १९३
'त्रिकाळज्ञ हे बोलले तें खरें गा ! परी त्या रवें हे चमू वीखरे गा ! ।
असें जाणुनी चक्रधैर्या वदे हा अहो कर्ण कीं त्यामधें भाव देहा. ॥ १९४
जरी बोलिला चक्रधैर्यावलंबा, तथापी करी हा बहू वक्र लंबा; ।
पित्यासी म्हणोनी मनीं राग यावा न याचा असा थोर शूरा सया वा.' ॥ १९५
एवं असा शांतवि शांतनू रे ! ज्याचे मतीं क्रोध अशांत नूरे; ।
दुर्योधनें ही पसरोनि पाणी, क्षेमाविले ब्राह्मण देव पाणी. ॥ १९६
राधानंदन नंदनंदनसखा दायाद तो राहवी;
गंगासूनु रुसून जो भवमळीं दुर्दांतता राहवी; ।
तेव्हां त्या सदया दयालय जया भीष्मा म्हणे, 'आज या
रक्षीं या चमुची कळा, कळवळा आहे तुला, आजया !' ॥ १९७
मुनी द्रोण जो कां त्यजी तीव्रता ते भ्रुसंकेत दावूनि देवव्रतातें ।
म्हणे, 'दक्ष ना तूं स्वकामीं कसा हो ! बरें बोलतो ये घडी शुक्रसा हो ! ॥ १९८
भीष्मा ! तूं कुरुवृद्धवर्य जगतीनाथ त्रिकाळज्ञ रे !
पांडूचा कुमरा मरा वर सरीचा भूप हा अज्ञ रे ! ।
इच्छीतो मन मानतें पुनरपी तूं जाण त्या देखणा
पाहोनी दिनमान सत्वर तया सांगोन्न धाडीं खुणा.' ॥ १९९
हांसोनि गंगात्मज जो तपाचा पांचामुखा साच कीं आतपाचा ।
पाचारिला तेजसमृद्ध देही दे दीनता सत्सुखि जो त्रिदेही. ॥ १६०
'न चिंता आचार्या ! करिं विबुधवर्यांत परमा
रमाकांता प्रेमीं चतुरतर ते सर्व परमा ।
न मर्यादा वेळा त्यजुनि निज नेमा विसरती
रतिक्लेशासाठीं विषमतर पंथीं न सरती.' ॥ १६१
नरपति ! तिकडे तो मत्स्य मूर्च्छा दनानीं
निजवदन भरारां झांकि आच्छादनांनीं; ।
हरिसुत नृपबाळा धीट कांहीं कराया
घडि घडि मुखिं फुंकी शंख तो लोकराया ! ॥ १६२

१. भीष्म. २. न उरे म्ह० न राहे. ३. हात. ४. राधेचा पुत्र कर्ण. ५. श्रीकृष्ण कृष्ण याचा मित्र अर्जुन. ६. भीष्म. ७. देवगुरुसारखा. ८. 'समर' असाही पाठ आहे. ९. कृष्णाला.

राया ! राजकुमार मारजनकप्रीतीकरें तेधवां
केला सावध त्यावरी मनकेंजीं ध्यावोनि चिन्माधवा; ।
अस्त्रासी स्मरतां, त्रुटी न लगतां, जोडोनि हस्तास गा !
होती सर्व उभीं पितामह पदीं तूझ्या नृपातास गा ! ॥ १६३

वदे पार्थ त्या सर्वही अस्त्रधारा; 'अहो ! मीं न लेखीं रिपूशस्त्र, वारा; ।
प्रसादें तुम्हां ज्या नसे ऊपमाहो ! भलें आज मद्रक्षिजे संभ्रमा हो !' ॥ १६४
नृपा ! घेउनी सैव्य गांडीव पाणी, मनीं आठवी सोयरा चक्रपाणी. ।
'कृपेनें तुझ्या नेमिलें काळ जाला, शरें आज विंधीं द्विषत्काळजाला.' ॥१६५
जसा वाढ तो थोर यावा मनाचा तसा हर्षला सोयरा वामनाचा; ।
म्हणे कीं, 'हरी जो विधी देव वी रे ! मला तो जयाचा विधी देववी रे ! ॥१६६
हरी जो हरी सर्व गोवा सराचा करी थाट तो मुक्त गोवासरांचा;' ।
स्तवोनी अशा श्रीधरा माधवाला घनश्याम गोपाळ रामाधवाला. ॥ १६७
'हरी आज कीं लावबी बोल याला रिपूमंडळी नेववी हो लयाला;' ।
पुन्हां वंदुनीयां म्हणे 'देवराया ! मनोदेशिंचा या अशा दे वरा या.' ॥ १६८
नृपा ! अर्जुनें लावितां गूण कोटी, नभीं दाटले देव तेतीस कोटी; ।
सुरांचा पती ये स्वपुत्राभिमानी; पहायास कौशल्य बैसे विमानीं. ॥ १६९
म्हणे, 'उत्तरा ! चालवीं बा रथा रे ! उभा जे मही कौरवी भोर थारे; ।
भल्या पाहुनीयां धुरा आसुडाव्या, म्हणोनी सख्या ! नेत्रपैथीं पडाव्या.' ॥१७०
वदे मत्स्य, 'ज्याशीं तुम्हा सुख्य दावा, तयाचा मला दूरूनी केतु दावा; ।
शतांगास त्या कर्दमीं थीरवीतों, जसा स्तब्ध मध्यान्ह संधी रवी तो.' ॥ १७१

नृपा ! मानी ज्याचे शरिं रिपुसमूहो गरगरा,
गुणाच्या शब्दानें फिरवि तनु मूर्च्छे गरगरा; ।
अशा मार्तंडाचे सम रण हरी गा टकलवी,
रथा तेणें वैरी मन धृति मती गाढ कलवी. ॥ १७२

येरीकडे गुरु पितामह लक्षणानें जाणोनि अर्जुन, म्हणे 'दहिल क्षणानें; ।
या राऊया त्वरित देउनि गोधनातें, धाडूं गजाव्हनगरास सुयोधनातें.' ॥ १७३

---

१. कृष्णमित्र अर्जुन यानें. २. कमलांत. ३. चुटकी किंवा टिचकी वाजविण्यास लागतो तो काळ म्ह० अति अल्प काळ. ४. समुदायाला. ५. डावा. ६. हात. ७. नेमिलेली वर्षे भरलीं. ८. झाला. ९. शत्रूंच्या हृदयाला. (संस्कृत प्राकृत शब्दांचा समास). १०. देवराजा. (इंद्र.) ११. अर्जुनाभिमानी. १२. कौरवांचा सैन्यभार. १३. कमलीं. १४. ध्वज. १५. रथाला. १६. चिखलांत. १७. धनुष्याच्या दोरीच्या. १८. सूर्याच्या. १९. घोडे. २०. हस्तिनापुरास.

सेना अर्धविभाग भागवत जो भीष्म प्रतापी रवी,
देवोनी सह गोप गो कुरुपती देशाकडे फीरवी; ।
येतो अर्जुन दुर्जनप्रियकरा लक्षीत तो गोवळी,
धांवोनी पळतो मदांध खळ तो गावा जसा गोवळी. ॥ १७४
गुरुमेहुणा पुत्र भाग द्वयाला; मधें तिष्ठवी त्या द्विजा अद्वयाला; ।
ठिवी कर्ण पूढें मुखीं वाहिनीच्या, कुरुवृद्ध मागें द्विषन्मोहिनीचा. ॥ १७५
'आला रे! यदुपुंगवप्रियसखा गांडीवपाणी हरी,
आला रे! हरिपुत्र शत्रुमुखिचें निःशंक पाणी हरी; ।
आला रे! कपिकेतु हेतु धरुनी दुर्योधना कंदना;
आला रे! मृगराज आज तरि या राखा कुरुनंदना.' ॥ १७६
यदुमुखसुखपात्रें निर्विष द्वंदशूकां
परि शर गुरु भीष्मा आणि कर्णा पशू कां, ।
रव सदनिं तिघांसा धाडिलें षट् पदीं रे!
मृदुतर जव जाती पंकजीं षट्पदी रे! ॥ १७७
गुरुपुत्र बाणद्वयीं आळवीला, शरें कर्ण मौंधामणी माळवीला; ।
गुरुभाव याचा कुरुवृद्धराया! वदे ऐकतो कीं कुळा उद्धराया. ॥ १७८
'भीष्मा तूं कृप मी वरिष्ठ म्हणुनी पायासि वंदूनि रे!
केलें स्पष्ट निवेदन प्रभुवरा कर्णांत कीं दोनि रे! ।
झाल्या दुर्धर या दशा अवदशा गेली घडी आज ये,
आतां दुर्मद बोधवूनि अइसे कीजे अम्हा राज ये.' ॥ १७९
आलिंगना भाव चिरंजिवासी, राधात्मजा हाणि वदे जिवासी; ।
ऐशा परी भाव निवेदनासी करी गुरु शांतनुनंदनासी. ॥ १८०
गोपीवल्लभसोयरा नृपवरा! आला, तसे चक्र रे.
शत्रुत्वें पद [11]स्यंदनास निरखी [12]औलातसें चक्र रे. ।
होतें चाप करीं [13]करीसम [14]हरीबाळास त्या पाहतां,
वेडावोनि समस्त मत्त [15]चमुसी झाली दशा पाहता. ॥ १८१

१. भीष्मास 'परम भागवत' म्हणजे परमेश्वराचा मोठा भक्त असें म्हटलेलें 'प्रल्हादनारद-पराशरपुंडरीक' इत्यादि पद्यांत आढळतें. २. द्रोणाचा मेहुणा कृपाचार्य. ३. सेनेच्या. ४. कपि म्ह० मारुति आहे केतूवर म्ह० ध्वजावर ज्याच्या असा अर्जुन. ५. सिंह. ६. द्वंदशूक म्ह० साप. ७. कमलांत. ८. भ्रमर. ९. गुरुचा द्रोणाचा पुत्र अश्वत्थामा. १०. शिरोभूषण. ११. रथ. १२. कोलीतासारखें. १३. हत्ती. १४. सिंह. १५. सेनेला.

दंडी गोसमुदाव दाव करुनी नेतो खरा बाळ हा
  स्वप्राणांसह इंद्रियां जिव जसा अंतीं खरा बा लहा; ।
योगीराज त्यजूनि जाय जइसा सिद्धी तसा चाल गा !
  सांडूनी दळभार हा दळपती झोडूंच सैाचाल गा ! ॥ १८२
गाईचा पहिला फेरा गुणकरा धाडूं खरा आखरा;
  पाठी शत्रुधुरा धरूनि सैखरा बाणीं वधूं त्या खैरा; ।
गाई रक्षुनि आणुं आशिषचि दे देवां सह व्यास गा !
  ने.गा स्यंदन नंदनंदनसखा सांगे सहव्यास गा ! ॥ १८३
सोडवी हय धुरंधर बागा ज्या नरा प्रति पुरंदर बा गा ! ।
पाहतां सकल सव्य दळें त्या टाकिलें त्वरित शत्रु पळे त्या. ॥ १८४
आला राग विशेष पाहि फणिसे ज्याचे कैमानी भले;
  होते चंड प्रचंड खंड करिते पैत्री रणा नीभले; ।
ऐसे द्रोण गुरू पितामह कुरू आधीं दळा घेउनी,
  गेले सर्वहि गर्ववंत कुरुला नामांत या या गुणी. ॥ १८५
अंबिका[12]सुतकुळाधम कावी हा असा गुणरमा धमकावी. ।
द्रौपदीवधुबरा सदनीं तो आज मंगिल मसीं बदनीं तो. ॥ १८६
आधीं गोकुळ हें सगोपजन ते धाडोनि त्वत्पट्टणा,
  मागे हा रिपु मंद मत्त गतिचा आणोनि संघट्टणा, ।
तेरा वर्ष नरर्षभ प्रियकरा पुत्रा दिले क्लेश ते,
  चित्तीं या सलती अखंड, झडती घेईन मी लेश ते. ॥ १८७
गोपीनाथ अनाथबंधु सखयें चापीं शरा योजिलें;
  होतां अर्ध निमिष्य बाण सरळी भूअंबरां बूजिलें; ।
झाला एकबळा अशुद्ध[13]कवळा घेती द्विषेंद्वाण ते,
  तेणें शत्रुचमूवरी शैवकळा आली च निर्वाणें[16] ते ! ॥ १८८
म्हणे शांतनू, 'बाळ राजा तगो रे ! सुखें सांडिलें त्या घरा जात गो रे ! ।
जरी हें उणें ही अम्हांला जरा हो ! परी सर्वथा हा कुरुराज राहो.' ॥ १८९

---

१. 'पापाचा तरि उत्तर प्रियकरा हांकी रथा बाळ हा' असाही पाठ आढळतो. २. सत्य. ३. रांग, कळप. ४. तीक्ष्ण सक्त. ५. गादया. ६. 'गांगेयप्रमुखा अवश्य सुमुखा घेवोनि सन्यास गा' असाही पाठ आढळतो. ७. नंदपुत्र कृष्ण याचा मित्र अर्जुन. ८. इंद्र. ९. सर्पासारखें. १०. धनुष्य. ११. बाण. १२. धृतराष्ट्राच्या आईचें नांव. १३. रक्ताचा घांस. १४. शत्रुबाण. १५. प्रेतत्व. १६. अखेरची.

कुरूचे दळीं घोष नाना नगारी नभस्फोट केला तरी ना नगारी ।
जयाचा करीं तुच्छ तो शंखरावो म्हणे काम मत्स्येश आधीं करा वो. ॥१९०
शरांचा फरा बांधिला दोन पक्षीं; उणें मानिलें फार तेव्हां विपक्षीं; ।
मवोनी गुरें चालवी आखरासी, तरी तो न जाणे कुरु मूर्खराशी. ॥ १९१
गेले गोप सगो पवित्र धरणीनाथा घराला भल्या
तेणें पट्टणवासियांली सरसा तोषीं घड्या लामल्या; ।
मध्यान्हास रवी गुरांस हरवी तेव्हां सरा मंद रे!
टाकीना तरि सत्य नित्य कपटी त्या पांडवीं द्वंदे रे! ॥ १९२
झाला थोर अकांत कांत महिचे नानापरी छिन्न रे! ।
देखोनी दळभार फार म्हणती हा कीं परि छिन्न रे! ।
आतां अर्जुन दुर्जनप्रविण जो दुर्मंत्र सेवावया
मारोनी शर एक विश्रम करी निर्जीवसे वाव या. ॥ १९३
एवं गोहरणप्रसंग अवघा झाला खरा यांत रे!
आतां पांडव एक आणि कुरुचा त्या सर्व रायां तरे; ।
होईल प्रलयांत युद्ध भैंचवी रक्तें चैमू पोहवी,
शेखी प्रेरुनि अस्त्र वस्त्र हरुनी सेनीक ते मोहवी. ॥ १९४
श्रीहरीगुणगणार्णव सारे! गावया जिव हरी नवसा रे! ।
सत्कथेविण कदा न बसा रे! षैड्रिपू त्यजुनि मुक्ति वसा रे! ॥ १९५
जया सत्कथेवीण जे दीन जाती तयाचीच कीं वैखरी हीनैजाती; ।
हरीची कथा गाय जे जे हरी ती भवभ्रांति निःशेष का मोहरी ती. ॥१९६
सदा सर्वभूतीं मती शीकवीता, हरी तोच कीं शुद्ध देशी कवीता; ।
करी विश्व तारावया देवकीं रे! जया मावली बा वसू देवकी रे! ॥१९७
जो उद्धरी दुर्मद सावजाला, त्याचे पदीं जो नर साव झाला, ।
तो धन्य कीं तीं तळमंडळीं रे! ज्याचीं पदें वंद्य अखंडळीं रे! ॥ १९८
पशूच्या मुखीं बोलवी वेद गा रे! अहंपंडिता देत हट्टें दगा रे; ।
असा चिन्मणी भाविकांचा धणी रे! त्यजूनी न घे काम कांचा धणी रे! ॥
नाहीं कवित्वरिति लौकिक रंजनाची, आहे मला निवळ चाड निरंजनाची; ।
मी पायधूळ दयसागर यादवाची वाचीन कीर्ति शमदायक या दवाची. ॥२००

---

१. शत्रु. २. युद्ध. ३. इंद्रपुत्र अर्जुन. ४. सैन्य. ५. सहा रिपु. काम, क्रोध, मद, लोभ, मोह, आणि मत्सर. ६. वाणी. ७. हलक्या जातीची. ८. इंद्र. ९. आत्माभिमान. १०. परमेश्वराची.

अधिष्ठान वाणीवरी वामनाचें म्हणोनीच जिव्हेवरी नाम नाचे; ।
हरीचे हरी बोलतो बोल कां हो ! न हो विस्पती पंडिता बोल्का हो ! ॥ २०१

अध्याय सातवा.

चित्ताला कळवी, विकल्प गळवी, जो दुर्भवा माळवी,
भक्ताला अळवी, सुबोध कळवी, सा शत्रुंला वाळवी, ।
संचीता दळवी, त्रिकूट जळवी, दुर्वासना वाळवी,
वृत्ती मोकळवी करोनि वळवी सच्चिरपदीं बोळवी. ॥ १

वंदीन मी अंबुज अद्वयाचें, निःपंक पादद्वयअंबु ज्याचें; ।
सेवी रक्षा निर्मळ मानसाची, जे माउली सर्वहि मान साची. ॥ २
जो पूजिला देव कदंबकांनीं, जो पाहिला भाविक अंबकांनीं, ।
ज्या स्वरूपें स्फूर्तितुषार दे हो. तो मूर्ख ही गोविलें शारदे हो ! ॥ ३

विश्वीं विश्वपर्णी नसोनि लपणी प्रत्यक्ष ना खंडला,
स्वामी सर्व जगा नगेंद्रभुजगा इद्रयान आखंडला, ।
तो हा भारतसत्तमप्रियकथा वाखाणवी सन्मुखें;
ज्याच्या सच्छ्रवणें भवाब्धि तरणें कीं सत्सुखें मन्मुखें. ॥ ४

अशा सत्कथेच्या पथा देव दावी, तरायास हीं विश्व वृंदीं वदावी; ।
तरी ऐक बा सद्गुणामोदराशी ! प्रियाची कथा प्रीय दामोदरासी. ॥ ५
जन्मेजया ! श्रवण सादर तूं कराया आहेस, कीं बहु समर्पक लोकराया ! ।
ऐकें चरित्र तव पावन पावनाचें, त्या पांडुनंदन पवित्र यशोधनाचें. ॥ ६
नृपा ! श्वेतवर्णी-रथीं चार वाजी जयाच्या, तया सद्रथाचा रवा जी ! ।
अहो ऐकतां, तें कुरुचक्रमाला स्वभावें त्यजी आपुले विक्रमाला. ॥ ७
जया केसरी पाहतां अश्रु गाळी, करी मत्त त्यासी फळी घे शृंगाळी, ।
तसा अर्जुना लावि कर्णप्रतापा, अहो ! दावितां पावला क्षिप्रें तापा. ॥ ८
पुढें कर्ण बंधू कुजाती खरा हो ! उभा आड जेंवी शशीपूर्व राहो. ।
जसा दीपमेळीं पतंगा अपाये तसा मृत्यु त्या जिष्णुबाणीं नृपा ये. ॥ ९

---

१. संशय, किंतु. २. सहा शत्रु. ३. देवा. ४. चोरी, चहाडी आणि शिंदळकी यांचा समुदाय. ५. कमल. ६. चिखल. ७. पाणी. ८. समूहांनीं. ९. डोळ्यांनीं. १०. गुंतवील. ११. सरस्वतीला. १२. इंद्राला. १३. घोडे. १४. सिंह. १५. हत्ती. १६. कोल्ही. १७. समर. १८. शत्रुमाला.

मारी बंधु सबंधु देखुनि पुढां सिंधू बळाचा पसा
मारी अर्जुनविक्रमासि तइसा तो कर्ण घे चाप सा।
वर्षाकाळ सुकाळ मेघ धरिती अच्छिन्नधारी धरा,
तेंवी तो रणकर्कश प्रविण रे सोडी शरा भूधरा! ॥ १०
श्वेत वर्ण दिसती हरि ज्याचे, स्यंदनीं चपळ गा हरि ज्याचे।
त्यास साम्य राधेपुत्र भला गा! फारसा रणवटीं निमला गा. ॥ ११
जरी दीधलीं गोधनें ग्रामदानें, परी क्षोभवीला गुरू दुर्मदानें;।
अहो त्या फळें कर्ण निर्धाकसा हो! निघे पाठि देऊनि योद्धा कसाहो? १२
जया दुर्मदा सद्गुरू शाप होय, तया वांचवीतां जगद्बाप होय;।
तरी सद्गुरू क्रोध संताप दाही, न पावेल तो सत्य संतापदा ही. ॥ १३
द्रौपदी सगुण मंडित रंगा टाकुनी हरिमुखाब्धितरंगा,।
जाय कर्ण मतिमंद मनीं रे! भ्रांत होउनि रिपूदमनी रे! ॥ १४
भीष्मद्रोणकृपादि लक्षिति नृपा! राधेय माघारला,
तेव्हां तो कुरुनाथचक्रसमुहो नाहीं रणीं थारला;।
हाहाकार समग्र अग्रमणि ही चित्तीं करी राजसा;
गांगेयादिक थक्क लक्षिति नरा जेवीं हरी राजसा; ॥ १५
रणजलद निरीक्षी फारसा कीं अहो तो
नरशिखि मनपंखीं तोषुनी मत्त होतो;।
निबिडघनतनूचा सोयरा तो कसा रे!
वदत नृपमुलाला मानसी हेत सारे. ॥ १६
ब्राह्मणें विजय मत्स्यमुला गा! पाहिं मत्करशरां उगला गा!।
आज दंडिन समस्त परांसी, सांडुनी गुरु परां तपरासी. ॥ १७
कळे सारथी तूं खरा मातलीसा, असे कोण दूजा प्रतीमा तुळीसा?।
भला कर्णपत्रीं भुजंगा गरासी, न लेखोनि तुच्छा द्विपत्सागरासी. ॥ १८
जे घडी रविज शीघ्र पळाला, तेधवां कुरु म्हणे चपळाला,।
या वधा रिपुशिं सांडुनि रोपा, भाव हा जनजनासि निरोपा. ॥ १९
राया! भूप अमूप कोपुनि वदे हल्ला करूनी धरा;
मल्ला लागुनि तेधवां नरपती ते कंपली रे! धरा;।

---

१. समुद्र. २. रथ. ३. घोडे. ४. लहरी, पाण्याची लाट. ५. राधेचा पुत्र कर्ण. ६. मेघ, ७. कमलात. ८. शत्रूंला. ९. शत्रूचा नाशाविषयीं तत्पर अशाला. १०. इंद्राच्या सारथ्याचें नांव. ११. बाण.

सारे शस्त्रकरी करीवर गिरी ऐसे धनुष्मंत रे !
सोडूनि बहु सायक प्रथित तो झांकीत दौष्यंत रे ! ॥ २०
तो बा अंतक सत्र छत्रपति रे ! केले तयीं जे रिती,
आलीं सर्पकुळें प्रचंड सरळें तैसे शरा प्रेरिती; ।
शत्रूचे जन अर्जुन प्रथित तो लक्षोनि नेमें जया
घेऊं निश्चय साच हा च करिती ऐसें जन्मेजया ! ॥ २१
जसा मेघ ओघें शशी आकळीतसा, तसा बाणजाळीं कुरु झांकळीला; ।
न राया जरा धीर झाला उणा रे ! महा धीट तो श्रीहरीमेहुणा रे ! ॥ २२
अकर्णुनी मेघध्वनि मोरसा रे ! उभारी मदें पिच्छ तो थोरसा रे ! ।
नराचे शरीरीं तसे सायकांचे बहू स्तोमं शत्रूचमूनायकांचे. ॥ २३
विमानीं पिता जो सुराधीश मानी, असा पाहुनी पुत्र संतोष मानी, ।
म्हणे, 'नेत्र दाहा शतें हे मला हो ! पुरेनात ध्यायास निःसीम लाहो.' ॥ २४
असी बाण अग्नी महावाफ जी ती नरें स्पर्शितां जाणलें कीं फजीती; ।
दिसे उत्तराची तरी हा तगावा म्हणोनि करी बाण अस्त्रीं तगावा. ॥ २५
रायाचा प्रिय पुत्र मित्र हरिचा काचावला सारथी,
देखोनी रव बोलिला नृपमुला बा तूं भलासा रथी; ।
आहेसी बहु धीट नीट धरिसी चारी तुरंगांस या.
राखीं सावध अर्ध भाग घडिचा तूं अंतरंगा सया ! ॥ २६
न भागती कंदनीं बाहु ज्याचे, तो एकला स्यंदनीं बांहुज्याचे, ।
तोडी शराच्या चळथी क्षणानें, योजोनि अस्त्रा अतितीक्ष्णानें. ॥ २७
खग खगाधिप स्वार हृतसखा नगनगारिचा पुत्र तो सखा ।
सरळ सर्पसे सोडुनी रवी पुत्रहस्तकीं शत्रु नीरवी. ॥ २८
शोणिता द्विषद्भारती रती ते घडी चमूभार तीरती; ।
मानुनी नरें राजनंदना बोधिलें त्वरें काढ स्यंदना. ॥ २९
चक्र फीरवी तो कुलालसा त्या रिती रथा काढ लालसा; ।
पार्थ ते घडी मत्स्यगीरवी, पाहुनी चमू दीन कौरवी. ॥ ३०
डहुळल्या चमूसिंधु ते घडी; नर म्हणे 'सल्या दृष्टि ऊघडीं; ।
उत्तरा ! अगा ! राजनंदना ! वेळ हे भली, काढ स्यंदना.' ॥ ३१

१. बाण. २. दुष्यंताचा वंशज. ३. यम. ४. कृष्णाचा मेहुणा अर्जुन. ५. ऐकून. ६. समूह. ७. तरवार. ८. युद्धांत. ९. रथांत. १०. क्षत्रियाच्या. ११. रास. १२. कुमार. १३. सेनारूपी नद्या.

पाहतां शरीं भार वारला; मत्स्य ही रथीं तो सवारला; ।
शंख फुंकिला यादवीवरें, नाद वाजला सात वीवरें. ॥ ३२

(सवाई.)

काढवुनी रथ सर्व मनोरथ तो करि भारत सारथियाचे;
छेदुनि मस्तक हस्तक सार्थक सायक सोडुनि त्या रथियाचे ।
'तूं सखया! मज तूं दयाकर हे रजनीकरवंशनिधाना!
चालवि स्यंदन नीट अवंचन हे शर कंदन या विबुधाना.' ॥ ३३
टाकुनि कंदन तो नृपनंदन घेउनि स्यंदन होय निराळा;
मागुति अर्जुन पाहुनि दुर्जन गांडिव सज्जुन लक्षि विराला; ।
मत्स्य म्हणे, 'अजि पांडुसुता! मज दाव हि तो दळनाथ खुणाला.
कोण पुढें करि झुंज गुढें मज सांग रुढे अवध्या निपुणाला.' ॥ ३४
हांसुनि पांडव तो रणतांडव घेउनि गांडिव काय वदे हो!
'ऐक महीधवबाळक! तूं रव सांगेन तो लव सावध दे हो; ।
देख कृपोत्तम तो द्विजसत्तम हा रणहोत्तम आजि करी रे!
जाणुनियां हळु तूं विनया खलु हा सदयाचळ शस्त्र करीं रे!' ॥ ३५

(श्लोक.)

प्रतापार्क हा नाक ही लोपता कीं, मृगेंद्रापरी केतु नीळ्या पताकी; ।
कृपाचार्य तेथें सख्या मान साचा, न या पाड अन्या लघू मानसाचा. ॥ ३६
ठसा स्वच्छ केतूस साजे घटाचा; पुढें नाद नादावला जे गटाचा; ।
गुरु द्रोण तेथें च संनीध त्याचा धनुष्यध्वजीं पुत्र जोडा पित्याचा. ॥ ३७
पताका बहू ज्या नरीं भर्जराचा, जिहीं झांकळील्या वैळी [10]निर्जरांच्या; ।
महा पंच ताल ध्वजस्तंभ ज्याचा, भला जाण माझ्या रिपूच्या अजाचा. ॥ ३८
जडित ज्यावरी बाण केतु रे! जरित [11]अंशुकीं नागकेतु रे! ।
कनकमेरुसा स्वच्छ भासतो, [12]अंबिकासुताच्या सुतास तो.' ॥ ३९
ओठीं वाजवि शंख अर्जुन नभस्फोटीं करूनी घसा;
[13]कोटी लावुनि [14]सीत ये रिपुदळा घोटीत तो वाघसा; ।

१. सिद्ध झाला. २. सुभद्रेचा पती अर्जुन यानें. ३. 'बाप म्हणे तुम सापसरीं शरिं दाप दिला बहु सार थियाचे' असा अन्य पाठ आढळतो. ४. बाण. ५. चंद्र. ६. स्वर्ग. ७. सिंह. ८. ध्वज. ९. पंक्ति. १०. देवांच्या. ११. वस्त्र. १२. धृतराष्ट्राच्या. १३. धनुष्याचें टोक. १४. दोरी.

लोटी [1]स्यंदन मत्स्यनंदनसखा मोठी पुढें गाढ गा!
गोठी हे धरि सत्य, संशयभरें खोटी नवे ओढ गा! ॥ ४०
पाहे हा द्विजराजसत्तम कसा बाहे उभारीत रे!
बाहे कार्मुक चंड खंड करिती बाहे रिपूरीति रे! ।
बाहे वेळ न चित्त चंचळ तुला आहे करायास रे!
साहे हे मम तात सिद्ध कदना राहे सरायास रे! ॥ ४१
[2]कंबूनाद अनाद तापस महाशंभू तरी बाटला;
[3]अंबूजप्रभु स्यंदनीं डळमळी [4]अंबूनिधी घोटला; ।
तंबू हा अवघाच निर्मित [5]स्वयंभूचा गमे फाटला;
अंबूजाशय सोयरा द्विजरणा स्तंभूवरी लोटला. ॥ ४२
कोपेनें कृपें पार्थ तो न्याहळीला; म्हणे, 'पातला हा कुरू व्याहळीला; ।
न देतां रणीं भंग [6]गांधारिजाला, सदा जो कुकर्मीक अंधारि ज्याला.' ॥ ४३
मान्य जो सुरनरां सनका हो! लाधला [7]हुतशरासन कां हो! ।
गाढणार रिपुवक्रपणाला; कोण जिंकिल यशःकृपणाला? ॥ ४४
कुरुदळीं बहु अनावर बाज्या. ऐकुनी नर [8]शचीवर वाज्या, ।
सव्य घेउनि कुरूगुरुसेना जाय कीं कृपमनांत रुसेना. ॥ ४५
गुरू शिष्य पाहूनि आनंद मानी; पहायास कौतूक आले विमानीं ।
सुरादीक सारे महापुण्यराशी, जयांला सदा उंच लोकीं [9]मिरासी. ॥ ४६
दोन हीरक सहस्रकरा या नीभले रणसहस्र कराया; ।
मांडलें रण कसें तगती ते पाहती विबुध भीत गतीतें. ॥ ४७
सतत ज्या हरादीक वंदिती; कमळनाभही [10]आदिती दिती ।
बाळ पाउलें पूजिती तया, सोयरा वदे अन्नदातया. ॥ ४८
'कृपाचा कृपापात्र मी सर्वदा या रिपूतुल्य नायोग्य याला वदाया; ।
परी क्षात्रकर्मी कुडा धर्म हा कीं, गुरूही वधी शिष्य युद्धीं महा कीं. ॥ ४९
सख्या पाहतां या गुरू [11]प्रांजळाला; खरा आज हृद्रोग माझा जळाला; ।
कृपा अर्क टाकी तरी काज येरें जयाच्या पुढें हे नृपें काजवे रे! ॥ ५०
जाणसी सकळ दंडक राजे या कळा विदित दंडकरा जे; ।
उत्तरा! परम सावध राहें; आज रक्तमय होय धरा हे. ॥ ५१

---

१. रथ. २. शंख. ३. पाणी. ४. समुद्र. ५. ब्रह्मा. ६. दुर्योधनाला. ७. अग्नीचें धनुष्य. ८. इंद्र. ९. वतनी जागा. १०. कश्यपाची स्त्री. ११. सरळ.

थोरिवेस किति काय वदों रे! सोड बा हयधुरंधर दोरे; ।
मंद ही बहु न कोप पडों दे; गोष्ट हे निजमनीं अवडों दे. ॥ ५२
सद्गुरूसगुणसिंधुपदीं पा जाळिला मद अहंधुपदीपा; ।
तेधवां सकळ दुष्कर वारी त्यास कीं भव असत्कर वारी.' ॥ ५३
पुन्हा गोत्रउच्चार आनंद मानें करोनी, स्फुरी शंख मोठ्या दमानें; ।
अहो पार्थ तेणें कुरुवृंदें भी हो! नभीं वाजवी वृत्रहा दुंदुभीहो. ॥ ५४
आले दृष्टिसमोर थोर सजले त्याले शिले टोप ते;
म्याले जे न नरासुरासुरवरा झाले न आटोपते; ।
हालेनात रणांत कालवत ते धाले सदा मानसें;
चालेनात अचाल सर्वहि अशा खालें नृपा मानसें. ॥ ५५
जयाच्या मनीं क्रोधसंताप ना हो! छळें तापवील्या कदा ताप ना हो. ।
असा ही महाराज जो विप्र तीला धरी क्रोधवृत्तीस जो अप्रतीला. ॥ ५६
कृपाच्या करांब्जांतुनी भृंग जीते निघाले असे बाण जिष्णूगजीं ते, ।
दहा येत देखोनि संधान वारी शरांचें शरीं ज्या सखा दानवारी. ॥ ५७
दाहा बाण कसोनि कार्मुक शिंतीं माहा तपाचा निधी
दाहाया हरिपुत्र मित्र यदुचा साहास राजन्निधी, ।
केला देख उदंड दंड धरसा ठेला स्वयें ते वडी,
नेला सैंयकव्यूह तो नरशरें ते लाघवें बीघडी. ॥ ५८
दोंहीकडोनि सुटती शर भारता रे! ऐशा परी परम दुर्धर भार तारे; ।
कल्पांत काळ गमला जगतींत लोकीं; कोणी न वीर धनुसायक ते विलोकी. ॥
झांकोळलीं रवि धरा नभ त्या शरांनीं; जाळीत जाय जंव सर्व हुताश रानीं; ।
तो काळ वर्णन करी न कदा खरी हो प्रज्ञा समर्थ रणपंडित वैखरी हो. ॥ ६०
झाला फार अकांत कांत महिचे साळा परी तिष्ठले;
नालाचे हय चर्कटोनि पळती झालावुनी निष्ठले; ।
काळाचें भय मानती न गज जे ताळापरी थोर ते
खालावोनि समस्त मस्तक करीं कालांचलीं कोर ते. ॥ ६१
केलें कंदन एक देख घटिका; गेले परी कल्पसे;
मेले फार भिऊनि ही नरपती, ठेले धिरें स्वल्पसे; ।

१. उदक. २. समूह. ३. वृत्रासुराचा शत्रु इंद्र. ४. कमलांतून. ५. अर्जुनरूपी हत्तीवर. ६. दानवांचा शत्रु कृष्ण. ७. धनुष्य. ८. दोरी धनुष्याची. ९. इंद्राचा पुत्र अर्जुन. १०. पर्वतासारखा. ११. बाणसमूह. १२. अग्नि. १३. वाणी.

हेले बुद्धिकरूनि अंधसुत तो खेळे तमासा धरा;
नेलें त्यावरि यादवप्रियकरें शैलेयशा भूधरा. ॥ ६२
नृपा! शोभला पार्थ जैसा रथी रे! स्ववीर्यप्रभें तीं जगां सारवी रे! ।
दिसे इंद्रगोपापरि छिन्न देहो; शरस्तोमें विप्रीं अविच्छिन्न दे हो. ॥ ६३
कवच गुरु हराया तो धणी मानवाचा,
शर विशर समर्पी ज्ञानधामा न वाचा; ।
कृपहत कवची तो जाहल्या सायकानें;
ध्वज रजकण केला त्या कुरुनायकानें. ॥ ६४
सोडुनी नरशरासुपसारा, बूजिला कंजजअंड पसारा; ।
युद्धकंदन तुरंगम नाहो नाशिती द्विज मना गमना हो! ॥ ६५
जो बाण शत्रूकुळनाशनाचा, धाडोनियां विप्र शरासनाचा ।
भंगी भला दोरक ते घडीला, यांनाहुनी भूसुर वीघडीला. ॥ ६६
रथाखालला विप्र येतांच तापा बहू पावुनी दाखवी सुप्रतापा; ।
रथीं लागवेगें पुन्हां बैसला हो! म्हणे पार्थ, 'आतां करूं फैसला हो.' ॥ ६७
घेतां चाप कृप प्रताप उदधी सीतां करी भंग तो.
नेतां विक्रम शत्रुचा नर तसा देतां रणीं रंगतो; ।
होता जो धनुभार तो विघडला हो तावुनी लोचनां,
गोता देखुनि शक्ति घे कृप करीं पूतां नरा मोचना. ॥ ६८
शक्ती जे शतसूर्यतुल्य चमके रक्तीं सदा घोळली,
व्यक्ती आणुनि ब्राह्मणें प्रभुवरासक्ती मनें कोळली; ।
भक्ती जो हरिची करी नर तशी मुक्ती भल्या स्वच्छ रे!
पक्ती बाणसहस्र ते[११] यमकळा युक्ती करी तुच्छ रे! ॥ ६९
तेरा बाण सुरेर्षभप्रियसुतें[१२] ते राजतें सोडिले;
चेरा फार करूनि अश्व रथ ही हेरापरी झोडिले, ।
घेरा घालुनि सारथी निवटिला[१३] ते राजसा संकटीं,
फेरा घेत गदा करीं द्विजमणी येरापरी हा कटी. ॥ ७०
जया कंदनीं तोषला नंगदाहो[१४]; तयानें शरें भस्म केली गदा हो; ।

---

१. कीटकविशेष. २. समूह. ३. बाण. ४. ब्रह्मांड. ५. धनुष्य. ६. रथ. ७. समुद्र. ८. धनुष्याच्या दोरीला. ९. शस्त्रविशेष. १० पवित्र. ११. 'हस्तकमळीं' असाही पाठ आहे. १२. इंद्राच्या आवडत्या पुत्रानें. (अर्जुनानें.) १३. मारिला. १४. मदनाला जाळणारा शिव. (न+अंग=नंग, अनंगाला जाळणारा. येथें 'न'ला परसवर्ण झाला आहे.)

अशस्त्री कृपा देखुनीयां नरासी म्हणे मत्स्य, 'भंगा त्वरें मानराशी.' ॥ ७१

उचित तरि पवित्रा हे न वाणी वदाया
नृपवर असके या हासती संप्रदाया. ।
प्रथम तरि गुरु हा, त्यांवरी पादचारी
हैंतधनु कइसा हा भंगिजे बा विचारीं ? ॥ ७२

राया ! तो कृप अस्तमीतरविसा काया कुरुपर्वता
जाया आड करी, हरिप्रिय तसा सायास ना गर्वता ।
पायां वंदुनि मानसीं गुरुकडे न्याया रथा तींतडी
दायादास्तव कंदनीं गुरु उभा मायापरी आंतडी. ॥ ७३

शांतीचा उदधी, अखंडवरदी, कांती रवी, मानसीं
भ्रांती अंतक, नित्यमुक्त हरसा, वांतीसरी मानसीं ।
मानी सर्वहि वैभवा, महिधवा ! ज्ञानी अखंडीत रे,
मानी तो गुरु द्रोण देखुनि कुरु वाणीत पंडीत रे.' ॥ ७४

गुरु देखतांची नमस्कार केला. नृपा ! तो बहू दर्शनाचा भुकेला. ।
नरा प्रेमभावो महामोद दे हो, गुरु तो सदा सच्चिदानंददेहो ! ॥ ७५
अहो ! धन्य डोळे तया मानवाचे गुरूचे पदीं प्रेमसन्मान वाचे ।
जयाचा, तया साच आलोकती ते तयाचे गुणस्तोम बोलों किती ते ? ॥ ७६
हरी फार मानी गुरुदासकांसी जयाचे घरीं येति मोदा सकासी ।
गुरुकीर्तनीं जाय वाणी जयाची तयाला असे काय वाणी जयाची ? ॥ ७७
जया सद्गुरूसी अहंता नरा हो तयाचे न कीं वंशसंतान राहो; ।
गुरुभक्तलीला कळा दिव्य साची सदा जाणता तो कुरु सैन्यसाची.॥ ७८

लांबवी हरिकथानकलीला नित्य जे करि अमानकलीला ।
बोलवि स्वजनवर्ग तराया जाण तूं सगुण भारतराया ! ॥ ७९
धन्य वंशकुळ भारतरावा ! वांटता त्वरित भार तरावा, ।
ऐकिजे बहु अनादरराया मागिजे सदय यादवराया ! ॥ ८०

देखोनि वत्स धरि माउलि मोहरीती जे कैंवि बोलल फणी मुखमोहरी ती ।
जाला सैंतोष्र नर देखुनि विप्रजाहो मानी गुरु भरतसत्तमविप्रजाहो. ॥ ८१

---

१. भंग करा. २. सर्व. ३. ज्याचें धनुष्य मोडलें आहे असा. ४. त्वरेनें. ५. गुणांचा समुदाय. ६. गुरुभक्तांस. ७. तोंडा. ८. विजयाची, यशाची. ९. अर्जुन (डाव्या हाताने बाणांचा नेम धरण्यांत कुशळ.) १०. हरीच्या कथानकाची लीला. ११. अपमान.

इंदूवंशमणीस देखुनि फुले सिंधू तपाचा भरे,
बिंदूतुल्य जयासि हे भवनदी, निंदूनि दुर्लोभ रे ।
दाता सद्गुरु येरिती निरखुनी ताता म्हणे पाहणें
आतां सावध सत्य सत्य जगतीनाथा ! मुला ! राहणें. ॥ ८२
लाधलें धनु अखंडलतातें अस्त्र उत्तम अखंडलता ते ।
सायकास जडतांचि कमानीं कांपती भज सुरादिक मानी. ॥ ८३
शिक्षितो दितिकुळासि कवी तो तेंवि हा कुरुमुलां सिकवीतो; ।
अंबिकावरसुनेस भलीला पुत्र जो प्रथम रासभलीला. ॥ ८४
मुख्य तो प्रथित शिष्यसमाजीं या गुरु सकळदृष्टिसमाजी. ।
हा शर क्रमि महाघन वोढी सर्व मी न समया धनु वोढी ॥ ८५
जो रिपुकुळहुताशन वारी कोण तच्छरपराशन वारी ।
ऐकुनी नरसुधारसवाणी बोलिली नृपजवाक्य भवानी. ॥ ८६
तो पाहा कुरुसत्यकीं भवनदीमाया तरायास रे,
सापातुल्य अजिह्मग प्रथितसे चापा धराया सरे ।
नृपा ! हा बहुमान्य धन्य नर, जे यापासुनी शीकले
बापा ! ते कळिकाळदुस्तरमहादापाहुनी चूकले. ॥ ८७
येती जे शरभार भारतवरा ! देती बहु त्रास रे
वेती फार अशुद्ध शुद्धकरिचे नेती परत्रा सरे ।
हेती कीं क्षण एक घेउनि विरा नीतीकरे झुंझले
लेती हे रव चित्तचौकडितरी मी ती रिती झीजले. ॥ ८८
बा ! रे ! तूं बदसी यथार्थ परि हे सारे निवाया निती
सारे हे जगतीधणी सुरमणी हारे असे मानिती ।
दारेचा धरि वेष लेश मनना थोरा म्हणोनी रणा
वारे मच्छरचंडदंडभय हें गारे धरी धारणा. ॥ ८९
गुरु ही रणी सिंह हाही तसारे. नभी देव त्याचे पुरोहीतसारे ।
मिळाले सुकौतूहला पाहयाला मही वोढिती हे स्वचापा हयाला. ॥ ९०

---

१. आखंडल म्ह० इंद्र आहे तात (पिता) ज्याचा त्यानें अर्जुनानें. २. 'मानिलें सुख' असाही पाठ आहे. ३. अखंडित (न मोडलेल्या) वेलीसारखें. धनुष्याला लतासादृश्य कल्पिण्याचा कविसंप्रदाय आहे. ४. दैत्यांस. ५. बृहस्पति. ६. 'तापा हा गुरु' असेंही पाठांतर आहे. ७. सरळ जाणारा. ८. खड्ग.

[1]गाधीनंदनतुल्य जो गुरु हरी व्याधी तया नंदना
आधी साधुनि शुद्ध तो महिधवा! राधी पुढें कंदना, ।
बाधीना भय ज्यास चंडसमरीं बाधी सरे चाचरे,
साधी सर्वयशा नरेंद्र! बहुशा वा दीन तो चाचरे. ॥ ९१
आला यादवमित्र देखुनि गुरू जाला मनीं तोष रे.
काळातुल्य धनुष्य घेउनि करीं बाळाबुजी तो सरे; ।
[3]धाला जो समरांत अर्जुन तदा काळावला मानसीं,
घालावा नमनप्रकार म्हणुनी खालावली मानसी. ॥ ९२
नरमुखकमळातें देखतां विप्र मानी
कनकवत घडी ते ते रिपू दुःप्रमानी ।
परमतर भले पां नीभले धीरधीचे
सकळहि लहऱ्या हे श्रीहरी वारधीचे. ॥ ९३
[4]अरण तरि गमे या बोखेटें भूभुजाला;
सरण तरि कसें या ध्येय शंभूभुजाला, ।
वधुकरकमटानें विप्र मोहांत पाये
निजकरिं शिकवीला हा मला हातपाये. ॥ ९४
सचकित मग कांहीं पार्थ विप्रा वदे हो!
श्रवण करि मनानें भाव तो दिव्यदेहो, ।
'बहुत दिवस आम्हीं भोगिले ज्या श्रमातें,
सकळ विदित ते कीं तूज पुण्याश्रमातें.' ॥ ९५
पार्थ तो स्वकुळदिव्यमणी रे! तेधवां बहु पडे श्रमणीं रे! ।
पाहुनी मजवरी कुरुना त्या बोळखे गुरु मनीं कुरुनात्या. ॥ ९६
'साचा हा हरिपुत्र कीं जनकसा कांचावसो कासया
वाचा हिंपुटि बोलसी रणमहीजाचा वसी कासया ।
[8]माचा नाथ अनाथबंधुजननी भाचा तुला तो खरा
बाचा शत्रुसमूह तीं निर्वेटिला गा चातुरामूखरा! ॥ ९७
लावीं [10]शीत धनुर्धरा! धनुलतीं भोंवीं न कांहीं मनीं,
दावीं लाघव चापबाणकुसरीं, हावी धरीं कामनी ।

१. विश्वामित्र. २. तृप्त झाला. ३. यश न करणे. ४. वाईट. ५ पुण्याचा आश्रम म्ह० स्थान त्यातें. ६ कचरतोस. ७. लक्ष्मीचा ८. बां. ९. मारिला, १०. दोरी. ११. चिंती, मानीं. १२. कौशल्य.

त्वावीं तुल्य करोनियां मन रणीं नावीं असा या जनीं,
खावीं सर्वशुभाशुभें मन तरी तीवीं रिपूभा भनीं.' ॥ ९८

(सवाई.)

ऐकुनि सद्गुरुवाक्यसुधा कुरु निर्दळिता गुरु ध्याउनि भावें
घेउनि कार्मुक लाउनि टोरक तो मनपूर्वक थीर स्वभावें।
तात म्हणे, 'नृपनाथसुता गुरु सत्य हिता वदला घडिला या,
हा दयसागर पूर्णसुधाकर बाळप्रियंकर मी बडिला या. ॥ ९९

(श्लोक).

राया! विस्मित मत्स्य होउनि वदे. 'गा! या तुम्हां दों जना,
ना या सृष्टित जोड, कीं नरमणी व्हाया असे आज ना, ।
माया तों अकळंकचित्तकमळीं काया दिसे येकसी,
जायाचे तुम्हि मांडतां मज गमे, वांया रिती लोकसी.' ॥ १००
असा ऐकतां शब्द त्या बालकाचा, वदे सोयरा जो जगत्पालकाचा, ।
'असें या गुरूच्या कृपामात्र मीं रे! नसें यासरी दूसरा विक्रमी रे! ॥ १०१
सख्या! भक्ति आम्हांस याचे पदीं रे, सदां रक्षिलें कीं बहू आपदीं रे ।
खरा द्वेष त्यासीं असे रांजसा रे! जिहीं गांजिली द्रौपदी रांजसा रे! ॥ १०२
जिचा रूपठेवा सुरीं न्याहळीला, तुझी माय तीचे करी न्याहळीला ।
सदा देववी कीं परीपाळना हो म्हणे, 'हालवी किंकरी पाळणा हो.' ॥ १०३
क्रियाकर्म जीचें अरुंधीरतीरे न जाणे महासंकटीं धीर ती रे, ।
स्वकामा वदे जीव दे देहनाहो नुलंघी कदा वाक्य संदेह नाहो. ॥ १०४
जिचा चांदण्याची कळा चांद शाही नसे ती कसी उग्र नीचा दशा ही ।
जिची लक्ष लक्षी वधू देहलीला सती येकटी ते तुझे देहलीला. ॥ १०५
दिल्हे दान जीनें बहू यान लाखे तिला कष्टवीलें बहूयानलाखे, ।
तरी उत्तरा सत्य याचा हडांचा करूं चूर्ण कर्णादिकाचा हडांचा.' ॥ १०६
दोन ही रणमहीवर तारे पाहतां सुरफरा वरता रे ।
यक्ष होउनि सुराधिप बोंडि गाय पुत्रयश शुभ्र पवाडे. ॥ १०७

---

१. ताप देई. २. उत्तर. ३. यासारखा. ४. राजपुत्रा. ५. सुंदरी. ६. पाहिला. ७. स्नान. कार्य. ८. पति, स्वामी. ९. मुखचंद्राची. १०. चंद्र. ११. साही, सहन करती. १२. उंबरठा. १३. समूह. १४. कौतुकानें. १५. यश, हास्य आणि कीर्ति यांचा रंग शुभ्र मानण्याचा कविसंप्रदाय आहे.

'एक तो हरिप्रियंकर साचा, एक तो उदधि शांतिरसाचा, ।
पार्थ तो धनुकसीं मुखरा हो; द्रोण तो गुरु तयास खरा हो. ॥१०८
चापज्यारव भयंकरसा रे! ऐकतां नरसुरादिक सारे ।
स्तब्धले टकमका भ्रमरी रे, दोन ही चतुर शुभ्रमती रे. ॥ १०९
'रविकर गुरुमाथां झोंबती' या मैतीनी
नर करि शरभारीं मंडपा यैाम तीनी. ।
दिवस तई उणा बा होत आला जरा हो!
नृपसुत वदला कीं 'अर्जुना! लाज राहो.' ॥ ११०
विप्रोत्तमें धनु स्वहस्तसहस्रपत्रीं वोढोनि पार्थ बुजि लक्षसहस्र पैत्रीं. ।
कांहीं उणीव दिसतां, गुरुला तसाची विंधी शरें परम दुर्धर सव्यसाची.॥ १११
रामानेत्रकटाक्षबाण जइसे योगीवरा लागती
ना, तैसीं गुरुसायकें करुनियां कृष्णाग्रजाला गती. ।
कांहीं एक संचित चित्तकमळीं पृथ्वीधवाबाळका-
साठीं तो नर यादवप्रियसखा झाला महीपाळका! ॥ ११२
गुरू शिष्य दोघे महाधीटसे रे! नरांनिर्जरांमाजि ज्यांचे ठसे रे! ।
धरीनात इच्छा रणा नाकराया तुळेनात कोणी सरीना कराया. ॥ ११३
झुंजती बहु जरी दिस ते रे, भागले न सहसा दिसते रे! ।
श्रेष्ठ हा विबुध मानवलोकीं शिष्य मी परम मांनवलों कीं. ॥ ११४
झांकितां रवि शरीं तिमिरानें व्यापिलें घडिस त्या भुमि रानें ।
पार्थ तो शरसहस्रफणा रे सोडुनी करिति मिश्रफणा रे. ॥ ११५
पार्थ हा निपट येकट कीं हो झुंजणार बहु ये कटकीं हो. ।
भाव हा गुरुमनास जडे जी, हात राखुनि तदा झगडे जी. ॥ ११६
शरविसर नराचे तेधवां लोकराया!
द्विजवरमणि झाला पात्र तो स्वीकराया. ।
घनपटळिं बुजी तो चंडभानू तना रे!
हरिसुत शरजाळीं त्या प्रभा नूतना रे. ॥ ११७
निजजनकरिं कामे देखुनी यत्नसा रे,
चमुउदधिमथोनी तो निघे रत्नसा रे, ।

१. धनुर्धरांत प्रमुख. २. धनुष्याची दोरी. ३. उद्देशानें. ४. प्रहर. ५. करकमळीं. ६. भरून टाकी. ७. बाणांनीं. ८. डाव्या हातानें बाण मारण्यांत कुशल. (अर्जुन.) ९. देव. १०. मान्य झालों. ११. बाणांचे समुदाय. १२. द्रोण. १३. शरीरा. १४. अर्जुन. (इंद्राचा पुत्र.)

लखलखिततनूचा पुत्र त्या भूसुराचा
धनुष करि हरीसा ज्यास तो बा सुराचा. ॥ ११८
दोन ही रणमही गजरानी भीडती जंव अही गज रानीं; ।
मानिला समय संकट कांहीं उत्तरें अणि कुल्कटकांहीं. ॥ ११९
तगतगिततनूचा विप्र तो काळसा रे !
धगधगित शिखीसे बाण तेजाळ सारे, ।
लगबगित विसर्जी; पार्थ कक्षोनि तापे,
भगभगित मनानें क्रोधयुक्तप्रतापें. ॥ १२०
करकर धनुशब्दें देह दों दारकांचे,
थरथर हिंवती ते थाट वृंदारकांचे; ।
सरसर शरधाडी येत देखोनि सारे
'हर ! हर !' म्हणुनीयां भाविती क्लेश सारे. ॥ १२१
'महादुर्धरा लाभलों पारणाला, बहूतां दिसां मी करीं पां रणाला. ।
गुरूपुत्र हा तूं न सामान लेखीं[11], जयाचा असे फारसा मान[12] लेखीं. १२२
शरविसरसरें तो झुंजला बापसा[13] रे !
गुरुसुत मग कांहीं खिन्न झाला पैसारे. ।
विकळ कळवळा ज्या पांडवाला हराया,
कुरुपति बहु धांवे तेधवां लोकराया ! ॥ १२३
अशरधनु गुरूचा बाळ देखोन गा ! रे !
नरपतिसुत वाजों राहिले ते नगारे. ।
चढवुनि धनु कोपें कर्ण धांवोनि ये रे !
घडिस रथ पुढारा पार्थही ने तंथ रे ! ॥ १२४
निर्जनकप्रभेसा कर्ण तेजाळकाया,
सरुनि रणमही ये पार्थ तो हाटकाया. ।
कुरु सैरव कसोनी खोंचिले त्या नराला
शरविसर बुजीलें उत्तरा वानराला. ॥ १२५

---

१. विप्राचा. २. तेजस्वी, तकतकित. ३. पेटणाऱ्या. ४. अग्निसारखे. ५. चाञ्चल्य. ६. बाल-भांचे. ७. कांपती. ८. देवांचे. ९. थवे. १०. तृप्ति. ११. गणी. १२. देवांत. १३. द्रोणास-मान. १४. निघून जाई. १५. 'मोहरा या' असाही पाट आहे. मोहरा म्ह० अग्रभाग. १६. सूर्यप्रभेसारखा. १७. बोलण्यासाठीं. १८. सर्व.

यदुकुळमणि निल्या चित्सुखा अर्णवाचे
प्रियकरतर पात्रा निंदुनी कर्ण वाचे, ।
म्हणत बहुत कोपें, 'अर्जुना ! दे रणासी.'
हरिसुत हरिमाने पाहे त्या वीरणासी. ॥ १२६
रवीपुत्र जैसा शनीवक्र होय, तसा कर्ण माघारुनी चक्र होय. ।
तया पाहतां बोलला क्रोधवाचा, सखा सोयेरा श्रीहरी माधवाचा. ॥ १२७
'त्यजोनी खरी लाज कर्णा ! कसा रे ! पळोनी पुन्हां येत निःशंकसा रे ! ।
भरोंसा तुझा त्या कुरूईभेशीला ! भलें घातलें तां तया लाभशीला. ॥ १२८
नृपातें कुडा मंत्र योजावयातें दळा घेउनी ये मही यावयातें, ।
असी बुद्धि तूझी न त्या बोंगळाला सुचे हे मती, भाव त्याचा गळाला.॥१२९
ज्या धर्मधर्में भय गाढ वा रे त्या धाडवीलें वनिं गाढवा रे ! ।
त्याकारणें ये समयो असा रे! आतां तुम्ही सावध कीं असा रे ! ॥ १३०
जाणुनि स्थळ ... पग त्यानें, शिक्षिलें न कुमरा चुकल्यानें, ।
तें निमित्तचि असे समरा या हेंचि कारण तुम्हांस मराया.' ॥ १३१
बोलिला रविज इंद्रकुमारा, 'वोढिली जइं तुझी सकुमारा ।
देखिली सकळ श्रेष्ठ महांनीं काय तैं तव पराक्रमहानी ?' ॥ १३२
'जेधवां विकसिली मधुमाळा ऊठतां बहु तईंच धुमाळा ।
गुंतलाच परि धर्म पणाला हीन यास्तव करू अपणाला. ॥ १३३
धर्म गोडन तुम्ही कपटांनीं टाकिला म्हणुनि एक पटानीं ।
सर्वही सहबधू वनवासा भोगिलें दिवस आज नवासा. ॥ १३४
भीष्मादि जे केवळ प्राज्ञसेनी आहे तयां संनिध याज्ञसेनी. ।
अमानिली ते न सभा रणीची हे मू त्यजी मात उभारणीची. ॥ १३५
कनककीट तो 'सर्व मी स्त्री' म्हणुनियां तमीं गर्व मीरवी ।
परि न येरवी तेंच मात त्या बोलुनी घटीमाजि मातत्या. ॥ १३६
कपट ढाळुनी अक्ष मानवा, निजगुणासरेदक्ष मानवा. ।
तुल्य लेखतां, लाजनात कां ? तुच्छ वाचणें या जनांतकां. ॥ १३७

---

१. सिंहाप्रमाणें. २. गजाला. ३. शनीसारखा वांकडा. ४. अर्जुन हा कृष्णाच्या भगिनीचा (सुभद्रेचा) पति आणि आतेचा (कुंतीचा) पुत्र म्हणून सोयरा. ५. गळासारखा स्वभाव ज्याचा तो. ६. 'कपटसा जळल्यानें' असाही पाठ आहे. ७. कर्ण. ८. स्त्री. ९. द्रौपदी. यज्ञसेनाची (द्रुपदाची) मुलगी. १०. सोनकिडा.

चिंकुर[1] मम वधूचा काढतां गाढखुंनीं,
अधम तइं कसा तूं बोलसी गाढ वाणी ? ।
तरि समज मनानें ऊसणें त्या दिसाचें,
त्वरित तुज क्षणानें दावितों, जाण साचें. ॥ १३८

खोटा अंधकुमार दुष्ट कपटी मोठा मतीमंद रे !
थोटांचे रव ऐकुनी, करितसे, पोटांतुनि दंदें रे ! ।
तोटा यांत यथार्थ तो न समजे, घोटाळती कां रणीं,
झोटींझोटिस हा तंगे न सहसा लोटा असत्कारणी.' ॥ १३९

व्रतस्था काकुत्स्थासमशर जडी त्या धनुलतीं,
हराचापा ऐसी प्रथित नरहस्तीं अतुल तीं; ।
अहो कर्णाचाही नरवपुवरी बोध सरला,
शरांचा; पृथ्वीशा ! तरि रतिमती ना घसरला. ॥ १४०

घडी एक झालें भलें युद्ध, राया ! महाकल्पसा क[illegible]ाढे धराया, ।
बहू बाण लक्षोनि संधीत मारी नराल्यागि, तो बाप ज्याचा तँमारी.॥ १४१
भले वानरा उत्तरा स्यंदनाला शरीं बूजिलें त्या हरीनंदनाला; ।
कुरूचा पती फार आनंद मानी कुंडें भाविलें हें सुरेशें विमानीं. ॥ १४२

नृपा ! तेव्हां कांहीं यदुसुखसखाही गंजबजी,
वदे वैराटीही भरतकुळवर्या गजबजीं, ।
'न याचा बाणानें तँग न क्षण आतां समज गा !
न जाणोनी आलों तव रणवटीं मी सहज गा !' ॥ १४३

भला विराटात्मज तो खरा हो. जाणोनि शंके कुरुभूखरा हो ! ।
न सोसतां कर्कश सायकांचा वोढा, त्यजी हा जिव सत्व कांचा. ॥ १४४
जों झांकला कर्ण सहस्त्र पैत्रीं तों वेढुनी हस्तसहस्त्रपत्रीं, ।
विख्यात तें गांडिव बाणजाळी सोडोनियां एकचि बाण जाळी. ॥ १४५
न पुत्रावरी बाप तो उष्णता [14]वी, परी क्षोभ चित्तांत तो उष्ण तांवीं[15]; ।
असाही बळी तो गुरूचा रवानें निघे पाठ देऊनि लाजीरवाणें. ॥ १४६

---

१. केश. २. हरामखोर दुष्टांचे. ३. द्वंद्व, कलह. ४. युद्धास. ५. टिके. ६. ककुत्स्थ नामक राजाचे वंशजांस काकुत्स्थ म्हणतात. येथें काकुत्स्थ म्ह० राम. ७. तमाचा (राहूचा) वैरी सूर्य. ८. मारुतीला. ९. वाईट. १०. गडबडे. ११. दिक्पाल. १२. बाणांनी. १३. हस्तकमलीं. १४. उत्पन्न करी, पाडी. १५. तापानें.

कर्ण जो रणीं भंगनाकसा तो पळे तई भंगनाकसा; ।
विजय त्यावरी पार्थ लाभला, सुरपती मनीं तोषला भला. ॥ १४७
मत्स्यवंशकुळदीपकज्योती झांकुळेल म्हणऊनि उज्योती ।
वाढवी बहुत स्नेहरवें जी! ऐकिजे वचन तें बरवें जी! ॥ १४८
'कळाहीन आली चमू शीतशीला! भला पाहुनी तोषलाशी तशीला'; ।
हरीपुत्र मत्स्याधिपा सांवरी रे! म्हणे 'बा! यशःस्तोम तूतें वरी रे! ॥१४९
भला बा भला नीभलासी रणाला, बळें जिंकुनी त्या द्विपद्वारणाला. ।
भली रत्नमुक्तावली जे जयाची सख्या! लाधलासी रिपूराजयांची. ॥ १५०
आतां घडी एकचि सावधानी राहें, त्वरें देखसि राजधानी. ।
बाहे रणा वृद्ध पितामहा तो ने स्यंदना, चाल, उशीर होतो. ॥ १५१
पक्षें करोनिच खगासन भागती रे बोले गिरा मग खगासनभागती रे ।
त्या उत्तरप्रियकराप्रति कीं भला हो पक्षें तुझ्या यशकदंबक लाभला हो.'॥ १५२
वदे मत्स्य आतां न घे मात कानीं रणाची, 'मला जाळिले सायकांनीं. ।
न जाणोनि आलों तुझ्या संगतीला. तसें भोगितों प्राक्तनाचे गतीला.'॥ १५३
असी ऐकतां दुष्ट दुर्वास वाचा, वदे मागुता पुत्र तो वासवाचा, ।
'सख्या! हें खरें झुंज निर्वाण कीं रे तगायास तुझी तनू बाणकी रे!॥ १५४
शरीं छिन्न केलें बहु या तनेतें न आतां पुढें सोसवे यातनेतें. ।
सुचे तें करीं, सर्वथा मी न धे रे! हयांचा गुणा, कुंदना तूं रिवे रे!'॥ १५५
कांचावला केवळ मूल त्याला 'बा! रे!' म्हणे, 'काय? तुझ्या पित्याला ।
न दावणें हें मुख भी, कसा रे? सोडूं रणा क्षुल्लकलोकसा रे! ॥ १५६
चहुंकडुनि रिपूचा दाटलाहे फेरा रे!
उदित रणध्वजींचे सोडुनीयां फरारे ।
चपळ गति जयाची ना रेती आणिका ये
पवन तरी तसा तो जाय यांतूनि काये? ॥ १५७
धृतीरश्मीनें कीं मनतुरग हे बांध घडि रे!
महानंदें नेत्रद्वयकमळ सारे उघडि रे! ।

---

१. भग्न नाक ज्याचें असा. २. 'ते घडी' असाही पाठ आहे. ३. झांकेल. ४. गोड स्वभाव ५. यशाची रास. ६. आरिरूप गजाला. ७. भीष्म. ८. गोष्ट, वचन. ९. दुर्गंध, दुर्वाच्य. १०. शरीराला. ११. कचरला, घाबरला. १२. जमाव. १३. फडफडणारे पाखुडे. १४. अश्व. १५. धैर्यरूप दोरीनें.

उभारोनी बाहे, 'नंदिसुत! उभा सिद्ध कदना,'
त्वरें लोटीं अश्वा चतुरतरसौजन्यसदना!' ॥ १५८
लखलखित दिनेशातुल्य काया जयाची
अखिलयशकळा तो त्या कुरुराजयांची, ।
उभउनि रण बाहे त्यासि, 'बा! हे रणीं घे
निजकुमरशरांचा वोघ, बाहेर नीघे.' ॥ १५९
अहो! सिंहा ऐसा गडगडुन कृष्णप्रियकरा
कराग्रानें सांगे, 'बहुत बरवें, जी! रण करा, ।
हरें तोषें केलें मुखरण तुला कारण तरी
तरीं दावी शौर्या त्वरित मनभ्रांतीच उतरी.' ॥ १६०
'जयाला अजा भीष्म ऐसा कैपाळीं, तयाला न तोषेल कैसा कैपाळी? ।
विशेषें कृपाहस्त या मस्तकीं रे! तुझा श्रीहरी तुल्य नेमस्त कीं रे!॥ १६१
अहो केसरीचा जरी बाळ सांना तरी काय टाकील तो आवसाना? ।
तसें बाळ युद्धीं नसे वक्र मी रे! तुझे, यामुळें बोलती विक्रमी रे! ॥ १६२
सदा आसरा कीं कृपामांडवाचा खरा मूळआधार तूं पांडवाचा, ।
दिल्हें दुःख दुर्योधनें, ते अहंता त्यजोनी जनीं भोगिलें कीं महंता!॥ १६३
दिल्हे क्लेश गोवूनि धर्मा पणाला असें काय आच्छादिलें आपणाला? ।
समस्तां तुम्हां देखतां विश्वमान्या सभे आणिली शुद्ध पांचाळकन्या.॥ १६४
कीर्ती तुझ्या विखरल्या दशदिग् अंफाटा मी एकलीं तव पराक्रमवृक्षफांटा, ।
युद्धांत निश्चळमना! सैमना कराया होतां उणें तव कुळास किं लोकराया!' ॥
दोघेही गुण कार्मुका चढवुनी बाणा कमानास रे!
लाऊनी बहु सोडिले नरपती ते नाक मानास रे! ।
गेले उंच समस्त, लेखसमुहो हृत्पंकजीं खोंचला.
वृत्रारी करअंबुजें विनविती, 'सखासि जाऊं चला.' ॥ १६६
गंगापवित्रतरणीसम पुत्र तीचा जो श्रेष्ठ सर्वकुरुपांडवभूपतीचा, ।
सोडोनि बाण रविअंबरभूजगातें झांकोळिलें सकळ अंडज भूज गातें. ॥ १६७

---

१. भीष्म, गांगेय. २. अर्जुना. ३. महादेवानें. हिमालयपर्वतावर किरातरूपी महादेवाशीं अर्जुनाचें घोर युद्ध झालें, त्यांत महादेवानें प्रसन्न होऊन त्यास पाशुपतास्त्र दिलें, या कथेचा एथें संबंध दर्शविला आहे. ४. ललाटीं, दैवीं. ५. महादेव. ६. सिंहाचा. ७. लहान. ८. श्रेष्ठा. ९. पसरल्या. १०. अपार. ११. सामना. १२. धनुष्याला. १३. स्वर्गास. १४. देवसमुदाय. १५. हृदयकमळीं. १६. झांकिलें.

नृपा! बाणें झांकी नदिसुत मही सागरगिरी,
तशा संधी हाणी नर शर, तयानें गिरिगिरी. ।
अहो! आली वृद्धा कुरुकुळप्रसिद्धा, नर तसा
त्यजोनिया त्या ये निज रिपुवरी काळवतसा. ॥ १६८
हाही प्रचंड करणी धरणीपती रे! दावी जया निरखितां, सुर कांपती रे! ।
जो बाहुजप्रतिरिपू गुरु त्या विरामा जिंकूनियां जगति घे बहुशा विरामा॥१६९
आंजावला कुरुपती बहु मानसीं रे! आक्रांत थोर उठला दळमानसीं रे! ।
'मेला सुयोधन' तया वदती घडीला, कोणी न लोचन पराक्रमि ऊघडीला. ॥
दुःशासनादिक कुमार चतुर्थ त्याचे त्या गर्भअंध धृतराष्ट्ररिपूपित्याचे ।
आले मधें सतत विक्रम दाखवाया, गेले शरें बहुत भोगुनि दुःख वाया.॥ १७१
जसा सिंह पिंजारुनी घांव घेतो करी देखुनी, पार्थ तैसा रिघे तो. ।
दळीं शत्रु भंगावया दुर्जनाला जयानें सळें पाठवीलें वनाला. ॥ १७२
सोडोनि बाण नर त्या करिकेतनाचे रक्तप्रवाह झरवी असकेतनाचे ।
तोही उदंड शर चंड कसोनि त्याला विंधी हरीप्रिय सुधारस सेवित्याला.॥१७३
पार्थ तो रणि अनावर साचा सूड घेति न दहा वैरसाचा. ।
भागले तुरग सूत रथा रे! तेधवां रिपु महीवर थारे. ॥ १७४
सगुण धनुष छेदी एकबाणेंचि राया!
सगुण नर पुन्हा तो देह त्याचा चिराया ।
उफळुनि बहु सज्जी स्तोम तो सायकांचा
मुकुटपट उडाला त्या कुरुनायकाचा. ॥ १७५
दशदशक रिपूचे झुंजते बंधु होते
सकळहि नर धाकें कीं पळाले अहो! ते ।
हसति बहुत भीष्मादीक जे कां वयानें
वडिल म्हणति, 'कैसे लंडे जाती' भयानें. ॥ १७६
नरें बोढिला तो यशोलाभ नाना रिपू विक्रमें सर्व जोला भनाना. ।
पुढें काय कीजे मनासीं कळेना नराचा शरस्तोम तो आकळेना. ॥ १७७

१. चक्कर, भोंवळ. २. थोर पराक्रम. ३. 'दीपांस युद्धसमयो घडला वरा की, झाकी शरीं विजय भूतल अंबरा कीं' असेंही पाठांतर आहे. ४. क्षत्रियाचा शत्रु. ५. अस्वीका, अविवाहिता. ६. विश्रांति. ७. बडबडला. ८. सैन्याच्या मनांत. ९. चार. दुःशासन, कर्ण, दुःसह आणि विंशति. १०. जन्मांध. ११. छळें. १२. सर्व शरीराचे. १३. सेवन करणाराला. १४. वर्षावा. १५. दोरीसहित. १६. गुणवान्. १७. झोंमर. १८. ढक. १९. झाला. २०. बाणांचा समूह. २१. वश होईना, आवरेना.

विजय जयपताका लाउनी दिग्रथीं रे!
डवडवित यशानें जाय आल्या पथीं रे!।
मतिहर मोहपाशीं बद्ध जे शत्रु होते
अवरुनि भ्रमअस्त्रा मुक्त केले, अहो! ते. ॥ १९८
येरीकडे कुरुपती सहचक्र जागा झाला, अवस्त्र तरि सांगत कीं 'सजा गा!।
वेढोनि घ्या सकळ सैनिकशत्रु जा त्या, आणा जिवंत सनपूर्वक क्षिप्र जात्या.'॥
अवस्त्र सेनाजन आपणाला देखोनि लज्जे धरिलें पणाला,।
कीं निश्चयें 'मी हरिसूत मारी.' तो बोलिला भीष्म जसा तैमारी. ॥२००
'चाल चाल गा! राजनंदना! धरिसि बाउगा छंद कंदना,।
देउनी यशा आपुले करें बोलसी जसीं मूर्ख लेंकरें. ॥ २०१
काय झुंजला पार्थ हा न रे! करिशि बोलुनी व्यर्थ हान रे!।
जितुनी तुम्हां सर्व राजसा फिरुनि पाहतो सिंहराजसा.' ॥ २०२
जनकजनकमाते ऐकुनीया सुकानें,
स्वहित म्हणुनि केली मान्य त्यां नायकानें.।
सजिव दळ कुरु तो जाय घेऊनि देशा
हरिसुत करि तेव्हां उत्तरा ऊपदेशा. ॥ २०३
'बा! समग्र मम भाव[12] लपाला. आज ना वद यथार्थ नृपाला.।
दीधलें तुजचि सर्व यशाला या जगीं उजळि कीर्तिमशाला.' ॥ २०४
शमीवृक्षापासीं रथधनुशरस्तोम सकळा
कळांचा ठेवोनी प्रथम रथिं बैसो सरकळा.।
कळाया नाकोणा नर प्रथम घे वेष बरवा.
स्वानें मत्स्यातें वदत, 'तुम्हि जी! कीर्ति मिरवा.' ॥२०५
सुशर्मा[13] भंगोनी नरपति[14] पुरामाजि सरला.
स्वपुत्राची वार्ता अइकत स्वतोषा विसरला.।
'अहो! कैसें गेलें मुल कुरुदळाब्धीवरि भलें?
नसे सारथ्यासी, कठिण तरि युद्धास निभलें.' ॥२०६

१. अर्जुन. २. परिपूर्ण भरलेल्या. ३. दुसरीकडे. ४. सैन्यासहित. ५. सिद्ध व्हा. ६. जातीनें. ७. सूर्य. ८. हानि. ९. आजोबाचें (भीष्माचें) वचन. १०. 'भूनायकानें' असाही पाठ आहे. ११. 'हयाचा' असाही पाठ आहे. १२. अर्जुनभाव. १३. सुशर्मा हा त्रिगर्ताधिपति, यानें दुर्योधनाच्या सांगीवरून विराटाचीं गोधनें हरण केलीं, परंतु पुढें विराटानें त्याला जिंकलें. १४. विराट.

तों चार येउनि निवेदिति राजयातें, 'घेऊनि ये परम उत्तम जी जयातें.' ।
हें ऐकतां मन सुतोषित होय त्याचें, त्या उत्तरप्रियसुतागमनीं पित्याचें. ॥ २०७

विमळ हे कथा बोलिला हरी सकळ दुष्कृतें सद्य संहरी; ।
ऐकणारही श्रीहरी भला एक जो जगामाजि शोभला. ॥ २०८
सकळव्यापक यादवरावजी परमसुंदर भारतराव जी ।
वदवि सत्परिपूरित कामना नमन त्या हरि चिद्रुप वामना. ॥ २०९

अध्याय आठवा.

जया हृन्मंदीरीं हरिभजनदीप प्रजळला,
जळाला कीं त्याचा भवभ्रम, दिगंतीं उजळला. ।
जळाची सिंधूची अखिल लहरी तो सतत रे!
तरे सत्संगीं हे मनभवनदी सौख्यवतरे. ॥ १

मना नाथाबंधू भजुनि भवसिंधू उतरती
तरी त्याचे संगीं धरुनि भवरंगीं उपरती! ।
रती मानी तेणें लभ निज सुखाचा पदरसा,
रसाळा बुद्धी घे हरिप्रियजनाच्या पदरसा. ॥ २

जयाचा सदा सत्कथीं कान राहे तयाचे घरीं संपती कां न राहे? ।
तरी ऐक जन्मेजया भारताची कथा सारि त्या चित्स्वयंभारताची. ॥ ३

'बारे मोहनअस्त्र मुक्त कुरुचे जाल्या दळाधीप ते
सारे खिन्न वडील भिन्न करुनी गेले पुराधीपते! ।
दारेचा धरि वेष अर्जुन तसा भूमिंजयाला जये,
गारे देउनि अंतरीं नृपमुला हे बोलतां लाज ये. ॥ ४

भूमिंजयोजनक ऐकुनि मात याची, शौर्यागळी मग वदे महिमा तयाची. ।
'हा धन्य मत्सुत विराजित विक्रमानें जिंकूनि ये कुरुमहाजन शक्रमानें. ॥ ५

कुरुयशकुसुमाची माळ त्याला गळाला,
कठिणरणवठीं ना धीरभावो गळाला; ।
रिपुभुजगविषाची तप्त सोसोनि आहे
सकळयशमणी तो घेउनी येत आहे. ॥ ६

---

१. दूत. २. विरक्ति. ३. उत्तर. ४. महिमा. (या संस्कृत शब्दाचा संस्कृताप्रमाणें पुल्लिंग-प्रयोग न करितां मराठींत स्त्रीलिंगी प्रयोग क्वचित् करतात.) ५. नष्ट झाला. ६. कपाला.

ऐकोनि कंक म्हणे भूपतिउत्तमाना, माना सुकौतुक, रिपू घडल्या अमाना. ।
मानाथमित्र रथसारथि नाटिका या काया समागमरणीं कुमरा टिकाया.' ॥ ७
तों गोप येउनि निवेदित राजयासीं, 'भूमिंजयो विमळ घेउनि ये जयासी.' ।
ऐकोनि हें वचन फारचि तोपला हो! आनंदसिंधुंत समज्जुनि घेत लाहो. ॥ ८
आज्ञा करी बैहुज स्वप्रधानीं, 'शृंगारिजे सत्वर राजधानी, ।
नेवोनियां नागहया मैयो हो! वेवोनियां बा! गुणधाम या हो! ॥ ९
रंगिता बहुत साकर वाटा, दक्षिणेसहित साकर वाटा, ।
उंच नीच जनदीपक लावा, भाव हा पुरकरां उकलावा. ॥ १०
येतसे जिणुनि तो रणिं राजे, यानिमित्त पुरि तोरणिं राजे; ।
उत्तर प्रियपणें उजळावा भाव हा जनवधूंस कळावा.' ॥ ११
सुवर्णाचे माथां कलश नेवरलीं जडित गा!
तगागीती तेणें उणिव क्षण ये वृद्धपतगा ।
अशा गेहींगेहीं सरस गुढिया त्या उभविल्या
बिदीं[10] नानारंगें सुमनभरमाळीं सजविल्या. ॥ १२
सदा शोभल्या ज्या सुदाराखडीनें अशा बायका सभ्रदारा खडीने, ।
वरेपीटलेल्याच दारांत दारा उभ्या राजिती चंद्रवक्त्रा उदारा. ॥ १३
एवं तो नृपवाक्य वंदुनि भला मंत्री तयेची क्षणीं
सारे सिद्ध करोनि हर्षगजरें भूमिंजयो लक्षणी ।
आणी राजपुरींत, उत्सवभरें तों ईकडे धर्मोधणी
'कंका! खेळुनि अक्ष सद्य पुरवी माझी' म्हणे 'कां धणी'. ॥ १४
'स्वयंभूज मी भूजगो शेष कां जी! तसा जो सुधाभूप निःशेष कांजी. ।
अशा नैषधाचा मतिभ्रंश केला तशा खेळणी तूं कसा बा भुकेला? ॥ १५
नृपा! पाहे पांडूतनय जरि रामानुजपदा
सदा ध्यातीं चित्तीं, तरि करि तयां खेळ अपदा, ।
म्हणोनी भूनाथा! त्यज त्यज असा खेळ कहरी
हरी सद्बुद्धी कीं सहयश निजानंदलहरी. ॥ १६

१. कृष्णप्रियसखा. २. ग्रास होऊन. ३. क्षत्रिय. (विराट.) ४. उंट. ५. गुणनिधि. ६. तोरणांनीं. ७. शोभे. ८. मंगलार्ती करून. ९. हिरा, पद्मराग (माणिक), पाच, गोमेद, मोतीं, इंद्रनील, पुष्कराज, प्रवाल (पोंवळें), वैडूर्य किंवा तोरमळी हीं नऊ रत्नें. १०. मार्ग. ११. पुष्पमालांनी. १२. राजा. १३. इच्छा.

न वेळा खेळाया नरपति ! असे तूस मज गा !
जगामध्यें हर्षें प्रियकर घडी हे समज गा !' ।
न मानोनी त्याचें वचन नृप खेळोंचि सरला,
स्वपुत्राचे मोदें निजमतिमदें तो विसरला. ॥ १७
'धन्य ! धन्य ! मम हेतु कुमारें, उत्तरें पुरविला सुकुमारें, ।
मंथुनी कुरुसमुद्रहि एकीं घेउनी जयरमा खेळु ये कीं. ॥ १८
कुरूंच्या दळीं सारथी शक्रमाने कसें जिंकिलें उत्तरें विक्रमानें ? ।
वयें धाकुटें बाळ माने मला हो ! द्विषद्दुर्जनीं काळसा नेमला हो !' ॥१९
बृहन्नळा सारथि हो जयासी त्या उत्तरा काय उणे जयासी ?' ।
हें ऐकुनी कंकगिरा जसा रे ! संतप्त अग्नी नृपराज सारे. ॥ २०
'सतत सदनिं नाचे, गाय, घे क्षिप्र वीणा, रैंणवटिं कइसी ते सांगती गा ! प्रवीणा? ।
चतुरतर तुला म्यां नेमिलें सर्वभावें सकळहि कळलें तें आज तुझ्या स्वभावें.' ॥
'सुरादीक दृष्टी न जे नीटकेसी तिथें कौरवी काय सेना टिकेसी[6] ?' ।
जरी भूप धिःकारि ही कंकवाणी, तरी मागुता तीस निःशंक वाणी.॥ २२
निजकुमरयशातें जाणुनी अक्षयें कीं, कुरुकुळमणिभाळीं ताडिला अक्ष एकीं. ।
रुधिंतकण पडावा स्वल्पही या धरेया, द्रुपदि तंव पवित्रा पात्र आणी धराया. ॥
नृपा ! रक्त त्याचें जरी ये मही रे ! अमर्याद काढील तो येम ही रे ! ।
तरी भस्म होईल संदेह ना हो ! असा वंद्य तो द्रौपदीदेहनाहो ॥ २४
हिरण्यरेतातनया तनाला देखे धवा नूतन यातनाला, ।
देखोनियां वल्लभमान नीची ते धांवली स्वामिणी मानिनीची. ॥ २५
घेऊनियां हस्तकिं तस्त साची त्यामाजि तें सर्वहि रक्त सांची. ।
स्वअंचलें भाळ पुसोनि तीनें गंतव्य केलें नृपती ! सतीनें. ॥ २६
हेळीतुल्य[17] शरीरकांति विलसे, हेळी[18] तयाला कसा ?
सेळीचे[19] स्तनतुल्य तो नरपती छेळीत निःशंकसा. ।
वेळीं ते नरराजपुत्रहि बहू मेळीं जनीं शोभला.
भेरी दुंदुभि वाजवीतचि घरा शालीयशी ये भला. ॥ २७

१. जयश्री. २. खरोखर. ३. गायन करी. ४. रणांगणी. ५. बृहन्नलेच्या पुढें. ६. काय टिकणार. ७. वर्णी, स्तवन करी. ८. धर्माच्या. ९. फांसा. १०. रक्ताचा थेंब. ११. भूमीवर. १२. यम. १३. नाथ. १४. द्रौपदी द्रुपदाच्या यज्ञांत अग्नीतून (हिरण्यरेतांतून) निर्माण झाली. १५. शीघ्र. १६. पदरानें. १७. सूर्यतुल्य. १८. हेळणा करी. १९. अजागलस्तनाप्रमाणे टाकाऊ.

मिरवत गजरानें आणिलें मत्स्यजाला,
अइकत नृपचित्तीं फार संतोष जाला. ।
सकळहि गजवाजीयुक्त कीं सभ्रदारा
दुमदुमित नगारीं पातला तो उदारा ! ॥ २८
'मत्पुत्र इंद्रासम ज्यास यावा बृहन्नळायुक्त घरासि यावा ।
मंत्रीजनाआदिक नागरीं कीं जावें सुखें स्वप्रियआगरीं कीं.' ॥ २९
हें वंदिलें वचन ज्या नृपसेवकांनीं, त्यांलागि कंक निज सांगत भाव कानीं, ।
'आणा गृहांत तुम्हि उत्तर एकल्याला, नाणा कदापि नैर नाटिकीअंक त्याला.
अहा ! भूपती बोल माथा नसावा परी भाव त्याचा मनीं आनमावा, ।
नैसे या उणे ये असें काम कीजे म्हणोनी तुम्ही मद्रवा आइकीजे. ॥ ३१
एवं उत्तर एकला नरपती ! आला पित्यासंनिधीं.
तोषोनी मुखपद्म चुंबुनि वदे, 'तूं धन्य राजन्निधी ! ।
बा ! रे ! कौरवचक्र शक्रसरिचें निर्दाळिलें त्वत्करें
दिल्हें कीं तुज सत्यसत्य यश हें गौरीधवें शंकरें. ॥ ३२
बा ! रे ! तूं ममवंशमंडण चमत्कारें द्विपद्धारता
हारे देउनि धाडिले बहु तिरस्कारें रिपूभार तीं ।
गा रे हे मम मानसप्रियकरा ! सारे तुला देखतां
वारे हा मम ताप, चाप करि तूं नारे मनीं लेखता.' ॥ ३३

(सवाई).

ऐकुनि उत्तर बापप्रियंकर देत सविस्तर उत्तर त्याला.
सावध अंतर जोडुनियां कर, सांग यशस्कर भावें पित्याला, ।
'जाणसि कौरव जे रणभैरव ते यशगौरव देति कदा ना
येउनि किंनर देउनि संगर धीरपुरस्कर घे यशदाना. ॥ ३४
सर्वहि कौरवचक्र भयंकर बाळप्रियंकर मी तुज जोगा,
देखुनि भारत देवसभारत जो दळभार तसा मज जोगा ।
कंप सुटे, धृतितंतु तुटे, मन खंति विटे, जिवमान जगाया !
त्यासम काळहि काळ न बा ! तूं भुपाळ तुझे गमला न जगा या.' ॥ ३५

---

१. अर्जुन. २. नाटकशाळेच्या वेष घेतलेला. ३. 'नरा या उणें ये असें कार्य' असाही पाठ आहे. ४. कुरुसैन्य. ५. इंद्राच्या तोडीचें. ६. त्वां. ७. गंधर्व.

(श्लोक.)

धरूनी करीं आणिला तात दारा उगे बैसले कंक जेथें उदारा ।
नमस्कारिला कंक भूमिंजयानें, 'कृपेनें तुझ्या ये स्वगेहा जयानें. ॥ ३६
कां हो ! हें यतिवक्त्रपद्म सुकलें, कां होतसे या मनीं,
दाहे क्लेशविशेष हा द्विजमणीनाहो असत्कामनीं,' ।
पाहोनी नृपभाव सर्व वदता हा हो म्हणे तातया !
'बाहो ध्या पसरोनि दोष क्षमणीं त्या हो कृपा दातया. ॥ ३७
विप्राचा क्षण कोपचंचळशिखी जाळील लोकत्रया,
ब्रह्मादीक सुरेंद्रचंद्रहि भिती, हे कायसे चित्र या ? ।
याचा होय कृपाकटाक्ष रति त्या वैकुंठवासी हरी
रक्षी नित्य, असत्य सर्वहि कुड्या या दुर्भवा जो हरी. ॥ ३८
गुरुब्राह्मणाचे पदीं भाव ठेवी तयालाच लाभे निजानंदठेवी.' ।
अशी उत्तराची सुधातुल्य वाणी नृपें मानुनी ब्राह्मणा फार वाणी. ॥ ३९
संतोषला धर्म सदा मनाचा, जो सोयरा चिद्रुपवामनाचा ।
म्हणे, 'नृपा! तूं मम मानसाचा आल्हाददाता नृप! मीन साचा.' ॥ ४०
गेले ते निशि मान मानवपती, आला प्रभातें रवी,
तेव्हां तो कुरुराज राजपदवी अंगें स्वयें मीरवी. ।
सौही वेष त्यजूनि मूळरूप ते होती यथामान रे!
पार्थें सर्वहि आणिला निजकरें तो शस्त्रसामान रे! ॥ ४१
असा धर्मात्मा तो सकळयशवृंदींच वरिला
हरी चिद्भानूचा किरण धरि छत्रा चंवरिला. ।
करीं घे वायूचा तनय द्वय माद्रेय एकळा,
धरूनी शस्त्रासी नरपति उभे ते सुरेकळा. ॥ ४२
विराटाचे सिंहासनिं सनकसा तो बिलसला.
स्तवी हेलिकासारीं जनजनक साचा सरसला. ।
स्वनेमें ये मत्स्यप्रभु निजसभे तों निरखिला,
वरिष्ठस्थानीं त्या प्रियकर चिदानंद अखिला. ॥ ४३

---

१. नाथ, पति. २. अग्नि. ३. अल्प, रतिभार. ४. वाईट. ५. दुष्ट संसार. ६. ठेवा. ७. स्तवी. ८. चैतन्यरूप. ९. कृष्णाचा. १०. समग्र. ११. साहीजणें. १२. देवसदृश. १३. सनकनारद महर्षिसारखा. १४. शोभला. १५. हृदयरूप सरोवरीं.

'न ऐसी मर्यादा तुज उचित गा! ब्रह्मकुमरा!
बरा नीतीनें तूं चतुरगुरु जो होय अमरा, ।
तसा कैसा स्थानीं प्रभुवरवरिष्ठीं वससि रे!
तमारीचे भानीरमल पद तो काय शशि रे!' ॥ ४४

(सवाई.)

ऐकुनि हें नर हास्यभरें निजआस्य बरें नृपती! बदला हो!
'हा गुणसागर पूर्णकृपाकर विश्वप्रियंकर जाण भला हो! ।
अमृतमानस मान सुमानस राजस रॅाजसभार्य खराहो!,
भारतवंशज भारतअंशज हा गतभ्रंशें जगन्मुखरा हो! ॥ ४५
हा दयभारवि तो जगभारवि जेंवि नभा रवि सारवि भाला,
या अइसा बहु मान न मानववल्लभि हा यजमान विभाला, ।
वोळख तूं कुरुवल्लभ हा बहु दुर्लभ कीं जगतींत हि राजे
हा दयमानस सर्वसमानस मानवशो जगतींत हिरा जे. ॥ ४६

(श्लोक.)

लक्षेंलक्ष मैतंग तंग करि जो कक्षेतळीं ये कदा,
पक्षेंद्रासम शत्रुसर्पनिकरा शिक्षेकरी एकदा. ।
विक्षेपें जगतीतळीं प्रथित हें अक्षेदही लक्षणें.
भो ये पांडव तो करीत दुसरा लक्षी महालक्षणें. ॥ ४७
शिक्षिता तव हया गुणधामा तोच कीं नकुळ उत्तम नामा ।
माद्रिनंदन कनिष्ठ सहस्रा राखिता काळप या वन उस्रा. ॥ ४८
पुरंध्री सैरंध्री नववदनचंद्री उपरमा
रमाकांतप्रेमी द्रुपदतनया सत्वपरमा, ।
अमानी दुःसंल्धे दिवस नृपती! आज सरले,
म्हणोनि हे वस्त्रादिक नगजडामुक्तसर[11] [12]ले ॥ ४९
विडा दे वेल्हाळा द्रुपदवरबाळा समज गा!
जगामध्यें राजा नृपवरप्रभू तूस मज गा! ।

---

१. सूर्याचे. २. कांतीप्रमाणें स्वच्छ. ३. अर्जुन. ४. 'राजसमर्थ' असाही पाठ आहे. ५. उन्मत्त गज. ६. गरुड. ७. समुदाय. ८. गाई. ९. पतिपुत्रवती स्त्री. १०. दुसरी लक्ष्मी. ११. अलंकार जडावाचे डागिने. १२. थाली.

सदा लावण्याची टवटवि इचे वक्त्रकमळीं,
अली या पादाब्जीं निशिदिनि वसे चित्तविमळीं. ॥ १०

हा धर्मराज धणि कीं क्षितिमंडळाचा, तो वायुपुत्र, सुत मीहि आखंडळाचा, ।
माद्रेय ते चतुर, द्रौपदि हे सुशीळा, मेला इला छळुनि कीचक तो अशीला.' ११

राजा राजकुमारवक्त्रकमळीं पाहे, तसा तो भला
बोले, 'जी नृप! सत्य नित्य बरवा दिग्मंडळीं शोभला. ।
याचा विक्रम शक्र ही न पहुडे, राया! कुरुवाहिनी
येणें घेउनियां यशा, फिरविली ते सर्व गा! वाहिनी. ॥ १२

विधी कल्पी जैसा सकळकळि संतापतरणी,
निवे तैसा हा ही, रिपु निरखुनी तापत रणीं. ।
नदीपुत्रा ऐसे प्रथित रथि योद्धे सकळ सो
रणीं त्यांची हारी यशध्वजपताका सकळसा. ॥ १३

कसें शोभे त्याचें कठिणधनु तें बाण विविधी[१२]
[१३]विधिअंडी ऐसी नरमणि न जाणे रणविधी; ।
विधीनें निर्मीले अतुळतर हें पांच तरणी
रणीं यांसी जोडा करि नर तयावीण धरणीं. ॥ १४

सरे ना असे बाणराशी कमानीं, हरीतुल्य यातें तिन्ही लोक मानी. ।
नभःस्फोट शंखध्वनी भू थरारे, कडेलोट होती गिरी पैथिरा रे! ॥ १५

धनुष्याचे शब्दें क्षितितळि अहीं तो डळमळी,
शरें एक्या बाटे करि अहिमहीमंडळ मळी, ।
असा तो हा पार्थ प्रियकर हरीचा कुमर जी!
कुरुचक्राऐशी शतशतक याला सम रजीं. ॥ १६

---

१. भ्रमर. २. स्वामी. ३. भीम. ४. इंद्राचा. (जेथें अक्षर दीर्घ असून छंदासाठीं ऱ्हस्व वाचलें पाहिजे तेथें त्या दीर्घ अक्षरावर ⌣ असें अर्धचंद्राकृति चिन्ह केलें आहे; जेथें अक्षर ऱ्हस्व असून वृत्तासाठीं दीर्घ वाचलें पाहिजे तेथें त्या ऱ्हस्व अक्षरावर – अशी सरळ कुंकवाच्या चिरासारखी रेषा काढली आहे.) ५. पावे. ६. कौरवांची सेना. (हत्ती ८१, रथ ८१, घोडे २४३ आणि पायदळ ४०५ इतकी सेना असली म्हणजे तिला 'वाहिनी' म्हणतात.) ७. सर्व कलांनीं युक्त असा. ८. सूर्य. ९. सहा. १०. हरण करी. ११. कळसासह. १२. अनेक. १३. अम्रांडीं. (हा समास असून कवीनें संधि केला नाहीं. अशीं उदाहरणें वामनाच्या काव्यांत पुष्कळ आढळतात.) १४. युद्धक्रिया. १५. समजे. १६. दगड, प्रस्तर. १७. शेष. १८. मळून टाकिलेला चूर. १९. रजःकणाप्रमाणें.

नृपा! जेव्हां गोधा निकर रिपुसन्मुख वळला,
नदीजादी सारे रथि दळसमूहो खवळला. ।
जशा पर्जन्याच्या अखुप जळधारा रिचवती
तशा याचे देहीं शरविसर सारे आँचवती. ॥ ५७

(सवाई.)

भारतवंश न भागत हा रणिं भागवतोत्तम भाःरवि मानी,
या करिचें शरपंजर निर्जर देखत जर्जर होत विमानीं. ।
हा रणभैरव पाहुनि कौरव विक्रमगौरव अर्पिति याला,
द्रोणगुरू परि बाणकळासुरि दावी परोपरि बा! पितियाला.' ॥ ५८

(श्लोक.)

जोडुनि करपद्मा क्ष्मापती धर्मराया
विनवि विनितिभावें कीं, 'अशा पामरा या ।
निजविशददयेचें पात्र कीजे कृपाळा!
सकळहि मम दोषा वीसरोनी भुपाळा!' ॥ ५९

नरपति मनलज्जें गाळिती अक्षपाणी,
घडिघडि पसरोनी पल्लवामोक्षपाणी, ।
वदत, 'घडुनि आला वृंद अन्याय सारा
क्षमण करिं कृपेनें सर्व तूं न्यायसारा! ॥' ६०

उचिततर नृपाची चित्तविश्रंशवाणी
श्रवणुनि, मग त्याचा धर्म वंशास वाणी; ।
'चतुरतर भला हा मत्स्यदेशास नाहो
समजुनि जनवृंदीं न्याय दे शासना हो! ॥ ६१

रिपुगणकपटाचा काळ, गोवांसराया
शरतरतमनें या पट्टणीं वास राया ।

---

१. गोधनाचा. २. समुदाय. ३. भीष्मप्रमुख. ४. सैन्यसमुदाय. ५. क्षोभ पावला. ६. ओतती. ७. सोडिती. ८. या वृत्तास 'मदिरा' असें नांव आहे. ९. थकत. १०. 'प्रल्हादनारदपराशरपुंडरीक' इत्यादि श्लोकांत 'परमभागवत' असें भीष्मार्जुनांस विशेषण लाविलें आहे. ११. कांतीचा सूर्य. १२. देव. १३. चातुर्य, कौशल्य. १४. ओढून. १५. पृथ्वीपति. १६. विनयानें. १७. अश्रु. १८. अन्यायाचा सगळा समूह. १९. स्तवी. २०. नाथ. २१. नगरी.

निशिदिनिं निज मानें सख्य केला तया हो!
विसरल तरि कोणी त्वत्कृपा अभया हो!' ॥ ६२

कुशळ कुशळप्रश्ना येरयेरा करीती,
परममधुरभावें बोलती लोकरीती, ।
नरपतिमनिं व्हावा 'नंदिनीदेहनाहो
नर, परि रव हा तो मानना अर्जुना हो! ॥ ६३

'मत्पुत्र तो केवळ मारभाचा साचा यदूनंदकुमारभाचा, ।
दे चातुरा त्या निज कन्यकेला' हा शब्द मत्स्यें बहु मान्य केला. ॥ ६४

सत्वाचा उदधी प्रचंडतरधी राजन्निधी जो सदा
धाडी पत्र सरोजपत्रनयना तो छत्रधारी तदा, ।
'श्रीमन्मंगळमंदिरा! यदुवरा! ये इंदिरावल्लभा!
गोपाळा! गरुडध्वजा! नरसख्या! भक्ताजनावल्लभा! ॥ ६५

अगा! ये गोविंदा! नरभुजगवृंदारकमणी!
धणी त्रैलोक्याचा, तुजविण पडे चित्त भ्रमणीं, ।
तरी वेगीं दावी पदकमळयुग्मास मज गा!
कृपादृग्भानूचे किरण तव सर्वा समज गा! ॥ ६६

विराटाची कन्या चतुर अभिमन्या परम ती
रती सौंदर्याची दिधलि मनबुद्धीं वर मतीं, ।
कलत्रामित्रासीं त्वरिततर यावें यदुवरा!
सुभद्राभद्रासी मिरवत आणा क्षिप्र नवरा. ॥ ६७

नरसुत सहमाता विश्वताता! आणावा,
निजसखहृदयेचा संभ्रमाला दुणावा, ।
विषमतरपथाचें दुष्ट निःसार [11]पेणें
सकळहि सरलें कीं माधवा! त्वत्कृपेनें'. ॥ ६८

असा धर्माचा तो निरखुनि नृपा [12]कैंगद गदा,
करी मोदे तेव्हां, परमतर हांसे गदगदां. ।
म्हणे, 'पांडुपुत्रा! प्रियपण मना केवळ [13]वेळी,
अहो! त्याची प्रीती भ्रमर मनपद्मीं वळवळी.' ॥ ६९

---

१. मुलीचा (उत्तरेचा) नवरा. २. अर्जुन. ३. मदनसमकांति. ४. भागिनेय. ५. कमलदळाक्षा. (कृष्णा.) ६. नायक. ७. कृपादृष्टिरूप सूर्याचे. ८. स्त्रिया. ९. अभिमन्यु. १०. त्वरा. ११. प्रवास, पर्यटन. १२. हा फारशी शब्द आहे. १३. वळवी.

मोठे शब्द न, स्तब्ध ये रिति उठे तो देव, दे हास, रे !
　　लोटे प्रेमभरें सलील[1] सकळा त्या नेत्रवृंदास रे ! ॥ ८१
यदू शोभती सत्य एक्या हरीनें, तसे भेटले सर्व एक्या हरीनें[2]; ।
विदर्भेशकन्यादि हत्पूत नारी पुढें थाट, मागें बळी पूतनारी[3]. ॥ ८२
　आगमनिगम[4] ज्यातें बोलती, 'नेति' 'नेती'[5].
　　यदुकुमर तसा तो राजधानीति नेती. ।
　सकळहि मन तोषें घेवुनी आंगनाला[6],
　　जगपति हरि आला त्या सभाआंगनाला[7]. ॥ ८३
कृष्णा[8] कृष्णमुखारविंद निरखी तेव्हां म्हणे, 'सज्जना !
　माझी सांडि स्वयंभु ! शंभुवरदा ! हे त्वद्गुणा सोज ना[9], ।
कां बा ! दुर्जन भ्रष्ट नष्ट कपटी गांजी निरन्याय रे !
　तेव्हां लोचन झांकणें तुजप्रती हा कोणता न्याय रे ? ॥ ८४
　तव चरणसरोजीं हे मिती भाळली ही,
　　तरिहि विधि कसा पां येरिती भाळ लीही ? ।
　विबुधमुखसरीचे[10] विक्रमी पंच नाहो[11]
　　करिं तरि मजसी कां काळदुर्वचना[12] हो ! ॥ ८५
　न कळत हरि कांहीं तूजवांचोनि होय,
　　वदल जन तयातें मूर्ख कीं नाम होय. ।
　निरसतर श्रमातें भोगिलें लोकपाळा !
　　तुजवरि रुसणें कां बोल माझ्या कपाळा ! ॥ ८६
मेघावांचुनि चातकास सहसा आधार पाही न रे !
　सांडी नीरदें[13] बिंदु सिंधुशयना ! ना हा तरी हीन रे ! ।
तैसा तूं यदुवंशभूषण सखा पांडुसुतांचा खरा
　ना बा ! योग्य उपेक्षणें तुज रुचे सर्वेश्वरा ! शेखरा[14] !' ॥ ८७
　सजलनयन तेव्हां दीनबंधू उदारा,
　　अमृततर[15] रवानें बोधवी प्रीयदारा[16], ।

---

१. उदक. (येथें छंदोभंग होऊं नये म्हणून 'सलिल'शब्दांत 'लि' दीर्घ आहे.) २. रांगेनें, हारीनें. ३. कृष्ण. ४. वेदशास्त्रें. ५. 'नेति नेति'='असा नव्हे, असा नव्हे' इत्यादि भगवद्वर्णन. ६. सायंकाला. ७. सभांगण. ८. द्रौपदी. ९. न साजते. १०. देवश्रेष्ठांसारिखे. ११. नवरे. १२. फसवणुक. १३. मेघ. १४. शिरोभूषणा. १५. मधुरतर. १६. प्रियपांडवांची बायको.

'सकळहि श्रम ठावा तूमचा या मनाला,
त्वरित जिव मरोनी लाभसी कामनाला. ॥ ८८
निजजन प्रियचिंताशोकसंतप्त आहे,
मनकमळिं झंळंबे ना असा कोण आहे? ।
पतिसह मज तूं तों प्राणनिःशंकसी हो
विसरल तरि माया क्षुद्रलोकां कसी हो!' ॥ ८९
धरुनि हनु सतीची तेधवां चारपाणी
करि सकळ रितीचा शोकसंचार पाणी, ।
'हर! हर! बहु क्लेशां भोगिलें सत्य माये!
श्रवणुनि मनपद्मीं दुःखकोटी न माये.' ॥ ९०
असो. यापरी शांतवीलें सतीला. हरीचे पदीं सर्वदा आस तीला. ।
रिपूभंगणीं थापटी कृष्ण मांडी महाआदरें लग्नसाहित्य मांडी. ॥ ९१
विदर्भेशजा ज्या पती पूजनारी सुभद्रा अशा पांडवांच्या सुनारी, ।
समस्तांस ही द्रौपदी क्षेम दे हो! न मातें कदा भाग्यपक्षें मदें हो! ॥ ९२
लाधली कमळजा नवसानें. तो हरी नृपति आनवसा ने, ।
ज्या पदीं हरि निमग्न विधीही तो वदे सकळ लग्नविधी ही. ॥ ९३
ज्यामुळें सकळदेवप्रतिष्ठा, तो हरी करवी देवप्रतिष्ठा ।
जो रची भव अनावर माया तो पुजी सधव त्या वरमाया. ॥ ९४
[13]पांचाळदेशाधिप ही सदारा आला सुलग्नास भला उदारा, ।
उपायनें अर्पित पांडवांसी संतोष तेथें करि तांडवासीं. ॥ ९५
वाजती बहु तुरें गजरें जी! दाटली नभिं हरीगजरें जी ।
सोडिती परम उंच हवाया. चंचळा वधुमना मोहवाया. ॥ ९६

---

१. इच्छेला. २. दुःख पावे. ३. चतुर्भुज. (कृष्ण.) ४. मावे. ५. आशा. ६. मग्न होई. ७. लक्ष्मी. ८. वधूच्या गांवीं वराचा वास. ९. देवांचा मान. १०. देवांची स्थापना. (हा एक संस्कार आहे.) ११. नवऱ्यासह. १२. वराची माता. १३. द्रुपदराजा. पांचाळ हें नांव पडण्याचें कारण असें कीं, या देशाचा राजा भर्म्याश्व (भद्राश्व) याला मुद्गल, यवीनर, बृहदिषु, कांपिल्य आणि संजय, असे पांच पुत्र असून ते माझें राज्य रक्षण करण्यास समर्थ (पंच अलं) असें तो म्हणे. यावरून त्या मुलांना पंचाल आणि त्यांच्या देशाला व वंशाला पांचाल असें नांव पडलें. (महाभारत, वनपर्व, अ० २१.) १४. भार्यासह. १५. नजराणे. १६. नळे इत्यादि दारूकाम. १७. येथें छंदोभंग झाला आहे.

ज्या वराप्रति पितामह तावा त्यापुढें जळविती महताबा ।
दाखवी वर हयांगमदाला श्रीहरी धरि तुरंगमदाला. ॥ ९७

'नररथ मज आहे या करें वागवावा
क्षितितळमळगोवा पाहिजे उगवावा, ।
क्षणभरि धरूं दोरा मागिनाच्या हयाचा
प्रियकुमर म्हणोनी फारसा चाह याचा.' ॥ ९८

एवं असा तो नवरा सभाला ने दंडिता दानवरासभाला, ।
केला मधुपर्क यथाविधीनें त्या मत्स्यदेशेंद्रगुणावधीनें. ॥ ९९

मंडपांत नवरीजनकाचें बैसणें हरि जगज्जनकाचें ।
ना असें करि असी तपनातें लाजवी उडुप शीतपनातें. ॥ १००

महामंत्रोच्चारें द्विज वधुवरांतें सुतविती.
सुदेष्णाकृष्णादी वधुवरसुभद्रा सुतविती, ।
पुजी कृष्णाच्याही प्रथित ललना ज्या शशिकळा
नखी दंतीं राजे हसितवदना नित्य सकळा. ॥ १०१

रतीनें ही जीची रति रुपसरी ना करवली,
तसी सौभद्राचे जवळ उभि राहे करवली. ।
विधी शंभू ज्याचे नमिति पदपद्मा वरें हरी
वरापृष्ठीं ऊभा यदुकुळसदानंदलहरी. ॥ १०२

जगांत तळपती ते वैरिसंहार राजे, यदुसमिप तशांची मंडपीं हार राजे. ।
वधुजनक समर्पी फारशा आदरासीं नृपवर भरतादी रामदामोदरासीं. १०३

लाजाहोम करोनियां, वधुवरीं गौरीहरापूजना
केलें, त्यावरि पांडवीं सहसखें भूवल्लभां भोजना. ।
नारीही तद्वशाच्च सर्व कुशळा चंद्रानना जेविती
कृष्णाची भगिनीच खंजनयनी नाये वरा जेवि ती. ॥ १०४

---

१. चंद्रज्योति, फुलबाज्या. २. घोड्याच्या मस्तीला. ३. लगाम. ४. भागिनेयाच्या. (भाचाच्या.) ५. विवाहसमयीं वर वधूच्या द्वारीं आला असतां पादप्रक्षालनादि करून मध तूप आणि दहीं हीं मिश्रित करून त्यास समर्पून गंध वस्त्र इत्यादिकांनीं याची पूजा करणें. या विधीला 'मधुपर्क' म्हणतात. ६. सूर्य. ७. चंद्र. ८. थंडपणातें. ९. सुतानें वेष्टितात. १०. पुत्रवती. ११. चंद्रकला. १२. अल्प. १३. सौंदर्याची बरोबरी. १४. सुभद्रापुत्र. (अभिमन्यु.) १५. चरणकमळा. १६. श्रेष्ठ. १७. यादववंशास जो आनंदाच्या लाटांसारिखा. १८. चमकती, शोभती. १९. पंक्ति, रांग. २०. शोभे. २१. वधूवरांचा परस्पर वियोग न व्हावा म्हणून विवाहांत लाह्यांचें हवन करण्याचा विधि.

सुनमुखा विहिणी बरजाती[1] त्यासवें कुरुयदूवर जाती. ।
सोसल्या बहु अपायघड्या[2] हो! लाभल्या म्हणुनि पायघड्या हो! ॥ १०५
सूटती बहु नळे फुलबाज्या, वाजका अतिमनोभुलबाज्या[3]; ।
साम्य त्या त्रिभुवनीं हरिखासा[4] ना जयांत फिरतो हरि खासा. ॥ १०६
ठाव जो भवविवी उगमाला, सांपडे न आगमनिगमाला[5][6], ।
तो हरी बहिणकौतुक[7] पाहे; पांडवीं निवळ सत्यकृपा हे. ॥ १०७
जाहला परमसिंधुंत मासा[8], दाविला सुरवरांत[9] तमासा, ।
तो हरी बहिणकौतुक पाहे; पांडवीं निवळ सत्यकृपा हे. ॥ १०८
सागरीं निबर कांसव[10] जाला, तेधवां सुसुर[11] वासव जाला, ।
तो हरी बहिणकौतुक पाहे; पांडवीं निवळ सत्यकृपा हे. ॥ १०९
होउनी वन प्रचंड वराहो[12], मारिले कठिण दैत्येंवरा[13] हो! ।
तो हरी बहिणकौतुक पाहे: पांडवीं निवळ सत्यकृपा हे. ॥ ११०
घे महामृगतनू[14] नरसा   ेला शरणनिष्ठुर सावा, ।
तो हरी बहिणकौतु.. पाहे; पांडवीं निवळ सत्यकृपा हे. ॥ १११
ने तळास बळि[15] वामनदेहो, दैत्य तो परि पदीं मन दे हो! ।
तो हरी बहिणकौतुक पाहे; पांडवीं निवळ सत्यकृपा हे. ॥ ११२
राम[16] जो परशुचाप करीं हो! क्षत्रियां निपटें[17] दापकरी[18] हो! ।
तो हरी बहिणकौतुक पाहे; पांडवीं निवळ सत्यकृपा हे. ॥ ११३
होय राघव[19] क्षिती उजराया[20], राक्षसांतक महासज राया! ।
तो हरी बहिणकौतुक पाहे; पांडवीं निवळ सत्यकृपा हे. ॥ ११४
रामकृष्ण अवतार करीती, दाविती स्वजनतारक रीती, ।
ते कथा श्रवण भागवतीं रे! घे तुझ्या जनकभागवतीं रे! ॥ ११५

एवं तो नृपती समस्त युवती मेळा वधूमंडपा
आला, दीनदयाळही यदुपती जो भद्र आखंड पां. ।

---

१. श्रेष्ठकुलोत्पन्ना. २. दुर्दैवाचे फेरे, अनेक संकटें. ३. अतिमनोहर. ('अतिमनोभुल' असे सामासिक शब्द वामनपंडिताच्या कवितेंत पुष्कळ आढळतात.) ४. हर्षाला. ५. शास्त्र. ६. वेद. ७. हा समास लक्ष्य पुरविण्यासारखा आहे. ८. मत्स्यावतार. ९. श्रेष्ठदेवांत. १०. कूर्मावतार. ११. 'सुसरवास अजाला' असा कदाचित् पाठ असावा. १२. वराहावतार. १३. हिरण्याक्ष दैत्याला. १४. नरसिंहावतार. १५. विष्णूनें वामनावतार घेऊन पाताळीं लोटलेला दैत्यांचा राजा. १६. परशुरामावतार. १७. केवळ. १८. धमकावी दाबून टाकी. १९. रामावतार. २०. उत्कृष्ट कराया, शुद्ध कराया.

पार्थाचा सुत वल्लभा निजकरीं घेऊनी कृष्णापदीं
साष्टांगें प्रणिपात, त्यावरि नृपा! ये जे स्थळीं द्रौपदी. ॥ ११६
उतरती रती जीपुढें रती नोवरी तसी चतुरभारती. ।
पाहुनी तिची अंगभा वरा जाहला मनीं हेत बावरा. ॥ ११७
असी सौंदर्याची सकळ खरि ती शंभुललना,
तसी हे पाहुनी नरकुमर तो कां भुलल ना? ।
सती कृष्णा भद्रा निरखुनि सुभद्रा नवरि ती
महानंदे देती जडित नवरती नवरितीं. ॥ ११८
मत्स्य नीरवी श्रीहरीस ते नोवरी, रिपू श्री हरीस ते, ।
यावरी कृपा श्रीहरी करी सकळही रमा श्रीहरीकरीं. ॥ ११९
एवं लग्नविधी विधीजनक तो सिद्धीस ने सांग रे!
जातां द्वारवतीस धर्म वदला, 'आतां पुढें सांग रे!
कीं जे कोण उपाय मायजनका! दाय[illegible]गावया,
माझें राज्य अकंटक प्रभुवरा! निःशेषें झपांवया.' ॥ १२०
हरि म्हणे, 'अगा धर्मपावना! काय बा! तुझा धर्म पाव ना? ।
तुज बंधुही शक्रजोड रे! भंगुनी रिपू भाग जोड रे! ॥ १२१
भेटतों तुम्हां फिरुनि मागुती, रामआदि हे परतमा गती, ।
दे निरोप हा सत्वमंदिरा! भाळली तुला सत्य इंदिरा.' ॥ १२२
कथाकंजीं मोदें मनभ्रमर ज्यांचा न खर ते,
न निर्धारें लोकीं नरतनुंत अज्ञान खर ते. ।
हरीनें या ग्रंथीं बहु सरस केला कळस रे!
जयाचा सत्पाठें, खडतर कळीची कळ सरे. ॥ १२३
काळ हा सुधा लोटला भला, सत्कथासुधालोट लाभला. ।
बा परिक्षितीनंदना सया यावरी भवाब्धीस नास या. ॥ १२४

---

१. अल्प. २. चतुर आहे भारती (वाणी) जिची अशी. ३. शरीरकांति. ४. पार्वती. ५. कृष्ण. ६. अंगोसहित म्हणून परिपूर्ण. ७. शत्रु. (दायाद म्ह० पूर्वार्जितधनभाग घेणारे.) ८. वठणीस आणावया. ९. सकल. १०. सांभाळण्यासाठीं. ११. इंद्राच्या तोडीचे. १२. भाग्य. १३. अत्यंत श्रेष्ठ. १४. धैर्यसदना. १५. लक्ष्मी. १६. कमळीं. १७. गाढव. १८. संपे. १९. निर्विघ्न. २०. मित्रा. २१. संसारसागरास.

जालें पर्व विराट, राटमणि! रे! उद्योग आतां पुढें,
ऐकाया मन सावधान करिजे ! जे खोल अर्थी गुढें. ।
पाहोनी तव भक्तचातकमनो इंदूकथाबिंदु रे !
सोडी, तूं जगतीश्वरा! कुरुवरा! सौजन्यसत्सिंधु! रे! ॥ १२५
गजवदन हरीचा दास मी आळसीसा
सुकृततर जनीं हा आणिला आळसीसा. ।
अवचट शिवला कीं हात साधू जनांचा
म्हणउनि मज वेढी लोभ नीरंजनाचा. ॥ १२६
क्षणभरि गुरुपायीं हे नये माळ लाहो
तरि मज हरि कैसा नेणवे भाळला हो? ।
परम निगम बोले ज्ञानराजा हल्या हो
नवल मज मुखें ही ग्रंथ हा जाहल्या हो ॥ १२७
प्रपंची मी खासा परि मन उगेंची रैवरवी,
मुखाब्जीं निर्व्याजें हरियमकरूपें रैवरवीं, ।
स्वयें थोरांनीं या प्रथिततर हा ग्रंथ कथला
तराया लोकांतें चतुरतर तो सत्य कथला. ॥ १२८
श्रवणमननमात्रें बोध व्हावा मनासीं
अवचट पठणेंही सत्य दुष्काम न .ी. ।
क्षणभरि जरि कोणी ग्रंथमर्याद व. . .
निरेसल भवमाया सत्य जे यादवाची. ॥ १२९
खड्ग जो फिरवी मांतुळशीर्सी, प्रीति ज्या बहु रमातुळसीशीं, ।
तो हरी वदवि या कवनासी, जो [11]देही [12]स्वजनशोकवनासीं. ॥ १३०
ग्रंथ हा प्रियहरीतमकानें बोलिला स्वजन उत्तमकानें. ।

---

१. याच्या पुढचें 'उद्योगपर्व.' यावरून वामनपंडितानें भारताचीं पुढचीं हीं पर्वें रचिलीं असावीं, परंतु तीं उपलब्ध असल्याचें ऐकिवांत नाहीं. २. सर्वसंगपरित्याग केलेल्या विरक्त पुरुषाच्या, निरुपाधिक परमेश्वराचा. ३. वेद. ४. रेडा. ज्ञानेश्वरानें आज्ञा करतांच ज्ञाना नांवाच्या रेड्यानें वेद म्हणण्यास आरंभ केला, या गोष्टीकडे एथें लक्ष्य आहे. (हल्या म्हणजे हल (नांगर) ओढणारा. रेड्यास हल्या म्हणतात, यावरून रेड्यास नांगरास लावण्याची चाल फार प्राचीन असावी असें दिसतें.) ५. उद्विग्न होतें. ६. प्रत्येक शब्दांत. ७. 'विश्रातें' असाही पाठ आहे. ८. अवचित, अकस्मात्. ९. निरसन होईल, नष्ट होईल. १०. मामाच्या मस्तकीं. (कंसाच्या डोक्यावर.) ११. जाळी. १२. आपजनाच्या शोकरूप वनाला.

ऐकिल्या रैंवरवा यमकानें त्या नरा रैंवरवा यम कां ने ? ॥ १३१

भारतध्वनि मुखा लव लाहो दीधल्या सवचि खाल्वला हो! ।
सत्कथा भवअसाधकवाडे बाचणें उघडि बोधकवाडें. ॥ १३२

जयजय मंगळसद्म पद्मनयना! हे नारसिंहा! हरी!
जयजय माधव! यादवा! गिरिधरा! या दुर्भवा संहरी. ।
जयजय राम सदाशिवप्रभुवरा! हे वासुदेवा! मना
लावी सज्जनसंगती रघुपती ने सत्पथा वामना. ॥ १३३

जो कथी निशिदिवा मनदेहो, तोच कीं मनुज वामन देहो. ।
आइके क्षण जिवा मनसा जी धन्य तो चि नर वामन साजी. ॥ १३४

स्थालीपाक.

(श्लोक).

पांडूचे सुत द्रौपदीसहित ते होते जया काननीं,
तेथें शिष्य दहा सहस्र सम तो दुर्वास आला मुनी. ।
क्रोधें तो स्फुट बोलिला निज मुखें, 'दे अन्न' ऐसें तिला.
नेलें सत्व असें चि जाणुनि मनीं तीनें हरी चिंतिला. ॥ १

'ये ये येइं रमापती! यदुपती! गोपीपती! गोपती!
हे दामोदर दैत्यभंजन! दया प्रार्थोनि घे सत्पती. ।
ये भक्तांबुजपद्मिनीनिशिपती! विद्वत्पती! वाक्पती!
दुग्धाब्धींत हि विव्हळा सुरपती! काढीं मला श्रीपती! ॥ २

ये ये ये करुणाकरा! सुखकरा! ये ये कृपासागरा!
ये ये मन्मथसुंदरा! धरधरा! विश्वंभरा! भूधरा! ।
ये गोपीजनसागरा! गुणवरा! ये सर्व अभ्यंतरा
ये माझ्या निजमंदिरा सुखकरा पाळीं मला श्रीधरा! ॥ ३

हे द्वारकावासि सरोजनेत्रा! कोठें अहेसी वद ? नंदपुत्रा! ।
ऐशी अवस्था मज प्राप्त झाली तूं आसतां नाथ अनाथ झाली.' ॥ ४

---

१. शब्दा शब्दास, २. यमकरूप रचनेनें, ३. नरका. ४. हें प्रकरण महाभारताच्या वनपर्वांत आहे. सूर्यानें दिलेल्या स्थालींत अन्न शिजवून पांडव उपजीविका करीत म्हणून या प्रकरणास 'स्थालीपाक' असें म्हटलें आहे. हें विराटपर्वापूर्वी आलें पाहिजे होतें. ५. वन. ६. दुर्योधनाच्या प्रेरणेनें पांडवांस छळण्यासाठीं आला. ७. चंद्र. ८. कामासारखा रूपवान्. ९. कमलनयना.

तेव्हां सुभाव धनु ओढुनियां करानें तो विंधिला श्रवणि हो करुणाशरानें ।
भेदूनि तें स्थळ उरावरि जो निजेला झाली बहू गमनिं तांतडि त्या अजाला. ५

गेलद्वसन[1] सांवरी पडत हो हरी आंवरी
पडे चि धरणीवरी त्यजुनि खेचरी केसरी ।
कृपांबु नयनांतरीं तिलक तो हि निद्रा हरी
दयांबुधि तया परी त्वरित पावला श्रीहरी. ॥ ६

'कृष्णे[2]! आजि मला क्षुधा घडवडी दे अन्न कांहीं तरी.'
बोले द्रौपदि, 'नाहीं.' कृष्ण वदला, 'पाहें स्थपात्रांतरीं[3].' ।
देणें निर्मित एक पत्र हरिच्या हस्तांबुजीं[4] अर्पिलें.
तेणें तृप्त समस्त विश्व अवघें होऊनियां राहिलें. ॥[5] ७

भीष्मयुद्ध[6].

(श्लोक.)

लक्ष्मीनृसिंहचरणद्वयसारसाचा[7] जो रेणु[8] मान्य वदती बहुसार[9] साचा, ।
प्रत्यूहमत्तगजसिंह[10] तया नमीतों, जाणें तयाहुनि कदापि न आन[11] मी तों. ॥ १

श्रोत्रयुग्म[12] परिपूत[13] कराया[14] सावधान जनमेजयराया! ।
जो परेशरत[15] धन्य अहो! तो, गोष्पदोपम[16] तया भव[17] होतो. ॥ २

'प्रतिज्ञा जे केली यदुकुळवरें[18] 'युद्ध न करीं,
धरीना शस्त्रांतें कंदनसमयीं[19] मीं निजकरीं.' ।

---

१. गळणारें वस्त्र. २. द्रुपदतनये. ३. स्थालीमध्यें. ४. करकमळीं. ५. या प्रकरणाच्या शेवटीं वामनाचें नांव नाहीं, म्हणून हें अपूर्ण असावें असें दिसतें. ६. हें प्रकरण भीष्मपर्वांतील आहे. यांत वीर आणि वात्सल्य यांचें वर्णन चांगलें साधलें आहे. ७. लक्ष्मी आणि नृसिंह म्ह० विष्णु आणि तत्पत्नी यांच्या पादयुग्मकमलाचा; (पक्षीं) वामनाच्या. बापाचें नांव नृसिंह (नरहरिपंडित) आणि आईचें नांव लक्ष्मीबाई. ८. धुळी. ९. पुष्कळ, श्रेष्ठ. १०. विघ्नरूप मातलेल्या हत्तीला जो सिंह. ११. अन्य, दुसरा. १२. दोन कान. श्रोत्र म्ह० श्रवणाचें साधन. 'त्र' प्रत्यय धातूला लागून क्रियेचें साधन किंवा हत्यार या अर्थी नपुंसकलिंगी नामें होतात. उदाहरणें:—नेत्र (नेण्याचें साधन—डोळा), शस्त्र (तोडण्याचें साधन), स्तोत्र (स्तुति करण्याचें साधन), तोत्र (इजा देण्याचें साधन—चाबूक). १३. पवित्र, पावन. १४. करण्यासाठीं. १५. परमेश्वराच्या ठायीं निमग्न. 'जो रमेश' असाही पाठ आहे. १६. गाईच्या पावलासारखा (तरून जाण्यास सुगम). गो + पद या दोन शब्दांचा समास होऊन 'गोष्पद' असा शब्द झाला आहे. १७. संसार. १८. यादव वंशांतील श्रेष्ठानें. (कृष्णानें.) १९. रणसमयीं, युद्धांत.

घडेना हें [1]मिथ्या जरि, तरि न मी [2]भागवत रे !'
प्रतिज्ञेतें भीष्में मनिं [3]अवधिलें या [4]दृढतरें. ॥ ३

[5]पिता शांतनू, माय ज्याची [6]नदी जे, [7]स्वयें शुद्ध ऐशास सन्मान दीजे. ।
असा गर्व तोही हरावा मनाचा मनाचा असा भाव त्या [8]वामनाचा. ॥ ४

[9]नृपा ! ऐकिजे युद्ध [10]देवव्रताचें; गमे हेंचि साफल्य तूझ्या व्रताचें. ।
रथीं देखिले कृष्ण [11]कौंतेय दोघे, म्हणे भीष्म, 'माझ्या शरातें [12]यदो ! घे.'
भीष्माकडे [13]रवें [14]भयानक [15]दुंदुभीचा होतां वदे [16]तनय [17]आनकदुंदुभीचा. ।
'दुश्चिन्ह आजि गमतें मज [18]सव्यसाची ! जाती [19]शिवा [20]अशिव हे [21]अपसव्य [22]साची.'
गर्वोक्ति [23]फाल्गुन वदे, '[24]जगदेकराया ! आहे असा कवण तो झगडा कराया ? ।
यां [25]कालखंज वधिले [26]अतुलप्रतापी [27]पौलोमही असुर [28]गोसुरविप्रतापी.' ॥ ७

[29]पितामह वदे तया, '[30]प्रबळ तूं पृथानंदना !
[31]रमेश रथि सारथी चतुर वागवी [32]स्यंदना. ।
स्वयें [33]गतवयस्क मी, [34]सरस वीर तूं रे ! [35]नवा,
[36]भिडें रणधुरंधरा ! जय घडो सुखें [37]वा न वा.' ॥ ८

---

१. असत्य. २. कृष्णभक्त. भीष्म हा परमभागवतांपैकीं एक होय. ३. योजिलें. ४. निश्चयात्मक. ५. पित्यावरून भीष्मास 'शांतनव' असेंही म्हणतात. शांतनूला गंगेपासून सात मुलगे झाले, ते तिनें पाण्यांत बुडविले. भीष्म हा आठवा पुत्र. याला तिनें सकलविद्यापारंगत करून नवऱ्याच्या स्वाधीन केलें. ६. गंगा. ७. 'स्वयें युद्धि ऐशास सन्मान दिजे' असाही पाठ आहे. ८. कृष्णाचा. ९. जनमेजया. १०. भीष्माचें. (भीष्माची परमेश्वराच्या ठायीं अत्यंत निष्ठा होती म्हणून त्यास हें नांव पडलें.) ११. अर्जुन. १२. हे कृष्णा. १३. ध्वनि. १४. भयंकर. १५. नगाऱ्याचा. १६. मुलगा. (कृष्ण.) १७. वसुदेवाचा. (याच्या जन्मकालीं देवांनीं आनक दुंदुभि म्ह० नगारे वाजविले म्हणून हें नांव.) १८. अर्जुन. (डाव्या हातानें बाणसंधान करण्यांत कुशल. अर्जुनाशिवाय दुसऱ्याला डाव्या हातानें बाण मारतां येत नव्हते). १९. कोल्हे. २०. अमंगल. २१. उजव्या बाजूनें. २२. खरोखर. २३. अर्जुन. २४. जगाचा एक मालक ओ. (कृष्ण.) २५. या असुरांस 'कालकेय' असें नांव आहे. हे मारीच नामक असुराची स्त्री कालका तिचे पुत्र. यांनीं इंद्रास भारी उपद्रव दिला, परंतु त्यांच्यापुढें इंद्राचें कांहीं चालेना. नंतर अर्जुन स्वर्गास गेला होता, तेव्हां त्यानें इंद्राच्या आज्ञेवरून त्यांचा नाश केला. २६. ज्यांच्या प्रतापाला (पराक्रमाला) तुलना नाहीं असे. २७. हे मारीच नामक असुराची दुसरी स्त्री पुलोमा (वैश्वानरदानवकन्या) तिचे पुत्र. हे पौलोम हिरण्यपुरांत राहत असत, त्यांस अर्जुनानें मारिलें. २८. गाई, देव, ब्राह्मण यांस ताप देणारे. २९. आजा. (भीष्म.) ३०. पराक्रमी. ३१. रमेचा स्वामी. (कृष्ण.) ३२. रथाला. ३३. वयोवृद्ध. ३४. अधिक पराक्रमी. ३५. तरुण, नववयस्क. ३६. युद्ध कर. ३७. घडो अथवा न घडो.

[1]पारीक्षिता! मग [2]शरासन पांडवानें ओढूनियां [3]हुतवहार्पितखांडवानें ।
तो भीष्मदेह [4]खचिला [5]शरतांडवानें ज्याच्या क्रियें सकळ [6]पद्मभवांड [7]वानें. ॥ ९
[8]गांगेय [9]कोपा चढला कसा रे? ज्या मानिती हाचि [10]कृतांत सारे. ।
गर्जोनियां सिंहरवें [11]जयातें पाहे जणो मारिल आजि यातें. ॥ १०
'त्वां काय [12]कर्म करिजे लघुलेंकरानें?' बोलूनियां मग धनू धरिलें करानें. ।
तें व्यापिलें सकळ सैन्य [13]महाशरानीं भीष्में[14], जसा [15]पतित होय [16]हुताश रानीं. ॥
तो [17]स्तोम येतां बहु [18]सायकांचा झालाचि [19]पार्थव्यवसाय [20]काचा. ।
[21]कोचावला वीर पुढें [22]धसेना झाली नृपा! सर्व भयांध सेना. ॥ १२
[23]पुष्पवर्ण [24]नटला [25]पळसाचा, पार्थ सावध नसे [26]पळ साचा. ।
पाहिलें जंव [27]निदान तयाचें तों दिसे [28]वदन [29]आनत [30]याचें. ॥ १३
[31]प्रतोद मग ठेविला उतरला [32]रथाधःस्थळीं
म्हणे, 'प्रबळ भीष्म हा, जय घडे न या दुर्बळीं.' ।
करीं [33]कमळनेत्र तो [34]प्रथित चक्र तें स्वीकरी
[35]प्रमोद [36]य[illegible]ना बहु तसा यशस्वी करी. ॥ १४
असा येतां देखे [illegible]निकट तो [37]श्यामल हरी
नृपा! गांगेयाच्या हृदयिं भरल्या [38]प्रेमलहरी. ।
शरातें चापातें त्यजुनि वदला [39]गद्गदरवें,
'[40]जगन्नाथें केलें मज सकळलोकांत [41]बरवें. ॥ १५

---

१. हे परीक्षित् राजाचा मुला, जनमेजया. २. धनुष्य. ३. अग्नीला समर्पिलें आहे खांडववन ज्याणें (अर्जुन इंद्रप्रस्थास आल्यावर त्याच्याकडे अग्नि ब्राह्मणाचे वेशानें खांडववन भक्षणार्थ मागण्यासाठीं आला, अर्जुनानें तें त्यास देऊन संतुष्ट केलें, अशी कथा आहे.) ४. भरून टाकिला. ५. शरांच्या जाळानें. ६. कमलोत्पन्न ब्रह्मांड. ७. वाखाणी. ८. गंगासुत. ९. 'तापा' असा अन्य पाठ. १०. काळ किंवा यम. ११. अर्जुनातें. १२. युद्ध, लढाई. १३. 'महाशरानें' असाही पाठ आहे. १४. 'भीष्मीं कसें पतित होत हुताश रानें' असाही पाठ आहे. १५. पसरत जातो. १६. अग्नि. १७. समूह. १८. बाणांचा. १९. अर्जुनाचा हस्तव्यापार. २०. कच्चा, व्यर्थ. २१. कचरला, भिऊन गेला. २२. धैर्य धरीना. २३. पुष्पांचा रंग. २४. बनला. २५. पळसाच्या झाडाप्रमाणें. २६. क्षणभर. २७. कारण. २८. 'मुखहि म्लान तयाचें' असाही पाठ आहे. २९. उतरलेलें. ३०. अर्जुनाचें. ३१. चाबूक. ३२. रथाखालीं. ३३. कृष्ण. ३४. प्रख्यात. ३५. आनंद. ३६. धर्मराजाला, 'कुरुनंदना' असाही पाठ आहे. ३७. सांवळा. (संस्कृत शब्दांत 'म' बाच्या जागीं 'व' आदेश होतो आणि मागचा स्वर अनुनासिक होतो. जसें; कोमल, कोंवळा; नाम, नांव; इत्यादि.) ३८. प्रेमाच्या लाटा. ३९. गहिंवराच्या शब्दानें. ४०. श्रीकृष्ण. ४१. कल्याण.

ये रथावरि त्वरें यदुराया! खड्ग देइन विकोश[1] कराया. ।
तोडिं मस्तक पडो चरणीं या, धन्य होइन सदाचरणीं[2] या. ॥ १६
श्री माधवावांचुनि आन[3] देवा भजें तरी हो! मज आण[4] देवा! ।
तुझीच कीं वाहतसें हरी रे! मिथ्या तरी हे झडो वैखरी रे.! ॥ १७
मारावें मजला असेंच असलें चित्तीं तुझ्या केशवा!
तैं मातें मग कोण रक्षिल पहा विरिंचेश नाकेश[7][8] वा? ।'
हा मुख्यार्थ[9] जनार्दना! मज गमे, भक्तप्रतिज्ञा खरी
कीजे, सर्वजनांत होइल मृषा[10] हे आपुली वैखरी'. ॥ १८
हें भीष्मवाक्य परिसोनि जगन्निवासें, केलें विलोकन मृदुस्मित पीतवासें[11]. ।
वेगें फिरोनि चढला मग तो रथातें पार्थाचिया पुरविणार मनोरथातें. ॥ १९
ज्याचें कैलत्र[12] सकला श्रुति सौरसाक्षी[13] जो जाणता सकळ संश्रुतिसार साक्षी, ।
त्या भीष्मभाव सकळा वसुदेवजाला आदित्य रुद्र नमिती वसुदेव[14] ज्याला. ॥
तौताभिधा[15] नृहरिपंडित, माय लक्ष्मी दे सर्वदा सुगुणयुक्त उदार लक्ष्मी. ।
शांडिल्य गोत्र, कुळदेव[16] नृसिंह ज्याचा, दासानुदास निज वामन हो निजाचा.

[17]भीष्मशरपंजर[18].

(श्लोक).

वंदूनियां पद शिरीं प्रभु केशवांचे वर्णीन भीष्मशरपंजर लेश[19] वाचे. ।
ज्या कारणें त्यजुनि कृष्ण निज प्रतिज्ञा[20] घे चक्र, दे यशचि या निजभक्तप्रज्ञा[21]. १
धरुनियां धनु वासर[22] तो दहा भरितसे स्वयशेंचि दिशा दहा ।
धरि पुन्हा मरणीं निज कामना[23] करि सुखप्रद तो यमनंदना[24]. ॥ २

१. कोशरहित, नागवें. (कोश=म्यान.) २. या उत्तम कृतीनें. ३. अन्य, दुसऱ्या. ४. शपथ. ५. येथें छंदोभंग झाला आहे. अशीं उदाहरणें वामनाच्या कवितेंत पुष्कळ ठिकाणीं आढळतात. ६. वाणी. ७. शंकर. ८. इंद्र. ९. मुख्य उद्देश. १०. खोटी. ११. पिंवळें आहे वसन ज्याचें त्यानें. (कृष्णानें.) १२. स्त्री. १३. कमलपत्राक्षी. १४. हे वसुसंज्ञक देव आठ आहेत:-- धर, ध्रुव, सोम, अन्ह, अनिल, अनल, प्रत्यूष आणि प्रभास. (महाभारत, आदिपर्व, अ० ६६.) १५. बापाचें नांव. १६. कुळदैवत. १७. हें प्रकरण भीष्मपर्वाच्या १२० व्या अध्यायांत आहे. १८. शरीराभोंवतीं अनेक बाण टोंचले असतां पंजराच्या (पिंजऱ्याच्या) आकारासारखें जें आवरण होतें तें. १९. अल्प. २०. हातीं शस्त्र घेणार नाहीं ही प्रतिज्ञा. २१. सुज्ञ भक्ताला. २२. दिवस. (एकंदर अठरा दिवस कौरवपांडवांचें युद्ध झालें. त्यांपैकीं दहा दिवसपर्यंत भीष्माचार्य सेनापति होते.) २३. इच्छा. २४. धर्मराजाला.

रथाखालीं गंगातनय शरतल्पावरि पडे,
हहाकारें दुर्योधन सकळ सेना चरफडे; ।
रणीं एकाभेकां म्हणति नृप, 'पाहूं सुख चला,
नव्हे हा हो भीष्म; क्षितिवरि रवी आज खचला.' ॥ ३

सभोंते पांडूचे तनय धृतराष्ट्रात्मज महा
पहाती भीष्मातें तव जपत विश्वात्मज पहा, ।
जशी काया बाणावरि सहितबाहू पसरली
झुजाया वीरांची मग सकळ बा! हूंप सरली. ॥ ४

गुरू ज्या भीष्माशीं कदन करितां बा! परतला,
व्रतीं जो कां राहे, कृतयुवतिशीं बाप रतला; ।
शिखंडीचे बाण प्रसरति कसे यासि मरणीं?
नसे हो त्रैलोक्यीं सुर असुर ही यासम रणीं. ॥ ५

खालीं नंदीज पडतांचि जसा रथाच्या आनंद हो विजयिं त्या, मग सारथ्याच्या ।
चित्तीं न होतचि दिसे झगडावयाचा द्रोणादिकांसि गतकोप वडात्रयाचा.॥ ६

सहस्र दश मारणें नियम सैन्यभागीं रथी
दिसांत म्हणवूनियां जननि ज्यासि भागीरथी; ।
जराभर टिकेचिना, तरुणसा रणीं वावरे
कसे शर शिखंडिचे तनुस भेदले बा! बरे? ॥ ७

शिखंडी शरें काय मारील यातें? कसा भीष्म हा देह सांडी त्यातें? ।
पुढें अर्जुना! यासि मारूं नको रे! शरा हाणितां जो म्हणे, 'ना नको रे.'॥८

शरांची श्रीशय्या करुनि वरि गंगोद्भव निजे
कदापि स्पर्शेना क्षितिवर वरांगा अवनि जे ।
मधें लोंबूं लागे, फळ पवनयोगें तरुतळीं,
विनाकाशीं जेंवी विलसत रवीबिंब चि तळीं. ॥ ९

---

१. शरांच्या शय्येवर. २. हुरूप, औत्सुक्य. ३. जामदग्न्य. (यानें गंगेच्या भीडेस्तव भीष्मास धनुर्विद्या शिकविली. पुढें २३ व्या श्लोकावरील टीप पहा.) ४. ब्रह्मचर्यव्रती. ५. शंतनु. (भीष्मानें सत्यवतीला धीवराजवळ मागून घेऊन शंतनुला दिली, आणि तिच्या पुत्रास, आपण न बसतां, राज्यावर बसवीन व आजन्म ब्रह्मचर्यानेंही राहीन असें कबूल केलें, अशी कथा आहे.) ६. द्रुपदपुत्र. ७. गांगेय. ८. जो एकट्याच धनुर्धराशीं लढतो तो रथी. ९. भगीरथ नामक इक्ष्वाकुकुलोत्पन्न राजानें आपल्या पूर्वजांचा उद्धारार्थ दीर्घकाल अतिकठिण तप करून गंगेस पृथ्वीवर आणिलें, त्यावरून तिला भागीरथी हें नांव पडलें. १०. मस्तका. ११. पृथ्वी.

कां शरीर न शिवे धरणीतें? पावलें पतन शुद्ध रणीं तें? ।
बोलती क्षितिस या पैरदारा, हा भिडे बहु परात्परदारा. ॥ १०

गांगेय तेधुनि कसे उघडूनि डोळे दुर्योधनासि अवलोकुनि काय बोले? ।
'देशी उशी, तरिच मस्तक हें न हाले, राया! शरीर अतिभारमिसें चि लोळे.'
नृपें आणिली दिव्य उद्दाम उशी, शिरा खालतीं देत वृद्धा मऊशी; ।
म्हणे, 'ये स्थळीं हे उशी काय देशी? पहा हो! पडे कोणत्या काय देशीं?' १२

बोले नदीज अवलोकुनि पांडवातें, जेणें हुताशन दिल्हा वनखांडवातें, ।
'पाहोनि सेजे समयोचित दे उशीला कैवल्यधामपदपावनदेवशीला!' ॥ १३

पडे भीष्मवाणी च कौंतेयकानीं, उशी सिद्ध केली च ते सायकांनीं; ।
शिराच्या तळीं लाविता, ते उभारे रवीबिंब हें आननीं तेज भारे. ॥ १४

म्हणे भीष्म, 'दुर्योधना! पाजि पाणी; पुरे राहिले आमुचे आजि पाणी.' ।
असें ऐकतां ऊठिला लागवेगें, जळा आणितां तो जळाला चि वेगें. ॥ १५

बोलिला नृप तया, 'जळ प्यावें, त्वां पुन्हा मजवरी जळपावें.' ।
'जाळिलें मम शरीर शरांनीं कीं हुताश करि दिग्वश रानीं. ॥ १६

'पृथेच्या पुत्रा! तूं अमल जळ तें पाज मजला.' ।
नदीजाची ऐसी हृदयगत बोली समजला. ।
प्रकर्षें गांडीव प्रबळ धनु वोढी निजबळें,
शरा तैसें योजी, तंव सकळ सेना खळबळे. ॥ १७

शराच्या संधानें रणगत जनाला भय पडे.
न जाणों हो! याची न जरि कवणाचा वध घडे; ।
अशी बोली होतां, तंव शर सुटे चापमुखिचा,
विदारी भूमीतें, गुण नवदेवात्युष्ण शिखिचा. ॥ १८

तळीं लागे जों जों उरगशिर तों तों वरि शिरे.
फणी बोले त्यातें, 'कवण कवणा तूं वधिशि रे!' ।

---

१. दुसऱ्याची स्त्री. २. शरीर. ३. अग्नि. अर्जुनानें खांडववन अग्नीला भक्षणार्थ दिलें या कथेस अनुलक्षून हें वर्णन आहे. (महाभारत, आदिपर्व, अ० २२३–२२५.) ४. शय्या. ५. मोक्ष. ६. तेज, गृह. ७. पवित्र. ८. स्वभाव. ९. बाणांनीं. १०. हात. ११. लगबगीनें. १२. हवन केलेला पदार्थ खाणारा. (अग्नि.) १३. अर्जुनाच्या धनुष्याचें नांव. हें अग्नीनें खांडववन भक्षणसमयीं अर्जुनास दिलें. (महाभारत, आदिपर्व, अ० २२५.) १४. गडबडे. १५. दावाग्नीसारखा अत्यंत प्रखर. १६. अग्नि. १७. सर्प, शेष. १८. सर्प.

'शरस्तंबीं[1] गंगातनय पडला भारतरणीं,[2]
जसा ये अस्तातें सहितकिरणा भार तरणी.[3] ॥ १९
जयाचे हो ! होते बहुत धृतराष्ट्रा मर्मवसे,
तसे खालीं आले, हृदयगत विश्वंभर बसे. ।
शरीरीं संतत प्रखर शर ज्यातें कुरुपती[4]
श्रमी केला युद्धीं द्रुपदतनयानें[5] कुरुपती.[6] ॥ २०
'पाजिं पाणि मजला वसुधेचें.[7]' मानिलें वचन जेंवि सुधेचें,[8] ।
पांडवें न धरितां अविनीतें[9] पाठवूनि मज दे अवनीतें.[10]' ॥ २१
वदे जों शेषासी अमरसरिता[11] बाणसरसी
महीवरती आली त्वरित सुतनिर्वाणिं[12] सरसी.[13] ।
विलोकी ते जेव्हां कठिण शरतल्पीं निजविलें,
शरीरातें त्याच्या नयनजळपातें[14] भिजविलें. ॥ २२
'अरे बाळा ! माझ्या कदनसमयीं तीव्र तपनें
तुवां कां बा ! केलें ? असुनि वय हें तिव्र तपणें. ।
सुनेचें म्यां नाहीं मुख निरखिलें धाकुटपणीं,
गुरूशीं[15] तूं '[16]अंबेस्तव झगडलासी दृढपणीं. ॥ २३
तळीं बाणाग्नीनें, वरि तपनउष्णें[17] तळसि[18] रे !'
अशी माता तेव्हां विलपुनि पुन्हा भूतळिं शिरे. ।

---

१. शरसमूह. २. भारतयुद्धांत मार्गशीर्ष वद्य नवमीस भीष्माचार्य शरपंजरीं पडले. ३. सूर्य. ४. फार टोंचती. ५. दहावे दिवशीं शिखंडीला (द्रुपदतनयाला) पांडवांनीं भीष्माच्या पुढें उभें केलें. तो पूर्वी स्त्री असून मागाहून पुरुष झाल्यामुळें त्याजवर शस्त्र धरण्याचें भीष्मानें नाकारिलें, तथापि अर्जुनानें शिखंडीच्या मागें उभें राहून भीष्मावर बाणवृष्टि केली. ६. कुरुसैन्याचा नायक. (भीष्म.) ७. पृथ्वी. ८. अमृत. ९. दांडगा. १०. पृथ्वी. ११. देवनदी. (भागीरथी.) १२. पुत्राच्या संकटीं. १३. जलाशय. १४. अश्रुपतनानें. १५. परशुराम. १६. अंबा या नांवाची काशीराजाची ज्येष्ठ कन्या भीष्मानें विचित्रवीर्याकरितां जिंकून आणिली. परंतु तिचें प्रेम शाल्व राजावर जडलें असल्यामुळें तिला परत पाठविलें. त्यानें अंबा ही परजिता असल्यामुळें तिचा स्वीकार केला नाहीं. तेव्हां ती परत येऊन 'मला वरा' असें भीष्मास म्हणूं लागली. ती गोष्ट भीष्मानें नाकबूल केली. तेव्हां तिनें परशुरामाकडून आपला अंगीकार करण्याविषयीं बोलणें लाविलें. भीष्म परशुरामाचें ऐकेना म्हणून त्या दोघांचें युद्ध झालें. त्यांत परशुरामाचा पराभव झाला. अखेरीस अंबेनें भीष्माला मारण्याकरितां रुद्राचें आराधन करून, त्याच्या प्रसादानें पुढील जन्मीं द्रुपदाचे घरीं शिखंडिनी कन्यावतार घेतला. हिलाच 'शिखंडी' असें नांव पुरुषत्वलाभानंतर प्राप्त झालें. १७. सूर्य. १८. तळमळसी, भाजून जाशी.

रणीं श्रीपार्थाचे शर बहुत उत्कर्ष दिसले,
विलोकी तो जेव्हां तंव हृदयिं दुर्योधन सले. ॥ २४
वीरांत वीर हरिसारथि पार्थ हा रे! ज्याच्या पुढेंचि अवघा पुरुषार्थ हारे; ।
जैसा वनांत हरिणीवरि सिंह घोरे, तैसा रणीं प्रतिभटीं सितवाह तो रे! ॥ २५
वदे श्रीभीष्मातें विगतनयनाचा सुत पुसे,
'मनीं मोठे भाती अति पार्थादि रिपु असे. ।
कशी आज्ञा देशी कठिण करणें युद्ध वदसा
चमूवर्ती आली वडिल पडतांना अवदसा.' ॥ २६
वदे ते क्षणीं भीष्म दुर्योधनातें, 'नको तूं धरूं पांडवीं युद्धवार्तें; ।
सुखी दोघही एक होवोनि राहा, पुरे होय संग्राम माझेनि हा, हां!'॥ २७
अशी भारतीं भीष्मपर्वी कथा रे! तरे या चरित्रीं जरी चित्त धारे. ।
ऋषी बोलिला भूप पारिक्षितीतें, करी धन्य जो सर्वथा या क्षितीतें. ॥२८
काशींत नाम जननीजनकाभिधानी श्रीविश्वनाथ मम दैवत कृष्णवेणी. ।
श्रीमन्महेश अघमर्षण जो उपायीं दासानुदास चि तरे दव तो सुपायीं. ॥[६] २९

जयद्रथवध.

(श्लोक.)

सौभद्रशोकविवशें रचिलें पणातें कुंतीसुतें समजल्याविण आपणांतें, ।
तें वाक्य सत्य करवी तंव पूर्वजाचें श्रीकृष्ण नाम भज त्यासि अपूर्व ज्याचें. ॥ १

---

१. हरे, लोपे. २. पांढरे घोडे ज्याचे (ज्याच्या रथाचे) तो. (अर्जुन). ३. अंध धृतराष्ट्राचा. ४. या चरणांत कांहीं अक्षरें कमी दिसतात. 'अतिभयद पार्थादि रिपुसे' असा अथवा अशा प्रकारचा पाठ कदाचित् असेल. ५. हाय. ६. या प्रकरणाचे शेवटीं वामनपंडितांचे नांव नाहीं, यास्तव हें प्रकरण यांचेंच कीं काय असा संशय येतो; तथापि 'दासानुदास' 'किंकर' इत्यादि शब्द शेवटच्या पद्यांत योजण्याची चाल वामनाची दिसते, तिजवरून आणि भाषासरणीवरून हें प्रकरण वामनाचेंच असावें असें वाटतें. ७. हें प्रकरण द्रोणपर्वाच्या १४६ व्या अध्यायांत आहे. ८. सुभद्रेचा पुत्र अभिमन्यु याच्यास्तव झालेल्या शोकानें विवश म्ह० पराधीन. ९. प्रतिज्ञेतें. १०. अर्जुनानें. ११. उदईक सूर्यास्ता-पूर्वी जयद्रथास मारीन, न मारीन तर अग्निप्रवेश करीन असें अर्जुनाचें प्रतिज्ञावाक्य. १२. तुझ्या म्ह० जनमेजयाच्या. 'तंव' या पदावरून या प्रकरणांतील 'सौभद्रशोकविवशें' हा श्लोक पहिला नसून याच्या पूर्वी आणखी कांहीं श्लोक असावेत असा संभव दिसतो. कदाचित् सर्व द्रोणपर्व पंडितांनीं रचिलें असावें.